मे. लॅन्को विदर्भ औष्णिक विद्युत लि.

मौजा. मांडवा, पुलई व बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा

या प्रकल्पाची पर्यावरण विषयक पुर्नलोकसुनावणी

दिनांक २०/०६/२०१२ चे इतिवृत्त.

**मे. लॅन्को विदर्भ औष्णिक विद्युत लि. मौजा. मांडवा, पुलई व बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा या प्रकल्पाची पर्यावरण विषयक पुर्नलोकसुनावणी दिनांक २०/०६/२०१२ चे इतिवृत्त.**

-----------

मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ नागपूर यांचे जनहित याचिका क्र. ७८/२०१० मधील दि. १८ आक्टोबर २०११ च्या आदेशान्वये मे. लॅन्को विदर्भ औष्णिक विद्युत लि. मौजा मांडवा, पुलई व बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा या २ x ६६० = १३२० मेगावॅट औष्णिक विद्युत प्रकल्पाची पर्यावरण विषयक पूर्नलोकसुनावणी दि. २०/०६/२०१२ रोजी जिल्हा क्रिडा संकुल पटांगण, वर्धा येथे श्री हरीश धार्मीक, उप-विभागीय दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर जाहीर लोक सुनावणीचे आयोजक तथा सदस्य म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी, श्री अजय तु. फुलमाळी यांनी कार्य केले. मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ, नागपूर च्या आदेशानुसार पोलिस अधिक्षक, वर्धा यांचे प्रतिनिधी म्हणून श्री टी. एस. गेडाम, अतिरीक्त पोलीस अधिक्षक व जिल्हाधिकारी, वर्धा यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. जे.बी. संगितराव, उपजिल्हाधिकारी, जाहिर सुनावणी दरम्यान उपस्थित होते. ही पुर्न जाहिर लोकसुनावणी दि.२०/०६/२०१२ रोजी सकाळी साधारण ११.०० वाजून ५५ मिनिटांनी अध्यक्षांच्या परवानगीने सुरु झाली व दि. २१/०६/२०१२ रोजी सकाळी साधारण १.०० वाजून ५ मिनिटापर्यंत सुरू होती. या जाहिर लोकसुनावणीस उपस्थित असलेल्या नागरीकांची यादी सोबत जोडलेली आहे. या जाहिर लोकसुनावणी पुर्वी २४ तास अगोदर मप्रनि मंडळाकडे एकुण ४३१ निवेदने/आक्षेप प्राप्त झाले होते, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडे एकुण २७ निवेदने/आक्षेप प्राप्त झालेली होती, लोकसुनावणी दरम्यान एकुण २६६ निवेदने / आक्षेप प्राप्त झालेली होती. या लोकसुनावणीमध्ये एकुण ११२७ नागरीक उपस्थित होते व त्यापैकी १३६ लोकांनी त्यांचे मते, टिका, टिप्पणी, आक्षेप व सूचना नोंदविल्यात.

सर्वप्रथम, जाहीर लोकसुनावणीचे सदस्य तथा आयोजक श्री अजय तु. फुलमाळी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर यांनी सांगितले की, आज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. यांच्या प्रत्येकी ६६० मेगावॅट क्षमतेच्या २ संचाची पुर्न लोकसुनावणी आयोजीत केलेली आहे. ही लोकसुनावणी मा.उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ नागपूर यांचे आदेशानुसार तसेच केंद्र शासनाच्या १४ सप्टेंबर २००६ च्या अधिसूचनेनुसार पुन्हा आयोजीत केलेली आहे. या पुर्न लोकसुनावणीची सूचना दि. १६/०५/२०१२ रोजी दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या इंग्रजी वृत्तपत्रामध्ये तसेच दैनिक लोकमत व दैनिक देशोन्नती या मराठी वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. या सुचनेनुसार ग्रामवासी तसेच इतर संबंधीत पर्यावरणवादी, पर्यावरणवादी संस्था व इतर प्रभावीत होणारे लोक तसेच इतर संबंधित लोक यांचेकडुन या सदर प्रकल्पाबद्दल आक्षेप व निवेदने मागविलेली होती. ही निवेदने दि. २०/०६/२०१२ या पुर्न लोकसुनावणी दिवसाच्या २४ तास अगोदर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये सादर करावयाची होती. त्याचप्रमाणे, जे संबंधिती व्यक्ती पुर्न लोकसुनावणीसाठी आज येथे जिल्हा क्रिडा संकुल पटांगणामध्ये उपस्थित झालेले आहेत ते आपले आक्षेप व निवेदने आज सुध्दा देवू शकतात. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वृत्तपत्रामध्ये सूचना देवून आक्षेप व निवेदने मागविलेली होती. त्यानुसार बऱ्याच प्रमाणात आक्षेप व निवेदने प्राप्त झाली आहेत. ज्यांनी प्रथम निवेदने किंवा आक्षेप दिलेले आहेत, त्यांना प्रथम टप्प्या-टप्प्याने बोलविण्यात येईल व त्यांचे विचार ऐकुण घेण्यात येईल. त्याचप्रमाणे, ज्या व्यक्तींनी आपले आक्षेप किंवा निवेदने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे नोंदविलेली नाहीत, मात्र लोकसुनावणीसाठी उपस्थित झालेले आहेत. त्यांना सुध्दा, त्यांचे मत / आक्षेप मांडण्यासाठी संधी देण्यात येईल. त्यांनी पुढे सांगितले की, आजच्या लोकसुनावणीचे अध्यक्ष श्री. हरिश धार्मिक साहेब, उपविभागीय दंडाधिकारी, वर्धा हे असून ते स्वतः या लोकसुनावणीचे सदस्य तथा आयोजक आहेत.

ज्या लोकांनी प्रथम आपली निवेदने व आक्षेप दिलेली आहेत, त्या प्रत्येक व्यक्तींची नांवे उच्चारून त्यांना ५०-५० च्या समुहामध्ये या लोकसुनावणीच्या कक्षामध्ये येण्याचे आवाहन करण्यात येईल व त्यांचे मते / आक्षेप ऐकण्यात येतील. त्याचप्रमाणे, त्यांनी सांगितले की, मा.उच्च न्यायालयाने ही लोकसुनावणी घेण्यासाठी ज्या प्रकारची व्यवस्था करण्याचे आदेश दिले होते, त्याप्रकारची व्यवस्था महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेली आहे. त्यानुसार, जेथे लोकसुनावणीचे पॅनल बसलेले आहे, तो लोकसुनावणीचा कक्ष आहे व बाहेर दोन स्वतंत्र मंडप उभारलेले आहेत. या लोकसुनावणीच्या कक्षामधील कार्यवृत्त बाहेरील दोन मंडपामध्ये बसलेल्या ग्रामवासी व इतर संबंधित लोकांना चित्रफितीद्वारे व ध्वनीक्षेपकाद्वारे समजू शकेल.

..२/-

त्यानुसार, मा.अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी सुरू करून त्यांनी सांगितले की, मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. चे प्रकल्प धारक त्यांचे प्रकल्पाबद्दल व पर्यावरणाबद्दल सादरीकरण करतील. त्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, ज्या लोकांनी प्रथम निवेदने दिलेले आहेत, अशा ५० लोकांची नांवे उच्चारून लोकसुनावणीच्या कक्षामध्ये येण्याचे आवाहन करतील व त्यांची मते ऐकुण घेण्यात येईल. त्यांची मते ऐकुण घेतल्यानंतर संबंधित लोक बाहेरील मंडपामध्ये बसून लोकसुनावणीचे कार्यवृत्त बघू शकतील.

त्यानुसार, प्रकल्प धारकाचे सल्लागार डॉ. दत्तात्रय महादेव धर्माधिकारी, निवृत्त शास्त्रज्ञ निरी यांनी प्रथम मा. अध्यक्ष श्री. हरिश धार्मिक साहेब, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी व उपस्थित नागरीकांना संबोधून मा. अध्यक्षांच्या परवानगीने मे. लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. या औष्णिक विद्युत प्रकल्पाचे पर्यावरण विषयक अभ्यासाचे सादरीकरण करीत असल्याचे सांगितले. त्यांनी सांगितले की, त्यांनी नागपूर येथील निरी या संस्थेमध्ये ३३ वर्ष कार्य केलेले असून २०० पेक्षा जास्त पर्यावरणाच्या योजना हाताळलेल्या आहेत. यामध्ये, ताजमहलचे पर्यावरण व भोपाळ येथील वायु दुर्घटना झाल्यानंतर पर्यावरणावर उद्‌भवलेले परिणाम हे विषय समाविष्ट आहेत.या प्रकल्पाच्या पर्यावरणाचा अभ्यास हैद्राबाद येथील विम्टा लॅब यांनी केलेला असून त्यांचे प्रतिनिधी, निरीचे निवृत्त शास्त्रज्ञ श्री.डॉ.कोटांगले येथे हजर असून, प्रकल्पाच्या सादरीकरणानंतर संबंधित लोकांच्या सर्व प्रश्नांचे समर्पक व सार्थक उत्तरे देण्यात येईल, असे सांगितले. प्रकल्पाचे सादरीकरण पॉवर पॉईन्ट द्वारे करण्यात आले. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

प्रकल्प धारकाच्या सल्लागाराने माहिती दिली की, मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर कंपनीने औष्णिक विद्युत प्रकल्प उभारण्यासाठी पुढाकार घेतला असून, ही कंपनी उर्जा, रस्ते, महामार्ग व बांधकाम या क्षेत्रात कार्य करते. सद्यस्थितीत लॅन्को ग्रुप भारतात ४४१० मेगावॅट क्षमतेचे उर्जा केंद्र चालवित आहे. बांधकाम स्थितीतील विद्युत प्रकल्पाची एकुण क्षमता ४९६८ मेगावॅट आहे व काही प्रकल्प विकासाचे मार्गावर असून त्यांची क्षमता ७१०३ मेगावॅट आहे. मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. चे स्थान नकाशामध्ये दर्शविण्यात आलेले आहे. प्रकल्पाच्या मध्यभागापासुन १० कि.मी. त्रिजेच्या परिसरामध्ये पर्यावरणाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या प्रकल्पाचे अक्षांक्ष उत्तरेस २० अंश ४८ मिनिट ४४.६ सेकंद असून पुर्वेस ७८ अंश २८ मिनिट २.० सेंकद आहे. हा प्रकल्प समुद्रसपाटीपासून २८० मीटर अंतरावर आहे. प्रकल्पापासुनचे मुख्य शहर वर्धा आहे, राज्य महामार्ग क्र. २५५ असून, प्रकल्पापासुन वर्धा हे जवळचे रेल्वे स्टेशन आहे.

या प्रकल्पा जवळील पाण्याचे स्त्रोताबद्दल माहिती देतांना त्यांनी सांगितले की, धाम नदी व बोर नाला हे पाण्याचे स्त्रोत आहेत. तसेच १० कि.मी. त्रिज्ये मध्ये पुरातत्व विभागाने निर्देशिलेली महत्वाची स्थळे नाहीत. त्याचप्रमाणे, १५ कि.मी. त्रिज्येमध्ये राष्ट्रीय उद्याने / वन्यजीव अभयारण्ये नाहीत. १० कि.मी. त्रिज्येच्या परिसरामधील आरक्षित व संरक्षित वनांची माहिती दिली आहे. मात्र, या प्रकल्प परिसरात वन जमिन नसल्याचे सांगितले. तसेच १० कि.मी. परिसरात सेना विभागाचे कार्यालय / गोदाम/कारखाने नाही. तसेच बापू कुटी ही प्रकल्पापासून १९.८१ कि.मी. अंतरावर असल्याचे सांगितले.

प्रकल्पामध्ये उच्च क्षमतेचे अधिक्रांतीक तंत्रज्ञानाचा समावेश आहे. त्याचप्रमाणे, या प्रकल्पास एकुण ३८५८ घनमीटर प्रतीतास पाण्याची गरज असून पाण्याची उपलब्धता निम्न वर्धा धरणातुन पुर्ण करण्यात येईल. या प्रकल्पाची लागत रू. ६९३६ करोड असून त्यापैकी पर्यावरण संरक्षणाकरीता रू. ४१५ करोड आहे. २७५ मीटर उंचीचा जुळ्या चिमण्यातुन धुराचे उत्सर्जन करण्यात येईल. बिजेची वाहतुक पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडीया लिमिटेडच्या पारेषण वाहिनीचे माध्यमातुन करण्यात येईल. अधिक्रांतीक तंत्रज्ञानामध्ये जास्त क्षमता, कमी उष्णता व कमी प्रदूषण निर्माण होते. इलेक्ट्रोस्टॅटिक प्रेसिपिटेटर ही हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारण्यात येणार असून त्याची क्षमता ९९.७८ टक्के आहे. त्यातून, वातावरणात उत्सर्जित होणाऱ्या धुळीकणाचे प्रमाण ५० मिलीग्रॅम/घनमीटर या मानकापेक्षा कमी राहील. त्याचप्रमाणे, सांडपाण्यावर प्रक्रियेसाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा, मल प्रक्रियेसाठी मल प्रक्रिया केंद्र उभारण्यात येवून त्यातील प्रक्रियाकृत सांडपाणी प्रकल्पाच्या परिसरामध्येच विविध उपयोगासाठी वापरण्यात येईल. त्यामुळे हा प्रकल्प शुन्य निकसन प्रकल्प आहे.

या प्रकल्पामुळे कोणालाही विस्थापित करण्यात येणार नाही. प्रकल्पातुन निर्माण होणाऱ्या राखेचे व्यवस्थापनासाठी आधुनिक पध्दतीचा (HCSD) वापर करण्यात येईल. राख साठवण टाकीमधून राखेची गळती होणार नाही, यासाठी विशिष्ट पदार्थाने साठवण टाकीचा आतिल भाग संरक्षित करण्यात येईल, ज्यामुळे परिसरातील भुगर्भातील पाण्याचे तसेच पृष्ठभागावरील पाण्याचे प्रदूषण होणार नाही. प्रकल्पाचे भोवती दाट व उंच हरितपट्टा उभारण्यात येवून त्याचा रखरखाव करण्यात येईल. कोळसा E/F ग्रेडचा ७.५ दशलक्ष टनभार प्रतीवर्ष लागणार आहे. या कोळशाचे स्त्रोत छत्तीसगड येथील साउथ इस्टर्न कोलफिल्ड (SECL) आहे. जड इंधन तेल (HFO) / पातळ डिझेल तेल (LDO) अंदाजे १०,००० किलोलिटर प्रतीवर्ष वापरण्यात येईल. कोळशामध्ये राखेचे जास्तीतजास्त प्रमाण ४२ टक्के असून गंधकाचे जास्तीजास्त प्रमाण ०.४५ टक्के राहील.

सदर प्रकल्पाची आधाररेखा पर्यावरण परिस्थिती अभ्यास काळ ०१.१०.२००९ ते ३१.१२.२००९ पर्यंतचा आहे. यामध्ये कोअर झोनचा परिसर (प्रस्तावित पॉवर स्टेशनचा परिसर) व बफर झोन-पॉवर स्टेशनपासुन १० कि.मी. परिसरात प्राथमिक पर्यावरणाचा अभ्यास करण्यात आला. या अभ्यासामध्ये जल गुणवत्ता, हवा गुणवत्ता, घनकचरा व्यवस्थापन, ध्वनी सर्व्हेक्षण, हवामान, वनस्पती व प्राणी सृष्टी इ. बाबींचा अभ्यास करून संबंधित माहिती गोळा केलेली आहे. हवामानाच्या अभ्यासामध्ये वायूचा वेग, दिशा, उष्णतामान, आद्रता, हवा गुणवत्तेमध्ये (एकुण १२ नमुने) तरंगणारे धुळीकण, श्वसनीय धुळीकण, ओझोन, सल्फर डायऑक्साईड, ऑक्साईड ऑफ नायट्रोजन, कार्बन मोनोक्साईड, मर्क्युरीचे प्रमाण तपासण्यात आले. जल गुणवत्तेमध्ये एकुण ७ भुजल व ४ भूपृष्ठावरील पाण्याचे नमुने गोळा करून त्यामधील प्रदूषण घटकाचे प्रमाण भारतीय मानक संस्थान १०५०० प्रमाणे मोजण्यात आले. त्याचप्रमाणे, मातीचे नमुने ११ ठिकाणी गोळा करून पीएच, विद्युत वाहकता, पोत, रेती, कॅल्शीयम, सोडीयम, पोटॅश, नेत्र, सेंद्रिय पदार्थ, फॉस्फरस, पाण्यात विरघळणारे क्लोराईड, पाण्यात विरघळणारा सल्फेट, ॲल्युमिनीअम, लोह, मॅगनिज, बोरॉन, जस्त इ. घटकांचा अभ्यास करण्यात आला. ध्वनीचे सर्व्हेक्षण एकुण १३ ठिकाणी करण्यात आले असून दिवसा व रात्री ध्वनीचे प्रमाण मोजण्यात आले. १५ कि.मी. त्रिज्येच्या परिसरामध्ये वनस्पती व प्राणी सृष्टीचा (Ecology) अभ्यास करण्यात आला असून, त्यामध्ये नामशेष / धोकादायक वनस्पती व प्राणी, तसेच जैव विविधतेचा अभ्यास करण्यात आला.

जल भूगर्भ शास्त्राचा अभ्यास दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे व भूमी उपयोग अभ्यास हे सूदूर संवेदन माहितीवर व जिल्हा जनगणना २००१ माहितीवर, तसेच जनसंख्या ही जिल्हा जनगणना २००१ वर आधारीत आहे. हवामानाच्या अभ्यासामध्ये उष्णतामान, पाऊस, आद्रता, वातगती व वात दिशेची माहिती दिली. त्याचप्रमाणे, पावसाळ्यापुर्वी व पावसाळ्यामधील, पावसाळ्यानंतर तसेच हिवाळ्यामधील व संपूर्ण वर्षामधील वात पुष्प आकृती (Wind rows) विषयाबाबत माहिती दिली. त्यानुसार प्रामुख्याने संपूर्ण वर्षामध्ये, उत्तर-पुर्व व दक्षिण-पुर्व या दिशेस वाऱ्याच्या दिशेचे वर्चस्व आहे.

हवा गुणवत्तेमध्ये तपासलेले प्रदूषण घटक जसे, सल्फर डायऑक्साईड, ऑक्साईड ऑफ नायट्रोजन, एकुण तरल पदार्थ, श्वसनीय तरल पदार्थाचे प्रमाण राष्ट्रीय वायू गुणवत्तेमध्ये असलेल्या प्रदूषण घटकांच्या मर्यादेपेक्षा कमी आढळले. त्याचप्रमाणे, प्रकल्प सुरू झाल्यानंतर हवेमधील प्रदूषण घटकावर होणारे परिणामाचा अभ्यास अमेरिकेतील पर्यावरण संरक्षण संस्थेने तयार केलेल्या गणितीय मॉडेलनुसार केलेला असून असे निदर्शनास आले की, प्रकल्प सुरू झाल्यानंतर सुध्दा हवेतील प्रदूषण घटकाचे प्रमाण राष्ट्रीय हवा गुणवत्तेमधील प्रदूषण घटकाच्या मर्यादेपेक्षा कमी राहील. त्याचप्रमाणे, तरल धुळीकण, सल्फर डायऑक्साईड व NOx ची वाढीव संहिताचे प्रमाणाबाबत माहिती दिली.

हवा प्रदूषण व्यवस्थापनामध्ये धुळीकणांचे नियंत्रणासाठी उच्च क्षमतेचा इलेक्ट्रो स्टॅटीक प्रसिपीटेटर उभारण्यात येईल. तसेच सल्फर डायऑक्साईड या वायूचा हवेमध्ये फैलाव होण्याकरीता २७५ मीटर उंचीच्या जुळया चिमण्या उभारण्यात येतील. तसेच, ऑक्साईड ऑफ नायट्रोजनचे कमी प्रमाणात उत्सर्जन करणेसाठी बर्नरची व्यवस्था असेल. धुराड्यांतुन उत्सर्जित होणारे तरल धुळीकणाचे प्रमाण ५० मिलीग्रॅम प्रती घनमीटर मध्ये राखण्यात येईल. कच्चा माल साठवणुक विभागातील कोळसा वापर / प्रक्रिया विभागात धुळीचे प्रदूषण नियंत्रणाकरीता पाण्याच्या फवाऱ्यांची व्यवस्था करण्यात येईल.

..४/-

वनस्पती शास्त्रज्ञांचा सल्ला घेवून कारखान्याच्या परिसराभोवती आवश्यक जाडी व उंची असलेला हरीत पट्टा निर्माण करण्यात येईल. प्रकल्पधारकाच्या जबाबदारीनुसार (CREP) पर्यावरण संरक्षणाकरीता प्रदूषणाच्या प्रमाणाचे नियमितपणे मोजमापन करण्यात येईल. त्यासाठी आवश्यक उपकरणाची सोय करण्यात येईल. त्याची माहिती प्रत्येक महिन्याला लोकांना कळविण्यात येईल.

जल पर्यावरणामध्ये भूजल व पृष्ठभागावरील पाण्याचे नमुने गोळा करून त्यामध्ये पीएच, विद्युत वाहकता, एकुण विरघळलेले पदार्थ, एकुण कठीणता, क्लोराईडस व मर्क्युरी या प्रदूषण घटकांचे प्रमाण मोजण्यात आले असून राष्ट्रीय मानकापेक्षा कमी आढळले. या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे कारखाना निर्मित प्रदूषके नाहीत व जड धातुचे प्रमाण मर्यादेमध्ये आहे. तसेच,कोलीफार्म व किटकनाशके जल स्त्रोतांमध्ये आढळून आले नाही.

जल पर्यावरणावर परिणाम व त्याबाबत व्यवस्थापन व्यवस्थेची माहिती देतांना सांगितले की, शितलीकरणातुन निघणाऱ्या सांडपाण्यामध्ये विरघळलेले पदार्थ असून त्याचा वापर पाणीयुक्त राखनिर्मिती व निर्मुलन प्रक्रियेत करण्यात येईल व उर्वरीत सांडपाणी केंद्रिय साठवण कुंडामध्ये साठविण्यात येईल. त्याचप्रमाणे, डीएम प्लान्टमधून निघणाऱ्या सांडपाण्यावर न्युट्रलायझेशनची प्रक्रिया करून केंद्रिय साठवण कुंडामध्ये साठविण्यात येईल. प्रकल्पातील इतर सांडपाणी STP मध्ये प्रक्रिया करून हरितपट्ट्यासाठी वापरण्यात येईल. त्याचप्रमाणे, डीएम प्लान्टसाठी लागणाऱ्या पाण्यावर क्लॅरीफायरमध्ये प्रक्रिया करून त्यातील सांडपाणी STP मध्ये प्रक्रिया करून हरितपट्ट्यासाठी वापरण्यात येईल व उर्वरीत सांडपाणी राखेच्या व्यवस्थापनासाठी वापरण्यात येईल. त्याचप्रमाणे, प्रक्रियाकृत सांडपाणी धुळीकणाचे नियंत्रणासाठी वापरण्यात येईल. या सांडपाण्यातील प्रदूषण घटकाचे प्रमाण नियमितपणे तपासण्यात येईल. प्रकल्प क्षेत्रातील पावसाचे पाणी एकत्र करून जलाशयात सोडण्यात येईल व या पाण्याचा प्रकल्पासाठी उपयोग करण्यात येईल.

ध्वनी प्रदूषणाचे प्रमाण कारखान्याच्या परिसरात व गावांमध्ये दिवसा व रात्री सुध्दा मोजण्यात आले असून, त्यानुसार ध्वनीचे प्रमाण मर्यादेमध्ये आहे. प्रकल्पामुळे होणारे ध्वनी प्रदूषणाचे परिणाम व व्यवस्थापनासाठी करावयाची योजनेबाबत सांगितले की, प्रकल्पामुळे गावामध्ये ध्वनीच्या पातळीमध्ये कमीतकमी वाढ होणार आहे. यासाठी सर्व संयत्रामध्ये रचना केलेली राहील. तसेच आवश्यक तेथे ध्वनी लहरी शोषून घेणारी कवच व छप्पराची व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे, ध्वनी प्रदूषणकारी उपकरण चालविणाऱ्या कामगारांना बंदिस्त खोलीची तसेच ध्वनीकर्ण सुरक्षा प्लगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. ध्वनी लहरी शोषून घेण्याकरीता आवश्यक उंची व जाडीचा हरीतपट्टा उभारण्यात येईल. प्रकल्प सुरू झाल्यावर सुध्दा सभोवतालचे परिसरामध्ये व गावामध्ये ध्वनीचे प्रमाण राष्ट्रीय मानकापेक्षा कमी राहील, याची खबरदारी घेण्यात येईल.

वनस्पती सृष्टी आणि प्राणी सृष्टीबद्दल माहिती दिली की, वनस्पती सृष्टीमध्ये झाडे, झुडपे, शाकीय वनस्पती मुख्यत: आढळल्या असून यामध्ये बाभूळ, हिरवा सावर, गाजर गवत, तरोटा, आसाम लोटा, हल्दु, बिजा, करंज, चिंच इ. समावेश आहे. हा प्रकल्प परिसर निरोगी परिस्थितीचा आहे.

वन्यजीव संरक्षण कायद्या अंतर्गत (१९७२) असलेल्या निर्देशीत यादी क्र. II, III, IV व V मध्ये समाविष्ट असलेले प्राणी पर्यावरणीय अभ्यास करतांना आढळलेले आहे.

प्रकल्पामधून निर्माण होणारी एकुण राख ३.१५ दशलक्ष टन प्रतीवर्ष असून त्यापैकी जड राख ०.६३ दशलक्ष टन प्रतीवर्ष व तरल राख २.५२ दशलक्ष टन प्रतीवर्ष राहील. कोरडी राखेचा पुर्नवापर करणेसाठी संबंधित कारखान्यांना पुरविण्यात येईल व उर्वरीत राख हौदामध्ये विसर्जित करण्यात येईल. या हौदाला विशिष्ट प्रकारचे अस्तर (Lining) बसविण्यात येईल. प्रकल्पातुन निर्माण होणारी राख हौदामध्ये वाहून नेण्यासाठी उच्च घनता राखेचा लगदा तयार करण्याची पध्दत वापरण्यात येईल.

..५/-

प्रकल्पामधील वापरलेले तेल (Used Oil) अंदाजे १०,००० किलोलिटर प्रतीवर्ष पुर्नचक्रीकरणासाठी देण्यात येईल. सांडपाणी प्रक्रिया संयत्रणामधील गाळ शक्य असल्यास खत म्हणून वापरण्यात येईल व उर्वरीत गाळाची योग्यप्रकारे विल्हेवाट करण्यात येईल. प्रकल्पातुन निर्माण होणारे ५०० टन प्रतीवर्ष घरगुती कचऱ्यातील सेंद्रिय भागापासून खत तयार करण्यात येईल.

हरितपट्टा विकासाबद्दल सांगितले की, प्रकल्पाच्या सिमेवर व रिकाम्या जागेवर वृक्षारोपन करण्यात येईल. कारखान्यातील प्रक्रियाकृत सांडपाणी हरितपट्टा संवर्धनाकरीता वापरण्यात येईल. याबाबत केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ व केंद्र शासनाचे वने व पर्यावरण मंत्रालय यांनी सुचित केलेल्या टायर मॉडेल कल्पना / योजना नुसार हरितपट्टा विकासाचे कार्य सुरू झाले आहे. तसेच प्रकल्पाच्या सभोवताली असलेल्या गावामध्ये रोपे वाटण्यात आली असून वृक्ष लागवड होत आहे. याबाबत, विदर्भ पाटबंधारे विकास मंडळाचे लोअर वर्धा धरणाजवळील धनोडी गावाजवळ वृक्षलागवड केली असल्याची माहिती दिली. प्रकल्प परिसरात विविध ठिकाणी केलेल्या हरितपट्टा विकासाचे छायाचित्र दाखविले.

कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीनुसार (Corporate Social Responsibility) शुध्द पेयजल उपलब्ध करून देण्यात येईल, समाजाचा व प्रदेशाचा विकास करण्यात येईल, शेजारी असलेल्या खेड्यांतील लोकांकरीता आरोग्य शिबिर व विनामुल्य रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात येईल. हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करणे, रस्त्यांवर सौरउर्जेच्या दिव्यांची सोय करण्यात येईल. तसेच, शारीरीक दृष्ट्या अपंग व्यक्तीकरीता कुत्रीम अवयवांच्या व आरोग्याच्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी पुर्ण करण्यात येईल. सामुहिक विकास व स्व-मदत समुहाची स्थापना करणे, परिसराच्या सामाजीक व आर्थिक विकासावर भर देणे, आसपासच्या परिसराच्या आरोग्य व स्वच्छता यात सुधारणा करणे व परिवार कल्याणाचा प्रसार करणे इ. जबाबदारी पुर्ण करण्यात येईल. याबाबत केलेल्या कार्याची छायाचित्रे दाखविली.

या प्रकल्पामुळे संसाधनांचा विकास, सामाजिक व आर्थिक विकास, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती, उर्जा निर्मितीच्या उद्दीष्टांची पुर्तता होणेस मदत होईल. महाराष्ट्र राज्यामध्ये विजेचा तुटवडा आहे, असे प्रकल्पाचे सल्लागार डॉ. दत्तात्रय धर्माधिकारी यांनी सांगितले. यानुसार प्रकल्पाचे सादरीकरण समाप्त झाले.

तद्नंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांनी (सदस्य तथा आयोजक) सांगितले की, ज्या लोकांनी मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. मांडवा, पुलई व बेलगांव, ता.जि.वर्धा या प्रकल्पाबद्दल यापुर्वी निवेदने / आक्षेप सादर केलेली आहेत, अशा प्रथम ५० लोकांचे, अर्ज प्राप्तीच्या दिनांकानुसार नांव उच्चारून त्यांचे मत नोंदविण्यासाठी लोकसुनावणीच्या कक्षामध्ये पॅनेलसमोर बोलविण्यात येईल. त्यानुसार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी लोकांची नांवे उच्चारून, त्यांची मते, टिका, टिप्पणी, आक्षेपांची नोंद केल्यावर पुढील लोकांची नांवे उच्चारून लोकसुनावणीच्या कक्षामध्ये येण्यासाठी आवाहन करण्याचे कार्य सूरू ठेवले. या सर्व लोकांची मते, टिका, टिप्पणी, आक्षेपांची नोंद घेण्यात आली. त्याचप्रमाणे, नागरीकांनी विचारलेल्या प्रश्नांना प्रकल्प धारकाने दिलेली माहिती, तसेच पॅनेलचे अध्यक्ष व सदस्यांनी दिलेल्या माहितीची सुध्दा नोंद घेण्यात आली.

मप्रनि मंडळाच्या अधिकाऱ्यांनी लोकांची नांवे उच्चारल्यानंतर सदस्यांनी सांगितले की, जे नागरीक लोकसुनावणी कक्षामध्ये आले आहेत. त्या प्रत्येकांनी आपले प्रथम नांव सांगावे व या प्रकल्पाबद्दल त्यांचे जे काही मत, प्रश्न किंवा आक्षेप असतील ते विचारावे. त्यावर प्रकल्पधारकाकडून माहिती देण्यात येईल.

..६/-

लोकसुनावणीचे कार्यवृत्त खालीलप्रमाणे आहे.

१. श्री गजानन शंकर पाचारे, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- त्यांचे क्षेत्रात कंपनी आल्यापासून समाज सुधारणेची कामे चालू करण्यात आलेली आहेत. गावामध्ये पेयजलाची व्यवस्था केलेली आहे. अनुदान तत्वावर शौचालयाची व्यवस्था केलेली आहे. तसेच सौर उर्जा दिवे व रस्त्याचे कार्य सुरू आहे. त्यांना ही कंपनी हवी आहे, असे सांगितले. भविष्यात कंपनीमुळे प्रदूषण झाले तर त्यासाठी कंपनी उपाययोजना करेल, असा त्यांचा विश्वास आहे.

सदस्यांनी सांगितले की, लोकसुनावणी कक्षामध्ये मत नोंदविल्यानंतर संबंधित व्यक्ती पुन्हा बाहेर उभारलेल्या दोन कक्षामध्ये बसू शकतात व या लोकसुनावणीचे कार्यवृत्त बघू शकतात.

२. श्रीमती शकुंतला मनोहर नेहारे, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- जेव्हापासून त्यांच्या गावामध्ये कंपनी आलेली आहे, तेव्हापासून गावाला फायदा होत आहे. गावामधील बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे. तसेच सौर उर्जा दिवे व शुध्द पाण्याची व्यवस्था केलेली आहे. जनहिताचे कार्य सुरू आहे. प्रदूषण नियंत्रणाच्या दृष्टीने कंपनी कार्यरत आहे व कंपनी हे कार्य पुर्ण करेल, अशी त्यांना अपेक्षा आहे. त्यांना कंपनी हवी आहे, असे मत व्यक्त केले.

३. श्रीमती प्रियंका विजयराव जवादे, बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- कंपनी आल्यापासून त्यांच्या गावामध्ये अनेक सामाजिक सुधारणा झालेल्या आहेत. आयटीआय शिक्षण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे. रस्त्यांचे खडीकरण झाले आहे. अशी बरीच कामे कंपनीने केलेली आहेत. त्याचप्रमाणे, मोठ्या प्रमाणात रोजगार मिळालेला आहे. गावातील लोकांना समजून घेवून कंपनी कार्य करीत आहे. कंपनी पर्यावरणाच्या दृष्टीने सुध्दा चांगले कार्य करेल, असे मत व्यक्त केले.

४. श्रीमती अपर्णा स. हेलोंडे, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- जेव्हापासून लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. चा प्रकल्प आलेला आहे, तेव्हापासून गावाला फायदा झालेला आहे. सौर उर्जा दिव्यांची व्यवस्था उपलब्ध करून दिलेली आहे. शाळांमध्ये मोफत आरोग्य शिबीराची व्यवस्था केलेली आहे. गावामधील लोकांना मोफत आरोग्य चिकित्सा सेवा उपलब्ध केलेली आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने कंपनीतर्फे गांवामध्ये वृक्षलागवड सुरू आहे, असे मत व्यक्त केले.

५. श्रीमती गुंफा महादेव गावंडे, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- गावामध्ये कंपनी आल्यापासून गावातील लोकांना रोजगार मिळाला आहे. गांवात शौचालय बांधण्यात आले आहेत. सांडपाणी निसःरणासाठी गावामध्ये गटारे बांधली आहेत. महिलांना सुध्दा बचत गटामार्फत स्वयंरोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सुध्दा देत आहेत. तसेच अभियांत्रिकी व वैद्यकीय अभ्यासक्रमाचे प्रवेश मिळण्यामध्ये मदत करत आहेत, असे मत व्यक्त केले.

६. श्रीमती सारीका कातारकर, बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- जेव्हापासून कंपनी त्यांचे गावामध्ये आलेली आहे, तेव्हापासून सामाजिक दृष्टीकोनातुन अनेक सुधारणा केलेल्या आहेत. गावामध्ये घरोघरी शौचालयाची व्यवस्था निर्माण केलेली आहे. शुध्द पाण्याची व्यवस्था केली आहे. आरोग्यासाठी सुविधा सुरू केल्या आहेत. रस्त्यांचे खडीकरण केले आहे. ही कंपनी सुरु व्हायला पाहिजे, त्यामुळे गावातील लोकांना फायदा होईल व रोजगार सुध्दा मिळेल, असे मत व्यक्त केले.

..७/-

७. श्री दिनकर गु. ठाकरे, बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- जेव्हापासून कंपनी आली आहे, तेव्हापासून कंपनीने गावामध्ये सामाजिक व आर्थिक सुधारणा केलेल्या आहेत. गावामध्ये शुध्द पाणी पुरवठ्याची व्यवस्था केलेली आहे. शौचालय बांधलेले आहेत. रस्त्यावरील खड्डे बुजविले आहेत. कंपनीमुळे रोजगार वाढलेला आहे. दहा गावामध्ये वृक्ष लागवडीचे काम केलेले आहे, असे सामाजिक व आर्थिक विकासाचे कार्य कंपनी करत आहे.

८. श्रीमती ज्योती रामदास बोबडे, बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- जेव्हापासून कंपनी आलेली आहे, तेव्हापासून बेरोजगारांना रोजगार मिळत आहे. शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी कंपनीने वाचनालयाची व्यवस्था केलेली आहे. कंपनी दरवर्षी ५ जून ला पर्यावरणाचा कार्यक्रम घेवून वृक्ष लागवड करते. वृक्षांचे संगोपन करते व संरक्षणासाठी कठड्यांची सुध्दा व्यवस्था करते.

९. श्री कृष्णा रा. बावणे, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- जेव्हापासून लॅन्को कंपनी गावामध्ये आली आहे, तेव्हापासून मांडवा, पुलई व बेलगांव येथील बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे. शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी वाचनालय दिलेले आहे. आरोग्याच्या दृष्टीने शुध्द पाण्यासाठी जल प्रक्रिया केंद्र (R.O. Filter Plant) बसविलेले आहे. आरोग्य चिकित्सेची मोफत सेवा देण्यात येते. गावामध्ये चिखल झालेल्या भागामध्ये मुरुम टाकून स्वच्छ करण्यात आलेला आहे. इ. योजना कंपनी राबवित आहे. असे मत व्यक्त करून कंपनीला समर्थन दिले.

१०. श्री प्रभाकर शामराव मेश्राम, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- कंपनीमुळे तरुणांना रोजगार मिळाला आहे. त्यांच्या सारख्या तरुण बेरोजगारास सुध्दा रोजगार मिळाला आहे.

११. श्री अष्टपाल प. बुरबुरे, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- कंपनीमुळे रोजगार मिळाला आहे. जल प्रक्रिया केंद्र (R.O. Plant) शुध्द पाण्यासाठी बसविला आहे. सौर उर्जा दिवे लावलेले आहेत. फिरता दवाखाना दिला आहे. कंपनीने तिन्ही गावांमध्ये वृक्षलागवड केली आहे व हे कार्य सुरूच आहे.

१२. श्री प्रमोद तुळशीराम लोहकरे, आंजी, ता. व जिल्हा वर्धा.

- त्यांचे गांव कारखान्या पासून ०६ कि.मी. अंतरावर आहे. लॅन्को कंपनीतर्फे कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी अंतर्गत लॅन्को पशुधन विकास प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यानुसार शेतकऱ्यांसाठी कृत्रीम रेतनाची व्यवस्था उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना संकरीत गाय विकत घेणे सोयीचे झाले आहे. त्यामुळे दुध उत्पादनात वाढ होवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. ही कंपनी अगदी चांगली आहे, असे त्यांनी मत व्यक्त केले.

१३. श्री निलेश पारसे, वर्धा, ता. व जि.वर्धा

- या कंपनी मुळे बऱ्याच लोकांना रोजगार प्राप्त झालेला आहे. त्याचप्रमाणे, इतर व्यवसाय जसे, वाहतुकीचे साधने, दुकाने या बाबींना सुध्दा चालना मिळालेली आहे. सुशिक्षीत व इतर मुलांना सुध्दा रोजगार मिळाला आहे. तसेच या ठिकाणी उपस्थित असलेल्या इतरांना सुध्दा भविष्यात रोजगार मिळण्याची संधी आहे. त्यांनी प्रकल्पाला पाठींबा दिला.

..८/-

सदस्यांनी पुन्हा माहिती दिली की, जे व्यक्ती लोकसुनावणी कक्षामध्ये आपले मत मांडत आहेत, ते पुन्हा बाहेरच्या दोन मंडपामध्ये बसून लोकसुनावणीचे कार्यवृत्त बघू शकतात.

१४. श्री स्वप्नील गजाननराव राऊत, आर्वी, जि.वर्धा.

- लॅन्को कंपनी विविध प्रकारच्या योजना राबवित आहे, जसे शौचालय बांधणे, सौर उर्जा दिवे लावणे, बचत गटांना आर्थिक मदत देणे. सुशिक्षीत बेरोजगारांचा रोजगाराचा प्रश्न सोडवित आहे. अशाच योजना कंपनी राबवित राहील, असे मत व्यक्त केले.

१५. श्रीमती पुष्पा झामरे, बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- गावातील आयटीआय शिक्षण प्राप्त केलेल्या मुलांना नोकरी मिळाली पाहिजे. या कंपनीस विरोध नसल्याचे म्हटले. त्यांच्या मुलाला सध्या फक्त रू. २०००/- स्टायफंड मिळत आहे, अशी खंत व्यक्त केली.

१६. श्रीमती शुभांगी बाबाराव सोनटक्के, बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- ही कंपनी आली तेव्हापासून प्रत्येक गावात दवाखान्याची व शुध्द पाण्याची व्यवस्था झालेली आहे. लोकांमध्ये जनजागृती होऊन, रोजगाराची संधी उपलब्ध होत असल्यामुळे मुलांना शिक्षण घ्यावेसे वाटत आहे.

१७. श्रीमती नुतन ओ. गाणार, बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- लॅन्को कंपनीमुळे परिसरातील गावात सुधारणा व सुविधा झालेल्या आहेत. बेरोजगारांना नोकरी मिळालेली आहे व पर्यावरणासाठी झाडे लावणार आहेत.

१८. श्री प्रतिक मून, वर्धा, ता. व जिल्हा वर्धा.

- या प्रकल्पामुळे बरेच फायदे होत आहेत व भविष्यात सुध्दा होणार आहेत. त्यामुळे, त्यांचा या प्रकल्पाला ठाम पाठींबा आहे. या प्रकल्पामुळे शाळा, दवाखाने, रस्ते विकासाच्या सुविधा, सुशिक्षितांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच शेत जमिनीला योग्य भाव मिळणार आहे. तांत्रिक शिक्षण प्राप्त केलेल्या उच्च शिक्षित तरुणांना सुध्दा रोजगारामध्ये प्राधान्य मिळू शकते. त्यामुळे हा प्रकल्प या ठिकाणी यायला पाहिजे.

१९. श्री स्वप्नील मानेकर, वर्धा, ता. व जिल्हा वर्धा.

- सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत आहे. हा कारखाना जर नाही आला तर रोजगार मिळणार नाही प्रत्येक नागरीक पुणे-मुंबई सारख्या शहरामध्ये जावून नोकरी करणेसाठी सक्षम नाही. त्यामुळे, येथे हा प्रकल्प येणे आवश्यक आहे, ज्यामुळे प्रत्येकाला रोजगार सुध्दा मिळेल.

२०. श्री महेंद्र मून, वर्धा, ता. व जिल्हा वर्धा.

- ते स्वत: ऑटो चालक असून, लॅन्को कंपनीमुळे त्यांच्या व्यवसायात वाढ झाली आहे. त्यामुळे, प्रकल्पास पाठींबा दर्शविला.

२१. श्री सुनिल रा. खराबे, पिपरी, जि.वर्धा.

- या प्रकल्पामुळे रोजगार मिळू शकतो. तसेच गावामध्ये सुधारणा होवू शकते. त्यामुळे, त्यांचा या प्रकल्पास पाठींबा आहे.

२२. श्री सचिन सु. कराळे, पिपरी, जिल्हा वर्धा.

- प्रकल्पास त्यांचे समर्थन असल्याचे म्हटले.

२३. श्री किशोर वि. भागवत, पिपरी, त.देवळी, जिल्हा वर्धा.

- त्यांना या प्रकल्पामध्ये नोकरी मिळालेली आहे.

२४. श्री रविंद्र ग. हेलोंडे, पिपरी, जि.जिल्हा वर्धा.

- या क्षेत्रामध्ये हा प्रकल्प आल्यापासून फार फायदा झालेला आहे. वृक्षारोपण, आरोग्य शिबीरे, शैक्षणिक क्षेत्रामध्ये बरेच कार्य झालेले आहे. त्यामुळे, त्यांचे या कंपनीला समर्थन आहे.

२५. श्री महेश प्र. भागवत, पिपरी, जिल्हा.वर्धा.

- हा प्रकल्प मांडवा गावात आल्यापासून त्यांच्यासारख्या सुशिक्षीत बेरोजगारांना या प्रकल्पामध्ये रोजगार मिळाला आहे.

२६. श्री गणेश पंढरीनाथ खराबे, पिपरी, जिल्हा.वर्धा.

- विदर्भामध्ये विजेचा तुडवडा असल्यामुळे, या प्रकल्पाची आवश्यकता आहे. त्यामुळे, या कंपनीस समर्थन आहे.

२७. श्री दिनेश ता. खराबे, पिपरी, जिल्हा.वर्धा.

- हा प्रकल्प आल्यापासून बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे. त्यामुळे, या कंपनीस समर्थन आहे.

२८. श्रीमती सुषमा जीवनराव गोंधळे, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- कंपनीतर्फे आल्याचे त्यांनी सांगितले. ही कंपनी येथे हवी असल्याचे मत व्यक्त केले.

२९. श्रीमती शोभा वाघ, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- या प्रकल्पामध्ये त्यांच्या मुलांना रोजगार मिळावा म्हणून त्या येथे आलेल्या आहेत. असे सांगितले.

३०. श्री रितेश वसंतराव खरकाटे, आर्वी, ता. व जिल्हा वर्धा.

- या प्रकल्पामुळे बेरोजगारांना रोजगार मिळेल.

३१. श्री नितीन कुटे, बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- ही कंपनी आल्यापासून परिसरामध्ये बराच बदल झालेला आहे. २ वर्षापुर्वी असलेली परिस्थिती बदलेली असून बेरोजगारांना रोजगार मिळत आहे.

अध्यक्ष श्री हरीश धार्मीक यांनी प्रकल्पामुळे पर्यावरण विषयक परिणामांवर बोलण्याचे आवाहन केले. सभामंडपात फक्त नांवे पुकारलेल्या व्यक्तिंनीच बसावे. त्यांचे मत मांडल्यानंतर बाहेरच्या मंडपामध्ये बसावे अशा सूचना केल्यात. यावर, उपस्थित असलेल्या पत्रकारांनी हरकत घेवून, लोकसुनावणीच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता असावी असे सांगितले व कार्यवृत्ताची माहिति घेणेसाठी लोकसुनावणी कक्षामध्ये बसण्याची परवानगी मागितली.

..१०/-

त्यावर, मा. अध्यक्षांनी सांगितले की, बाहेरील मंडपामध्ये चित्रफित व ध्वनीक्षेपकासह व्यवस्था केली असून, त्या ठिकाणी बसून सुध्दा कार्यवृत्ताची माहिती घेण्यात येवू शकते. तसेच, या कार्यवृत्ताची चित्रफित बनविण्यात येत असून ती ग्रामपंचायत व इतर ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे, ज्यांना या लोकसुनावणीमध्ये मत मांडायचे किंवा बोलायचे आहे, त्यांनी प्रथम त्यांच्या नावाची नोंद करावी, असे सांगितले.

या दरम्यान लोकसुनावणीमध्ये उपस्थित असलेल्या एका महिला व्यक्तीने सांगितले की, त्यांनी त्यांच्या नावाची नोंद केलेली आहे व त्या पर्यावरण व विज्ञान केंद्र, नवी दिल्लीचे प्रतिनिधीत्व करतात. त्यांनी असा आक्षेप घेतला की, अद्यापपर्यंत ज्या नागरीकांनी मते मांडली आहे, त्यांनी प्रकल्पाविषयीच (रोजगार व सामाजिक सुविधा) मत मांडले आहे. मात्र, ही जनसुनावणी पर्यावरण विषयाशी संबंधित असलेली (पर्यावरण आघात मुल्यांकनाशी संबंधित) जनसुनावणी असून ही सामाजिक मुल्यांकनाची लोकसुनावणी नाही. आणि ज्या पध्दतीने ही जनसुनावणी सूरू आहे, त्यानुसार, त्यांना मत मांडायची संधी मिळेल किंवा नाही, याची खात्री नाही, असे सांगितले.

तसेच उपस्थित असलेल्या टाईम्स ऑफ इंडियाच्या पत्रकाराने सुध्दा आक्षेप घेतला की, ही जनसुनावणी अशाप्रकारे चालविण्याचे पुर्वनियोजितच आहे, असे निदर्शनास येते. त्यांनी पुढे असा प्रश्न केला की, ही जनसुनावणी नियमानुसार प्रकल्प स्थळी घेणे आवश्यक होते, तेव्हा प्रकल्प स्थळापासून २५ कि.मी. अंतरावर का घेण्यात येत आहे?

त्याचप्रमाणे, उपस्थित असलेल्या आणखी एका महिला नागरीकाने आक्षेप घेतला की, ज्या नागरीकांनी अद्यापपर्यंत आपली मते मांडलेली आहेत, त्या सर्व नागरीकांना कारखान्याने त्यांच्या बाजूने मते मांडण्यासाठी येथे बोलावले आहे, असे दिसून येते. ज्याप्रकारे, या नागरीकांना बोलण्याची संधी देण्यात येत आहे, त्यामुळे, इतर नागरीकांना मते मांडण्याची शक्यता दिसून येत नाही. यावर सदस्यांनी खुलासा केला की, ज्या नागरीकांनी त्यांचे नांव प्रथम मप्रनि मंडळाच्या कार्यालयात नोंदविले आहे, त्याची यादी तयार केलेली असून, निवेदनाच्या अर्ज प्राप्तीच्या दिनांकानुसार नागरीकांना मते मांडण्यासाठी बोलविण्यात येत आहे. ही जनसुनावणी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घेण्यात येत असून अपेक्षा व्यक्त केली की, जनसुनावणी सुरू राहू द्यावी. त्याचप्रमाणे, त्यांनी असेही सांगितले की, या जनसुनावणीमध्ये सर्वांना मते मांडण्यासाठी संधी मिळणार आहे. मात्र, ज्यांनी प्रथम निवेदन दिली आहेत, त्यांचे म्हणणे अगोदर ऐकुण घेणार आहे. ज्यांनी आज निवेदने दिली आहेत, त्यांचे सुध्दा म्हणणे ऐकुण घेणार आहे. तसेच, ज्यांनी निवेदने / आक्षेप दिलेली नाहीत, परंतु आज या लोकसुनावणीसाठी उपस्थित आहेत, त्यांचे म्हणणे सुध्दा ऐकुण घेणार आहे.

टाईम्स ऑफ इंडियाच्या पत्रकाराने पुन्हा आक्षेप घेतला की, अद्यापपर्यंत ज्या नागरीकांनी आपली मते मांडली आहेत, त्यांना पर्यावरण विषयक लोकसुनावणीचा विषय सुध्दा माहिती नाही व पत्रकारांना बाहेर पाठविण्याचे काहीच कारण नाही, असे सांगितले. त्यावर मा.अध्यक्षांनी पत्रकारांना लोकसुनावणीच्या कक्षामध्ये बसण्यासाठी परवानगी दिली. तसेच, अतिरिक्त पोलिस अधिक्षकांनी सूचना केल्यात की, लोकसुनावणीच्या कक्षामध्ये तीन पत्रकारा व्यतिरिक्त ज्या इतर लोकांना लोकसुनावणी कक्षामध्ये अद्याप बोलविलेले नाही, त्यांनी कृपया बाहेर बसावे व लोकसुनावणीमध्ये अडथळा निर्माण करू नये. तद्नंतर, लोकसुनावणीमध्ये नागरीकांचे मते मांडणे पुन्हा सुरू झाले.

३२. श्री गणेश वा. कडू, वर्धा, जिल्हा वर्धा.

- या कंपनीमुळे भार नियमनाची समस्या समाप्त होणार आहे. या भार नियमनाच्या समस्येमुळे वर्धा जिल्ह्यातील १०वी व १२वी वर्गातील मुलांच्या अभ्यासावर परिणाम होवून निकालावर परिणाम झाला आहे. त्यामुळे, ही कंपनी येथे यावी. त्यांचे या कंपनीस समर्थन आहे, असे सांगितले.

३३. श्री निलेश रामेश्वर तिमांडे, चितोडा, जि.वर्धा.

- या कंपनीमुळे भार नियमनाचे प्रमाण कमी होणार असल्यामुळे, त्यांचे लॅन्को कंपनीला समर्थन आहे.

३४.श्री प्रतिक वि. कारमोरे, वर्धा, जिल्हा वर्धा.

- ही कंपनी पर्यावरणाविषयी कार्य करीत आहे व प्रत्येक वेळेस याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. त्यांचे या प्रकल्पास समर्थन आहे.

३५. श्री विशाल थूल, वर्धा, जिल्हा वर्धा.

- कोणतीही कंपनी गावामध्ये स्थापित करण्यापुर्वी नियमांची पुर्तता करावी लागते. त्यासाठी कंपनीकडे कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी हाताळणारे विभाग असते. नियमाची पुर्तता केल्याशिवाय कंपनीला परवानगी देता येत नाही. याबाबत, केंद्र शासनाचे विविध विभाग तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळ निगरानी ठेवत असते.

- खाजगी कारखाने, शासनाचे सहकारी क्षेत्रातील कारखाने, तसेच रहिवाशी क्षेत्रामध्ये विज पुरवठ्याची आवश्यकता असते. मात्र, बऱ्याच ग्रामीण भागामध्ये विज उपलब्ध नाही. या प्रकल्पामुळे भार नियमन या समस्येचे निराकरण होणार आहे.

- ही कंपनी प्रदूषण नियंत्रणासाठी त्यांच्या जबाबदारी नुसार कार्य करीत आहे. हवा प्रदूषण नियंत्रण, जल प्रदूषण नियंत्रण तसेच मातीचे प्रदूषणावर नियंत्रण केले जाते.

- बापू कुटीचा उल्लेख करून त्यांनी सांगितले, सर्वसाधारणपणे असा समज आहे की, प्रदूषणामुळे बापू कुटीच्या पर्यावरणावर परिणाम होतो.

सदस्यांनी हस्तक्षेप करून सूचना केल्या की, त्यांनी या प्रकल्पाच्या पर्यावरणाविषयी मुद्दे मांडावेत.

- संबंधित व्यक्तीने गुजरात राज्याच्या विकासाचे उदाहरण देवून, असे मत व्यक्त केले की, या परिसरामध्ये येणाऱ्या प्रकल्पाचे समर्थन केले पाहिजे. त्यांनी या प्रकल्पाचे समर्थन केले.

३६. श्री विठ्ठल रामभाऊ लोखंडे (शेतकरी), बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- ही कंपनी त्यांचे गावाला लागूनच स्थापित होत असून प्रकल्पाचे क्षेत्र गावाजवळ ५०० मीटर पर्यंत आलेले आहे. त्यांचे गांव विद्युत प्रकल्पाच्या पुर्व दिशेस असून, विद्युत प्रकल्पापासून गावाच्या दिशेने जमिनीचा उतारआहे. त्यामुळे, या कपंनीमुळे त्यांच्या गावाला प्रदूषणाची दाट शक्यता असून, संभाव्य प्रदूषणाबाबत खालील मुद्दे मांडले.
- प्रकल्पातुन निघणारा धुर.
- प्रकल्पातुन निघणारी राख.
- प्रकल्पातुन निघणारे प्रदूषित पाणी.
- प्रकल्पातुन निघणाऱ्या राखेमुळे निर्माण होणारे ढिगारे.
- प्रकल्पाकरीता लागणारा कोळसा.
- प्रकल्प उभारण्याचे कार्य करण्यासाठी उभारण्यात आलेले उच्च क्षमतेचे विजेचे दिवे.

- कंपनीने गांवात लावलेले सौरउर्जा दिवे बंद पडले आहेत.
- गावातील जनावरे पुर्वी चाऱ्यासाठी पहाडावर जात होते. मात्र, कंपनीने भिंतीचे कुंपण घातल्यामुळे जनावरांना तेथे जाणे शक्य नसल्यामुळे चारा मिळत नाही. त्यामुळे, दूधाच्या उत्पादनामध्ये घट होण्याची शक्यता आहे.
- पर्यावरणासाठी कंपनीने लावलेल्या झाडांपैकी ७० टक्के झाडे सुकली आहेत.
- प्रकल्पाच्या प्रदूषणाच्या संभाव्य धोक्यामुळे होणारी नुकसान भरपाई गावकऱ्यांना / शेतकऱ्यांना मिळणेसाठी कंपनीने न्यायालयातुन हमीपत्र तयार करून ते ग्रामपंचायत कार्यालयाला व जिल्हाधिकारी कार्यालयाला द्यावे.
- कंपनीने गावकऱ्यांना व शेतकऱ्यांना कोणतीही पुर्व सूचना न देता दलाला मार्फत परिसरातील शेतकऱ्यांची जमीन विकत घेतली आहे.

उपरोक्त बाबींमुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत त्यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली.

- हवेची दिशा साधारणपणे पूर्व-पश्चिम असून त्यामुळे, विज प्रकल्पाच्या बाष्पकाच्या धुराड्यातुन उत्सर्जित होणारे धुळीकण परीसरातील त्यांच्या सुपीक शेत जमीनीवर व गावातील घरांवर साचेल. त्यामुळे, गावांतील लोकांवर प्रदूषणाचा परिणाम होईल. तसेच शेतजमिनीचे प्रदूषण होवून शेतपिकाचे उत्पन्न घेता येणार नाही.
- औष्णिक विद्युत प्रकल्पातुन निघणारी राख बेलगांव गावाच्या दिशेला टाकून त्याचे ढिगारे तयार होतील व हवेमुळे ढिगाऱ्यातील धुळीकण गावामध्ये साचतील. हवेमुळे ढिगाऱ्यावरील धुळीकण गावांमध्ये वाहत येवून गावकऱ्यांना प्रदूषणाचा त्रास होईल.
- प्रकल्पातुन निघणारे प्रदूषित पाणी गावाच्या दिशेने वाहत येवून, गावनदीमध्ये एकत्रित होईल. त्यामुळे, गावामध्ये असलेल्या विहिरी व हातपंपाच्या पाण्याचे प्रदूषण होवून गावकरी व जनावरांना असाध्य रोगांचा प्रादुर्भाव होवू शकतो. उदा. मनुष्याला कर्करोग, दमा, घशाचे व चर्मरोग आजार व पाळीव जनावरांना एकटांग्या, घटसर्प, तोंडखुरीसारखे आजार होतील.
- विद्युत प्रकल्पासाठी लागणारा कोळसा जमिनीवर साठविण्यात येईल. त्यामुळे, कोळसा जमिनीवर साठविण्याच्या क्रियेमधून तसेच कोळसा इतरत्र प्रकल्पाकरीता स्थलांतरीत करतांना बारीक धुळीकण गावाच्या दिशेने वाहत येवून गावकऱ्यांना प्रदूषणाचा त्रास होईल.
- या औष्णिक विद्युत प्रकल्पाचे रात्रीचे कामकाजाकरीता उच्च क्षमतेचे प्रभावशाली विजेचे दिवे उभारलेले आहेत. या दिव्यांची संख्या साधारणपणे २००० असून, रात्री ७ वाजेपासून ते सकाळी ७ वाजेपर्यंत सुरू असतात. त्यामुळे, पिकाच्या पराग सिंचनाकरीता येणारे मित्रकिड शेतामध्ये येत नाही. त्यामुळे, पिकाचे उत्पादन कमी झालेले आहे. उदा. त्यांची शेती प्रकल्पाच्या कामगार वसाहतीला लागून आहे. तेथे त्यांचा संत्र्याचा बगीचा आहे. मात्र, बिजेच्या दिव्यांच्या प्रकाशामुळे व उष्णतेमुळे यावर्षीचा संत्र्याच्या आंबीया बहार नष्ट झालेला आहे, ही बाब त्यांनी लेखी स्वरूपात प्रकल्पधारकाच्या नजरेस आणून नुकसान भरपाईची मागणी केली होती. मात्र, प्रकल्पधारकाने कोणतीही नुकसान भरपाई दिलेली नाही. तसेच समाधानकारक उत्तरे दिलेली नाहीत. या पावसाळी हंगामामध्ये ते सोयाबीन, कपास, तुर, ज्वारीचे पिक घेणार आहे. मात्र, प्रकाशाच्या प्रादुर्भावामुळे उत्पादनात घट झाली तर, त्याची नुकसान भरपाई प्रकल्पधारकाने द्यावी अन्यथा, त्यांना आत्मदहनाचा मार्ग स्विकारावा लागेल, असे सांगितले.
- प्रकल्पाच्या कुंपनाजवळ शेतकऱ्यांच्या शेतजमिनी आहेत. त्यामुळे, या सर्व समस्यांचा विचार करून शेतकऱ्यांच्या शेतजमिनींच्या नुकसान भरपाईची तरतुद प्रकल्पास दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्रामध्ये करावी, असे त्यांनी सुचविले. याबाबत, त्यांनी लेखी निवेदन सादर केले. त्यांचा कंपनीला विरोध आहे.

- त्यांनी आरोप केला की, यापुर्वी ज्या लोकांनी मत व्यक्त केले आहे, त्या सर्वांना कंपनीने त्यांच्यातर्फे बोलण्यासाठी आणलेले होते.

३७. श्री रामचंद्र उदेभानजी उडदे , बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- त्यांची शेतजमिन कंपनीच्या बाष्पकापासून ५० फुट अंतरावर आहे. त्यांची एक सामुहिक विहिर कंपनीने बुजविली असून, पाईपलाईन सुध्दा तोडलेली असल्यामुळे त्यांच्या शेतातील ओलीत बंद झाले आहे.
- त्यांच्या शेताच्या तिन्ही बाजूला ७ फूट खोल जमीन खोदलेली आहे व एका बाजूला १० फुट उंचीचा ढिगारा आहे. त्यामुळे पावसाचे पाणी शेतामध्ये मुरत नाही. त्यामुळे, पावसाळा संपल्यावर त्यांच्या शेतातील पिके पाण्याअभावी नष्ट झालेली आहेत. तसेच कापसाचे उर्वरीत पिक सुध्दा कंपनीतील वाहनांच्या वाहतुकीच्या प्रदूषणामुळे व दिव्यांच्या प्रकाशामुळे नष्ट झालेले आहे. त्यामुळे, त्यांना कोणत्याही पिकांचे उत्पन्न मिळालेले नाही. याबाबत कंपनीकडे तक्रार केली असता, त्यांनी योग्य उत्तर दिलेले नाही. त्याचप्रमाणे, विहिरीच्या बाबतीत शासकीय विभागाकडे तक्रार केली असता, त्यांच्याकडून सुध्दा काहीही प्रतिसाद मिळाला नाही.

३८. श्री दिनेश रामचंद्र उडदे, बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- त्यांची मौजा-मांडवा येथे शेती असून, वर्धा ते मांडवा रोडवर कंपनीकडे जाण्यासाठी पोहोच रस्ता बांधलेला आहे. या ठिकाणाहून पाणी बाहेर जाण्यासाठी पाईपलाईन टाकून सुविधा केली आहे. मात्र मागीलवर्षी हंगामात हे पाणी बाहेर न जाता त्यांच्या शेतामध्ये शिरल्यामुळे शेतातील पिक उध्वस्त झालेले आहे. याबाबत नुकसान भरपाईसाठी त्यांनी कंपनीकडे निवेदन दिले होते. परंतु, त्यांना अद्यापपर्यंत नुकसान भरपाई मिळालेली नाही. याबाबत कंपनीने त्यांना शासनाच्या विविध विभागाकडे जसे, कृषी विकास अधिकारी व उपविभागीय अधिकारी यांचेकडे निवेदन देण्यासाठी सांगुन ४ महिन्यापासून नुकसान भरपाई देणेसाठी टाळाटाळ करीत आहे.
- कंपनीला केंद्र शासनाकडून मिळालेल्या TOR मध्ये असा उल्लेख केला आहे की, कारखान्याच्या सिमेभोवताल १०० मीटर परिसरात झाडे लावावे. मात्र, कारखान्याने झाडे न लावता सिमाभिंत उभारण्याचे कार्य सुरू केले आहे. याबाबत, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सुध्दा पुर्वी निवेदन दिले होते. तसेच खोदकाम केल्यामुळे त्यांचे शेतामध्ये जाणे-येणे शक्य होत नाही, शेतजमिनीचे ओलीत सुध्दा बंद झाले आहे.

सदस्यांनी, याबाबत प्रकल्पधारकास खुलासा करण्याच्या सूचना केल्या.

प्रकल्पधारकाने सांगितले की, झाडे लावण्याचे कार्य १ आक्टोबर २०११ पासून सुरू करून ३१ मार्च २०१२ पर्यंत झाडे लावलेली आहेत. मात्र, पुढील उन्हाळ्याचे दोन महिनामध्ये झाडे लावलेली नाहीत. या कालावधीमध्ये झाडांचे संगोपन व संरक्षणाची व्यवस्था केली आहे. कंपनीने केलेल्या वृक्षलागवडीचे छायाचित दाखविण्यात आलेले होते. या विषयाची शहानिशा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ करू शकते.

वक्त्याने पुन्हा आक्षेप घेतला की, कंपनीने रस्त्यावर चारही बाजुने १० फुट खोल खोदकाम केले असल्यामुळे, शेतात जाणे-येणे बंद झालेले आहे. तसेच शेतजमिनीचे ओलित सुध्दा बंद झालेले आहे. तसेच कंपनीने विहिर सुध्दा बुजविलेली आहे. या सर्व बाबी कंपनीने कोणाच्या परवानगीने केलेल्या आहेत? असा प्रश्न उपस्थित केला. तसेच, त्यांचेकडे यासंबंधी पुरावा म्हणून छायाचित्र असल्याचे सांगितले.

..१४/-

यावर, प्रकल्पधारकाने खुलासा केला की, कुणाचाही रहदारीचा रस्ता कंपनीने बंद केलेला नाही.

संबंधित वक्त्याने सांगितले की, जमिन अधिग्रहण करणेपुर्वी स्वतः कंपनीतर्फे ग्रामवासीयांशी करारनामा करण्यात येईल, असे कंपनीने लिहून दिले होते. मात्र, असे न करता जमिन अधिग्रहणासाठी कंपनीने थेट नोटीस पाठविलेली आहे. याबाबत, अध्यक्षांनी वक्त्यास सूचना केली की, त्यांनी पर्यावरण विषयक मुद्दे मांडावे. मात्र, वक्त्याने या विषयाबाबत कंपनीकडे विचारणा करणेसाठी आग्रह धरला. त्यावर सदस्यांनी वक्त्यास सांगितले की, त्यांच्या मुद्यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

३९. श्री अमोल अमृतराव गायकी, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- लोक सुनावणी ही लोकांसाठी असते. मात्र, असे दिसून येते की, या लोकसुनावणीमध्ये कमीतकमी शेतकरी आलेले आहेत व जास्तीत जास्त कंपनीचे कर्मचारी आहेत. अद्यापपर्यंत, ज्यांनी आपले मत मांडलेले आहेत ते सर्व कंपनीचे कर्मचारी होते. त्या सर्वांनी कंपनीच्या बाजुने आपली मते मांडलेले आहेत. मात्र, यापैकी कुणीही पर्यावरणाबद्दल मत मांडलेले नाही. ही लोकसुनावणी पर्यावरण विषयी असल्यामुळे इतर विषय कसे काय मांडण्यात आले? याचे उत्तर मागितले.

यावर, सदस्यांनी वक्त्यास सूचना केल्या की, त्यांचे स्वतःचे मत मांडावे. तसेच, अध्यक्षांनी सांगितले की, येथे मते मांडण्यासाठी आलेले वक्ते काय बोलणार आहेत, याची त्यांना कल्पना नसते.

त्यानंतर वक्त्याने खालील मते मांडली -

- ही कंपनी कोळशाचा वापर करणार असल्याने कोळशापासून धूळ निर्माण होऊन, पुलई, बेलगांव, मांडवा गावांवर परिणाम होणार आहे. या प्रदुषणाचा शेतीवर परिणाम झाल्यास कोण जबाबदार राहील? अशी विचारणा केली. शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह शेतजमिनीवर आहे. या कंपनीच्या प्रदूषणामुळे शेतजमिन नष्ट झाल्यास, शेतकऱ्यांच्या उपजिविकेवर परिणाम होईल.
- कंपनीने फार कमी लोकांना तात्पूरती नोकरी दिली असून कायमस्वरुपी नोकऱ्या दिलेल्या नाहीत. लोकांना कायमस्वरूपी नोकरी देण्याची मागणी केली.
- कंपनी धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी घेणार आहे. मात्र, कंपनीतुन निर्माण होणाऱ्या प्रदूषित पाण्यामुळे शेतजमिनीचे नुकसान होणार आहे, आरोग्यावर परिणाम होणार आहे. तसेच पिण्याचे पाणी प्रदूषित होणार आहे. या सर्व बाबीसाठी कंपनी किंवा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा महाराष्ट्र शासन जबाबदार राहणार आहे काय? अशी विचारणा केली.
- कंपनीने मोठया प्रमाणात परिसरातील झाडांची कत्तल केलेली असून फारच कमी प्रमाणात कमी जागेत झाडे लावलेली आहेत. सध्या लावलेली ही झाडे छोटी आहेत. त्यामुळे, त्यांच्यापासून कमी प्रमाणात ऑक्सीजन मिळेल. तसेच, ही झाडे मोठे झाल्यावर सुध्दा कारखान्यातुन उत्सर्जन होणाऱ्या कार्बनडाय ऑक्साईडमुळे प्रभावित होतील व त्यामुळे या झाडांमधून ऑक्सिजनचे उत्सर्जन होणार नाही.
- कंपनीने शेत जमीन धोकाधडीने दलालामार्फत कमी भावात घेतलेली आहे. तसेच शेतकऱ्यांकडून वेगेवेगळ्या भावाने जमिन घेतलेली आहे. कंपनीला गावाचा विकास करावयाचा होता तर त्यांनी ग्रामपंचायतीला नोटीस देवून, तसेच ग्रामवासीयांना विश्वासात घेवून शेतजमिन कां विकत घेतली नाही? असा प्रश्न उपस्थित केला. कंपनीला फक्त मोजक्या लोकांचे हित साधायचे असून, इतर लोकांचा विचार केलेला नाही.
- कंपनीने शेतकऱ्यांचे पांदण व रस्ते बंद केलेले आहेत. याबाबत, त्यांनी संबंधीत शासकीय विभागाकडे तक्रारी केल्या आहेत.

- सदरील प्रकल्प धोकादायक असल्याचे सांगितले.
- सदरील जाहीर लोक सुनावणी प्रकल्पापासून २० कि.मी. अंतरावर का घेण्यात आली? ही सुनावणी पेरणीच्या हंगामात घेण्यात आलेली आहे, तसेच या जनसुनावणीत शेतकरी फार कमी प्रमाणात आलेले आहेत. त्यामुळे सदरील जाहीर लोक सुनावणी परिसरातील शेतकऱ्यांसाठी नसून कंपनीच्या लोकांसाठी असल्याचे सांगून प्रकल्पास विरोध दर्शविला.

४०.श्री सुरेशराव तुकारामजी गायकी, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- या कंपनीमुळे परिसरातील मजुरांना रोजगार मिळाला. परंतु मजुर वर्ग कंपनीमध्ये कामाला जात असल्यामुळे शेतकामासाठी उपलब्ध होत नाही. त्यामुळे, शेती टिकविण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे, त्यांना बैलजोडी सुध्दा विकावी लागली.
- कंपनीने थोडाफार विकास केल्यामुळे गावामध्ये सुधारणा झाल्या आहेत, असे म्हणता येणार नाही. ५-५० लोकांना रोजगार देऊन, ४-५ लोकांसाठी गावामध्ये संडास बांधले म्हणजे ग्रामविकास झाला असे समजायचे काय? असा प्रश्न उपस्थित केला.
- या कंपनीसाठी ज्यांची जमिन गेलेली आहे, त्या शेतकऱ्याला रोजगार मिळालेला नाही. मात्र, इतरांना मिळालेला आहे.
- कंपनीच्या कुंपणामुळे जंगली जनावरे शेतीमध्ये येवुन शेतपिकांचे नुकसान करतात.
- कंपनी पासून पुलई हे गांव फक्त १ फर्लांगावर असल्याने दोन्ही गावांपेक्षा (मांडवा व बेलगांव) पुलई गावास सर्वात जास्त प्रदूषणाचा त्रास आहे.
- कंपनीच्या प्रदूषणामुळे त्यांच्या जमिनीमध्ये पिकाचे उत्पादन झाले नाही, तर यासाठी, कंपनीने नुकसानभरपाई बाबत करार करुन द्यावा. शेतजमिनीमध्ये पिकाचे उत्पादन झाले नाही तर त्यांना आत्मदहना शिवाय पर्याय राहणार नाही असे सांगितले.

४१. ॲड. श्री अमोल चंद्रकांत कोटंबकर, वर्धा. जिल्हा वर्धा.

- लॅन्को विदर्भ थर्मल औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या समर्थनार्थ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे निवेदन दिले आहे.
- सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्यामध्ये विज उत्पादनापेक्षा विजेची गरज जास्त प्रमाणात असल्यामुळे, विज टंचाईचा प्रश्न भेडसावत आहे. त्यामुळे, महाराष्ट्र राज्यास इतर राज्यांकडून विज विकत घ्यावी लागत आहे.
- देशाची लोकसंख्या वाढलेली असल्यामुळे विजेची गरज सुध्दा वाढलेली आहे. विज ही अन्न, वस्त्र, निवाऱ्याप्रमाणे अत्यावश्यक झालेली आहे. अशा परिस्थितीत हा औष्णिक विद्युत प्रकल्प वर्धा जिल्ह्यात येत आहे, ही महाराष्ट्र राज्यासाठी चांगली बाब आहे.
- कंपनी प्रदूषण नियंत्रणासाठी योग्य उपाययोजना करीत असून भविष्यात सुध्दा काळजी घेईल असा विश्वास असल्याचे सांगितले.
- राज्याचा व देशाचा विकास करावयाचा असल्यास, विज ही आवश्यक आहे. विजेची गरज अशा प्रकल्पामुळेच पुर्ण होवू शकेल.

४२. श्री सुभाष पंजाबराव शिंदे, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- लॅन्को औष्णिक विद्युत प्रकल्प हा कोळशावर आधारीत आहे. कोळशाच्या वाहतुकीमुळे, धुरामुळे तसेच राखेमुळे हवेचे प्रदूषण होणार आहे. यासाठी कंपनीने आता झाडे लावणे सुरू केलेले आहे. मात्र, हे झाडे मोठे होण्यासाठी ५० वर्षे लागतील, तोपर्यंत प्रदूषण कसे रोखणार? अशी विचारणा केली.

४३.श्री भास्कर दादाराव इथापे, वर्धा, जिल्हा वर्धा.

- वर्धा शहराच्या सिमेपासुन १२ कि.मी. अंतरावर विदर्भ लॅन्को थर्मल पॉवर कंपनीची स्थापना होत आहे. या उद्योगामुळे प्रदूषण होणार आहे, याची कल्पना शासनाला, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला तसेच न्यायालयाला सुध्दा आहे. ही बाब उद्योजकाच्या व्यवस्थापनाने मान्य केली आहे की, प्रदर्शित केलेल्या नकाशानुसार प्रकल्पस्थळापासून १२ कि.मी. पर्यंत त्रिज्येमध्ये पर्यावरणाचा नाश होणार आहे. या १२ कि.मी. परिसरामध्ये एकुण ८४ गावांचा समावेश असून त्यापैकी, फक्त ३ गावांतील नागरीक, जे प्रकल्पामध्ये कंत्राटी पध्दतीने नोकरी करीत आहे, ते येथे येवून आपली मते मांडत आहेत व प्रकल्पाचे समर्थन करतात. त्यांनी अध्यक्षांना विनंती केली की, या कारखान्यातुन निर्माण होणाऱ्या टाकावू पदार्थामुळे प्रदूषण होणार आहे किंवा प्रदूषण होणार नाही हे सिध्द करू शकणाऱ्या नागरीकांचीच मते ग्राह्य धरण्यात यावी. या व्यतिरिक्त ज्यांनी आपली मते नोंदविली आहे, ती ग्राह्य धरल्यास याबाबत, आपणाविरुध्द न्यायालयात दाद मागावी लागेल. याबाबत समितीने आपला निर्णय द्यावा.

- वाहनांमधुन अल्पशा प्रमाणात कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन होत असून सुध्दा नागरीक प्रदूषणग्रस्त आहेत. या कारखान्यामध्ये ७ लाख टन प्रती महिना कोळसा जळणार आहे. त्यामुळे, निर्माण होणारी राख, धुर इत्यादीमुळे प्रदूषण होवून नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होणार आहे. वर्धा शहर हे स्वच्छ व सुंदर शहर असून फक्त १२ कि.मी. अंतरावर हा प्रकल्प उभारणे योग्य नाही. विजेची व उद्योगाची गरज असल्यास, अशा प्रकारचे प्रकल्प ज्या जिल्ह्यांमध्ये निर्जन वस्ती आहे, जेथे अगोदरच वृक्ष लागवड झालेली आहे, वनसंपदा आहे, जेथे प्रदूषण नियंत्रणाची साधने उपलब्ध आहेत, अशा ठिकाणी हा कारखाना उभारावा. यासाठी, त्यांचा विरोध नाही. मात्र, शहराच्या जवळ जेथे सुपिक जमिनी आहेत व ज्या शहरातुन सुंदर नद्या वाहतात, अशा ठिकाणी या प्रकल्पास आमचा विरोध आहे.

- या प्रकल्पातील / कोलवॉशरीज मधून निघणारे प्रदूषित पाणी उद्योगाच्या पूर्व व दक्षिण दिशेला वाहणार आहे. या कारखान्यापासून अंदाजे १० कि.मी अंतरावर पुर्व दिशेला धाम नदीवर असलेल्या महाकाली धरणातुन, परिसरातील ५० गावांना व वर्धा शहराला पाणी पुरवठा होतो. मात्र, सांडपाणी प्रथम धाम नदीमध्ये मिसळणार आहे. त्यामुळे, सांडपाणी या परिसरातील एक लाख पन्नास हजार लोकांच्या पिण्याच्या पाण्यामध्ये मिश्रित होणार आहे. त्यामुळे , सर्वप्रथम या सांडपाण्याचा विपरीत परिणाम या परिसरातील एक लाख पन्नास हजार लोकांच्या पिण्याच्या पाण्यावर होणार आहे. या सांडपाण्याचा परिणाम पशु, पक्षी व वन्यजिवनांवर होणार आहे. दुष्काळ परिस्थितीत या पशु, पक्षी, वन्यजीव यांना या प्रकल्पातुन निघालेले सांडपाणी पिण्याशिवाय पर्याय राहणार नाही. या बाबीचा परिणाम वन्यजीव व मनुष्यांच्या जिवनावर सुध्दा होणार आहे.

- कंपनीचे दुषित पाणी १२ कि.मी. वर असणाऱ्या यशोदा नदीमध्ये सुध्दा मिसळणार आहे. हे सांडपाणी वेणा नदीमध्ये व वर्धा नदीमध्ये सुध्दा मिसळेल. त्यामुळे, लॅन्को औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या सांडपाण्यामुळे वर्धा शहरापासून ४० ते ५० कि.मी. चा क्षेत्रामध्ये परिणाम होईल. लॅन्को कंपनी वर्धा नदीवरील निम्न वर्धा प्रकल्पामधून पाण्याचा उपसा करणार आहे. मात्र, वर्धा नदीमध्येच सांडपाण्याची विल्हेवाट करणार असल्यामुळे, त्याच्या परिणामाच्या विषयाबाबत चर्चा करणे आवश्यक आहे.

- या प्रकल्पामधून निघणारा धूर व धुळीकण वर्धा शहराच्या दिशेने (दक्षिण-पूर्व) वाहणार आहे. त्यामुळे, वर्धा शहरावर सतत धुळीचे आच्छादन राहणार आहे. याबाबत, त्यांनी उत्तम गॅल्वा व लॉयड स्टील कारखान्याचे उदाहरण देवून तेथील शेतकरी प्रदूषणाचे परिणाम भोगत आहे, असे सांगितले.

- या प्रकल्पामुळे प्रभावित होणारे शेतकरी या लोकसुनावणीमध्ये त्यांचे मत मांडण्यासाठी येवू नये, यासाठी ही लोक सुनावणी पेरणीच्या हंगामात आयोजीत केलेली आहे. यासाठी, प्रशासन व प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रकल्प धारकास मदत करीत असल्यामुळे, त्यांनी लोकसुनावणीचा निषेध केला व लोकसुनावणी रद्द करण्याची मागणी केली. त्याचप्रमाणे, लोकसुनावणीच्या स्थळापासून सर्वात जास्त अंतरावर प्रभावित असलेले गांव ५० कि.मी. अंतरावर आहे व सर्वात कमी अंतरावर असलेले प्रभावित गांव १५ कि.मी. अंतरावर आहे. १५ कि.मी. ते ५० कि.मी. अंतरावर असलेल्या लोकांना लोकसुनावणीच्या स्थळी आणण्यासाठी वाहतुकीची काय सुविधा केली? असा प्रश्न विचारला. या लोकसुनावणीबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी गावांगावामध्ये जाहिरनामा देणे, दवंडी पिटवणे, ग्रामपंचायतीमध्ये सभा घेणे, ही जबाबदारी मप्रनि मंडळाची होती. फक्त वृत्तपत्रांमध्ये सूचना देणे ही बाब पुरेशी नाही. त्यामुळे, या लोकसुनावणीमध्ये अल्प मताने लोक आल्यामुळे ही लोकसुनावणी बहूमताची नाही. हा प्रकल्प ग्रामिण भागातील असल्यामुळे, लोकसुनावणी प्रदूषण प्रभावित क्षेत्रामध्ये घेणे आवश्यक आहे.

त्यामुळे, सदरील लोक सुनावणी अल्पमताची असून खारीज करावी / रद्द करावी व लोक सुनावणी पुन्हा प्रभावित क्षेत्रामध्ये घेण्यात यावी असे सुचविले.

४४. श्री प्रविण अशोकराव देशमुख, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- प्रकल्पाचा कोळसा जेथे -जेथे साठविणार /हाताळणार आहे त्या जागेपासून त्यांचे शेत जवळ आहे. त्यांनी प्रकल्प धारकास विनंती केली की, प्रकल्पामुळे त्यांचे शेता मध्ये प्रदूषण होणार नाही याची शहानिशा करून द्यावी.
- प्रकल्पाच्या बोल्डर व मुरुमांची टिपलर व्दारे वाहतुकी मुळे पुलई गांवास आवाजाचा मोठा त्रास होतो. त्यामुळे, तेथील जनावरे त्यांच्या शेतामध्ये येवून शेत पीकाचे नुकसान करतात. मागील वर्षी त्यांच्या शेत जमीनीतील १ एकर क्षेत्रामधील चना पिकाचे नुकसान झाले होते, ज्याची किंमत अंदाजे ५० हजार रुपये होती. कंपनी ही नुकसान भरपाई देईल काय? तसेच इतर शेतकऱ्यांना सुध्दा नुकसान भरपाई देईल काय? असा प्रश्न उपस्थित केला. कंपनीने पिण्याच्या पाण्यासाठी जल प्रक्रिया केंद्र (RO Plant) बसविला असला तरी, गावांतील ९० टक्के मजूर वर्ग हे पाणी शेतात घेवून जातील काय? हा सुध्दा प्रश्न उपस्थित केला. त्याचप्रमाणे फक्त २० लिटर पाणी मिळत असून हे पाणी अपुरे आहे, असे सांगितले.

४५. श्री सचिन प्रल्हादराव कुकडे, आंजी, ता. व जिल्हा वर्धा.

- कंपनी आल्यापासून त्यांना सुध्दा रोजगार मिळाला आहे. प्रदूषण नियंत्रणासाठी कंपनी उपाययोजना करेल अशी अपेक्षा आहे. कंपनीस समर्थन दिले.

४६.श्रीमती स्मिता स. कुकडे, आंजी, ता. व जिल्हा वर्धा.

- ही कंपनी सुरू झाल्यापासून बऱ्याच बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे. ही कंपनी बंद झाली तर ज्यांना रोजगार मिळालेला आहे, त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न उद्‌भवेल. त्यामुळे, ही कंपनी बंद होवू नये.

४७. श्री अंकुश पाटील, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- कंपनी स्थापन झाल्यामुळे बऱ्याच बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे. जर कंपनी बंद झाली तर बेरोजगारी निर्माण होईल. त्यामुळे, कंपनी कार्यरत राहावी.

४८. श्रीमती सुकेशीनी विनोद डांगे, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. या कंपनीला त्यांचा पुर्णपणे पाठींबा आहे. ही कंपनी सुरू राहावी, अशी त्यांची अपेक्षा आहे.

..१८/-

४९. श्रीमती विद्या पंकज नगरकर, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- लॅन्को कंपनी असल्यामुळे रोजगार मिळाला आहे. कंपनी बंद झाल्यास त्यांना बेरोजगारी मिळेल, म्हणून कंपनी येथेच कार्यरत राहावी.

५०. श्रीमती जयश्री नगरकर, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- कंपनी आल्यापासून जिल्ह्यातील बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे. त्यामुळे, ही कंपनी बंद होऊ नये, अशी त्यांची अपेक्षा आहे.

५१. श्रीमती सुलभा नगरकर, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- लॅन्को कंपनी इथे सुरू झाल्यास प्रदूषण होऊ नये याची त्यांनी काळजी घ्यावी. कंपनी येथेच राहावी. कंपनीला त्यांचा पाठींबा आहे.

५२. श्री सचिन पाल, वर्धा, जिल्हा वर्धा.

- कंपनीने प्रदूषण नियंत्रणासाठी केलेल्या उपाययोजनांशी ते समाधानी आहेत. त्यामुळे, कंपनीला पाठींबा आहे.

५३. श्री कमलेश शिवणे, वर्धा, जिल्हा वर्धा.

- लॅन्को कंपनीस सहमती दिली.

५४. श्री सुर्यकांत ऊगले, शिंदी मेघे, जिल्हा वर्धा.

- त्यांनी इलेक्ट्रीकल विषयातील क्षेत्रामध्ये डीप्लोमा प्राप्त केलेला आहे. त्यांना या कंपनीमध्ये रोजगार मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे. प्रत्येक ठिकाणी कारखान्यांच्या जवळ शेतजमिन असते. त्यामुळे, प्रत्येकाने तक्रार केल्यास देशामध्ये कोणतीही कंपनी येणार नाही. त्यामुळे, कंपनी राहावी.

५५. श्रीमती शांता देवराव नन्नावरे, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- कंपनीला त्यांनी समर्थन केले.

५६. श्रीमती अश्विनी नन्नावरे, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- कंपनी राहावी, अशी विनंती केली.

५७. श्रीमती वनमाला देवराव पोपटवार, तुळजापूर, जिल्हा वर्धा.

- कंपनी राहावी व रोजगार द्यावा.

५८. श्री विलास कांबळे, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- कंपनीने बऱ्याचशा लोकांना रोजगार दिलेला आहे. कंपनी प्रदूषण नियंत्रणाचे कार्य व्यवस्थित करत असेल तर कंपनी राहावी.

५९. श्रीमती रंजिता किशोर शंभरकर, जिल्हा वर्धा.

- कंपनीमुळे विज तुटवड्याची समस्या दूर होणार आहे. त्यामुळे, त्यांच्या मुलांचे शिक्षण चांगले होईल. त्यामुळे, कंपनी येथेच राहावी.

६०. श्रीमती उषा अ. कांबळे, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- कंपनी येथेच राहावी.

६१. श्री जयप्रकाश येसनकर, वर्धा, जिल्हा वर्धा.

- या कंपनीमध्ये इतर कंपन्यापेक्षा कमी ध्वनी प्रदूषण होते व रोजगार सुध्दा मिळत आहे. त्यामुळे, या प्रकल्पाला संपूर्ण पाठींबा आहे.

६२. श्री स्वप्नील कदम, वर्धा, जिल्हा वर्धा.

- लॅन्को कंपनी वर्धा जिल्ह्यात आलेली आहे, ही चांगली बाब आहे. प्रकल्पाच्या प्रदूषणाबद्दल वेगवेगळे मते आहेत. पण त्यांचा प्रकल्पास पूर्ण पाठींबा आहे.

६३. श्री चंद्रमणी रामभाऊ जवादे, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- मांडवा येथे कंपनी आल्यामुळे बेरोजगारांना उद्योगधंदा मिळाला आहे. त्यामुळे, कंपनी वर्धा जिल्ह्यात राहावी. परंतु कंपनीने प्रदूषण नियंत्रणासाठी योग्य ती सर्व उपाययोजना करावी.

६४. श्री उज्वल मून, वर्धा, जिल्हा वर्धा.

- कोणताही प्रकल्प उभारतांना प्रथम त्या परिसराचा इकॉलॉजीकल, बायोजियोकेमीकल, जिऑग्राफिकल स्थितीचा अभ्यास करून कंपनी उभारण्यात येते. त्यामुळे, कंपनी प्रदूषण करीत आहे, हा जो आरोप करण्यात येत आहे तो योग्य नाही. कारण कंपनी सद्या विकसीत होत आहे. पर्यावरणाच्या सर्व बाबी लक्षात घेवूनच कंपनी विकसीत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली व कंपनीस समर्थन दिले.

६५. श्री प्रणय कदम, वर्धा, जिल्हा वर्धा.

- त्यांचा या कंपनीला पाठींबा आहे. या कंपनीमुळे भविष्यात रोजगार उपलब्ध होईल.

६६. श्री शिशीर ठाकरे, वर्धा, जिल्हा वर्धा.

- हा प्रकल्प सुपर क्रिटीकल तंत्रज्ञानावर आधारीत औष्णिक विद्युत प्रकल्प आहे. प्रदूषण नियंत्रणासाठी इलोक्ट्रोस्टॅटीक प्रेसीपीटेटर सारखे उच्च तंत्रज्ञान वापरणार आहे, असे सादरीकरणावरून दिसून येते. त्यामुळे पर्यावरणावर परिणाम होणार नाही. परंतु कंपनीने परिसरातील लोकांना दिलेले आश्वासन पुर्ण करावे, जेणेकरून भविष्यामध्ये कंपनीला लोकांचा पुर्ण पाठींबा मिळेल.

६७. श्री पवनकुमार सडमाके, सिंदी, जिल्हा वर्धा.

- कंपनी जर प्रदूषण नियंत्रित करीत असेल, तर पाठींबा आहे.

६८. श्री हेमंत नगरकर, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- कंपनीमुळे त्यांना रोजगार मिळाल्यामुळे, त्यांचा कंपनीस पाठींबा आहे.

६९. श्री प्रदिप लोहकरे, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- कंपनीचे फायदे व तोटे या दोन्ही बाबी असतात. मात्र, कंपनीमुळे होणारे फायदे लक्षात घेतले पाहिजे. वर्धा जिल्हा विदर्भात मागासलेला असल्याने या कंपनीकडे सकारात्मक दृष्टीने बघणे आवश्यक आहे. कंपनी पर्यावरणाच्या दृष्टीकोनातुन असलेल्या उपाययोजना करीत आहे व त्यात असलेल्या त्रुटीचे निराकरण करण्याचा कंपनी प्रयत्न करेल. त्यांनी कंपनीला समर्थन दिले.

७०. श्रीमती रश्मी प्रदिप लोहकरे, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- त्यांच्या कुटुंबाला लॅन्को प्रकल्पामध्ये रोजगार मिळाला आहे. त्यामुळे त्यांचे कंपनीस समर्थन आहे.

७१. श्रीमती लिला अशोक जांभुळे, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- लॅन्को कंपनीमध्ये त्यांच्या मुलांना रोजगार मिळाला आहे. कंपनी प्रदूषण नियंत्रणाच्या बाबी पुर्ण करेल. कंपनीस पाठींबा दिला.

७२. श्रीमती मनीषा अशोकराव जांभुळे, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- कंपनीमधून थोड्याफार प्रमाणात प्रदूषण होणार आहे. मात्र, कंपनीने नियमानुसार प्रदूषण नियंत्रणात राखून कंपनी सुरू ठेवावी.

७३. श्री अशोक महादेवराव जांभुळे, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- त्यांना या कंपनीमध्ये रोजगार मिळाला आहे. त्यामुळे, कंपनी चालु राहावी.

७४. श्रीमती निलीमा पतीत वावरे, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- त्यांना कंपनीमध्ये रोजगार मिळाला आहे. त्यामुळे, कंपनीला समर्थन आहे.

७५. श्रीमती शारदा किशोर धारणे, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- लॅन्को कंपनीमुळे रोजगार मिळाला आहे. मात्र, प्रदूषणाचे सुध्दा प्रश्न आहेत. कंपनीमुळे प्रदूषण होत असते. मात्र, प्रदूषणाचा हा मुद्दा महत्वाचा नाही.

७६. श्री विपीन पाटील, वर्धा, जिल्हा वर्धा.

- त्यांचा, या कंपनीस पाठींबा आहे. कंपनीने सादरीकरणामध्ये दर्शविल्यानुसार, या कपंनीचे प्रदूषण इतर कंपन्यापेक्षा नियंत्रणात आहे. त्यांनी सूचना केली की, कंपनीने प्रदूषण नियंत्रणात राखावे.

७७. श्री संदिप पकिड्डे, वर्धा, जिल्हा वर्धा.

पर्यावरणावर चर्चा करण्यासाठी आल्याचे सांगून खालीलप्रमाणे मते/आक्षेप मांडले.

- भारतीय कोळशामध्ये राखेचे प्रमाण ३०-५० टक्के असते व विदेशी कोळशामध्ये राखेचे प्रमाण १० टक्क्यापर्यंत असते. गुजरात मधील मे. शॉपोनजी पालनजी एनर्जी प्रा. लि. ही कंपनी विदेशातुन कोळसा आयात करून औष्णिक उर्जा निर्मिती करते. त्यामुळे, प्रदूषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी याच धरतीवर मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. कंपनीने विदेशातुन कोळसा आयात करुन विज निर्मिती करावी, अशी सूचना केली.

- औष्णिक उर्जा प्रकल्पाकरीता तीन तंत्रज्ञान उपलब्ध असून त्यामध्ये सब क्रिटीकल (Sub-critical), सुपर क्रिटीकल (Super critical) व सुपर अल्ट्रा क्रिटीकल (Super ultra critical technology) तंत्रज्ञानाचा समावेश आहे. लॅन्को कंपनीमध्ये सुपर क्रिटीकल (Super critical) हे तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. त्याऐवजी सुपर अल्ट्रा क्रिटीकल (Super ultra critical technology) तंत्रज्ञान वापरल्यास प्रदूषणाचे प्रमाण कमी होईल.

- कार्बन डायऑक्साईड वायू ग्लोबल वार्मींगला कारणीभूत आहे. कोळशावर आधारीत औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये सब क्रिटीकल (Sub Critical) तंत्रज्ञान वापरलेले असल्यास १ मेगावॅट विज निर्मिती मधून ९०० कि.ग्रॅम कार्बन डायऑक्साईड वायुचे उत्सर्जन होते. त्यानुसार मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. प्रकल्पाच्या १३२० मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक विद्युत प्रकल्पामधून ११८८००० कि.ग्रॅम कार्बन डायऑक्साईड वायू वातावरणामध्ये सोडल्या जाईल व ८ तासाच्या एका पाळीमध्ये ९५०४ मे.टन कार्बन डायऑक्साईड, दोन पाळीमध्ये कारखाना चालविल्यास १९००८ मे. टन कार्बन डायऑक्साईड वायू वातावरणामध्ये सोडल्या जाईल. मे.लॅन्को कंपनी सुपर क्रिटीकल (Super Critical) तंत्रज्ञान वापरणार असल्यामुळे कार्बन डायऑक्साईड वायू उत्सर्जनामध्ये आणखी ५ टक्के घट अपेक्षित आहे. मात्र, सुपर अल्ट्रा क्रिटीकल (Super Ultra Critical) तंत्रज्ञान वापरल्यास कार्बन डायऑक्साईड वायू उत्सर्जनाचे प्रमाण ७ टक्क्याने कमी होईल. त्यामुळे, मे. लॅन्को कंपनीने सुपर अल्ट्रा क्रिटीकल (Super Ultra Critical) तंत्रज्ञान वापरावे. त्याचप्रमाणे, औष्णिक विद्युत प्रकल्पापासून ५ कि.मी. परिसरात राहणाऱ्या लोकांना श्वसनाचे रोग होतात. ही माहिती राष्ट्रीय अभियांत्रिकी पर्यावरण अनुसंधान संस्था (निरी), नागपूर यांनी फेब्रुवारी २००६ मध्ये केलेल्या संशोधनाच्या अहवालानुसार आहे.

- लॅन्को औष्णिक विद्युत प्रकल्पामधुन अंदाजे ८००० मे.टन/दिन उडणारी राख निर्माण होईल. त्यानुसार प्रत्येक महिन्याला २,४०,००० मे.टन व प्रत्येक वर्षाला २८,८०,००० मे.टन उडणारी राख निर्माण होईल. २००४ पुर्वी कोळशावर अस्तित्वात असलेले औष्णिक विद्युत प्रकल्पामधून निर्माण होणाऱ्या १०० मिलीयन मे.टन उडणारी राखेच्या साठवण व विल्हेवाटीसाठी एकुण ६५००० एकर जमीनीपेक्षा जास्त जमिनीची आवश्यकता होती. मात्र, २००४ नंतर उडणारी राख निर्मितीचा आकडा १२५ मिलीयन मे.टन झालेला असून साठवण व विल्हेवाटीसाठी १,००,००० एकर जमिनीची आवश्यकता आहे. मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. मधून प्रत्येक वर्षाला २८,८०,००० मे.टन उडणारी राख निर्माण होणार असून साठवणूक व विल्हेवाटीसाठी एकुण २५०० एकर जमीन लॅन्को प्रकल्पाला लागेल. या बाबी २४/०२/२०११ रोजी लॅन्को प्रकल्पाला केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाकडून प्राप्त झालेल्या पर्यावरण विषयक परवानामध्ये नमूद केलेल्या आहेत. मात्र, लॅन्को प्रकल्पाला ११९५ एकर जमिनीची आवश्यकता दर्शविलेली आहे. या जमिनीच्या क्षेत्रामध्ये लॅन्को कंपनी प्रकल्प बांधणार आहे, तर उडणाऱ्या राखेची साठवणूक व विल्हेवाट कशी करणार आहे? असा प्रश्न उपस्थित केला.

- लॅन्को प्रकल्पाला दि. २४/०२/२०११ रोजी केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाकडून प्राप्त झालेल्या पर्यावरण विषयक परवानामधील अटीनुसार प्रकल्पधारकास पर्यावरण विषयक परवान्याची माहिती परवाना प्राप्त झाल्यापासून ७ दिवसामध्ये जास्तीत जास्त खप असलेल्या वर्तमानपत्रात मराठी भाषेमध्ये प्रसिध्द करणे आवश्यक होते. परंतु, कंपनीने या बाबीचे उल्लंघन केलेले आहे. मात्र, कंपनीने यापुढे असे उल्लंघन करू नये. अशा सूचना केल्यात.

- पर्यावरण विषयक परवान्यामध्ये नमूद केल्यानुसार प्रकल्पातर्फे २९० एकर जमीनीवर हरित पट्ट्याचा विकास करणार असून १५०० झाडे /हेक्टर घनते नुसार एकुण १,७५,५०० झाडे लावणार आहे. त्यात असेही नमुद केले आहे की, कारखान्याचे बांधकाम सुरू करणेपासून (२४/०२/२०११ पासून) ते पुर्ण होईपर्यंत ४ वर्षाच्या कालावधीमध्ये ही १,७५,५०० झाडे लावलेली असेल. याबाबत, लॅन्को प्रकल्पाने अद्यापपर्यंत केलेला वृक्ष लागवड परिसर त्यांना प्रत्यक्ष दाखविण्यात यावा. अशी मागणी केली.
- लॅन्को प्रकल्पाने उडणारी राख साठवण व विल्हेवाटीसाठी लागणार असलेल्या २५०० एकर जमिनीचा उल्लेख केलेला नाही. त्याचप्रमाणे, मांडवा, झाडगांव, बेलगांव, उमरी व दिग्रस या गावातील लोकांना पुनर्वसन व पुनर्वसाहतीकरण कार्यक्रमा अंतर्गत कुठे स्थलांतरीत करणार आहे? हे कंपनीने जाहिर केलेले नाही.
- त्यांचा या प्रकल्पाला विरोध नाही. मात्र, या प्रकल्पाने सुपर अल्ट्रा क्रिटीकल (Super Ultra Critical) तंत्रज्ञान वापरावे व कोळसा विदेशातुन आयात करावा. तसेच स्थानिकांना रोजगार द्यावा.

प्रकल्पधारकाने माहिती दिली की, प्रकल्पाला लागणाऱ्या ५.५ मिलीयन टन कोळशासाठी एसईसीएल (SECL) कडुन केंद्र शासनाच्या कोळसा मंत्रालयासोबत करार केलेला आहे. विदेशातुन कोळसा आयात करणेसाठी भविष्यात प्रयत्न करण्यात येतील.

प्रकल्प धारकाने पुढे सांगितले की, प्रकल्पातर्फे केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रायलास सादर केलेल्या प्रस्तावानुसार पर्यावरण विषयक परवाना प्राप्त झालेला आहे. या प्रस्तावामध्ये बदल करणे शक्य नाही. प्रकल्पाचे कार्य सुरू झालेले आहे. त्यामुळे, मध्यंतरीच तंत्रज्ञानामध्ये बदल करणे शक्य नाही. ज्या प्रस्तावास मंजुरी मिळाली आहे, त्या प्रस्तावानुसारच प्रकल्पाचे कार्य करावे लागेल. या प्रकल्पामध्ये औष्णिक विद्युत निर्मितीसाठी स्वीकृत केलेले तंत्रज्ञान देशामधील अद्ययावत तंत्रज्ञान आहे. हे तंत्रज्ञान स्वीकृत केलेले अशा प्रकारचे केवळ दोन-तीन औष्णिक विद्युत प्रकल्प जसे अदानी औष्णिक विद्युत प्रकल्प, एनटीपीसी औष्णिक विद्युत प्रकल्प कार्यरत आहेत. यापेक्षाही अद्ययावत तंत्रज्ञान असलेले औष्णिक विद्युत प्रकल्प अद्याप कार्यरत नाहीत व हे अद्ययावत तंत्रज्ञान सुपर अल्ट्रा क्रिटीकल (Super Ultra Critical) अद्याप सिध्द झालेले नाही.

- वक्त्याने मागणी केली की, प्रकल्प धारकाने प्रदूषण कमी करणेसाठी अद्ययावत तंत्रज्ञान स्वीकृत करणेसाठी पुढाकार घ्यावा. भविष्यामध्ये इतर प्रकल्पासाठी या सूचनांचा विचार करण्यात येईल, असे प्रकल्प धारकाने सांगुन इतर प्रकल्प धारकानी सुध्दा या सूचनेचा विचार करावा, असे आवाहन केले.
- वक्त्याने सांगितले की, सदर प्रकल्प बिलासपुर येथील कोळसा विज निर्मितीसाठी वापरणार आहे. यावर, प्रकल्पधारकाने सद्यपरिस्थितीमध्ये त्यांना याबाबत माहिती नसल्याचे सांगितले.

सदस्यांनी या विषयाबाबत सांगितले की, कोळशामध्ये ३४ टक्क्यापेक्षा जास्त राखेचे प्रमाण नसावे. त्यांनी प्रकल्प धारकास विचारणा केली की, एसईसिएल (SECL) मार्फत प्राप्त होणाऱ्या कोळशामध्ये राखेचे प्रमाण किती आहे?

प्रकल्प धारकाने माहिती दिली की, त्यांना या प्रकल्पासाठी ४२ टक्के राख असलेला कोळसा प्राप्त होणार आहे. मात्र, पर्यावरण परवान्यानुसार जास्तीत जास्त ३४ टक्के राख असलेला कोळसा वापरावयाचा असल्यामुळे हा कोळसा कोल वॉशरी मार्फत प्राप्त करण्याचे त्यांनी मान्य केलेले आहे.

अध्यक्षांनी प्रकल्प धारकाला सूचना केल्या की, संबंधित वक्त्यास वृक्षरोपनासंबंधी प्रकल्प स्थळास प्रत्यक्ष भेट देवून पाहणी करण्याची संधी द्यावी. प्रकल्पधारकाने या सुचनेचे स्वागत केले व वक्त्यास प्रकल्प स्थळास भेट देण्यास आमंत्रित केले.

..२३/-

- वृक्षारोपन केल्यानंतर १ ते २ वर्षापर्यंत संगोपन करावे लागते. मात्र, गावकऱ्यांच्या माहितीनुसार प्रकल्पधारक झाडांचे संगोपन करत नाही, असे वक्त्याने सांगितले.

७८.श्री रूपेश मून, हिंगणघाट, जिल्हा वर्धा.

- ते तीन वर्षांपुर्वी बेरोजगार होते. मात्र, लॅन्को कंपनीमध्ये रोजगार मिळाल्यापासून बेरोजगारी दूर झालेली आहे.

७९.श्रीमती रंजना गोटे, बेलगांव, जिल्हा वर्धा.

- या कंपनीच्या धुळीच्या प्रदूषणामुळे त्यांच्या शेतामध्ये यावर्षी पिकाचे उत्पादन झालेले नाही. तसेच इतर शेतकऱ्यांच्या शेतामध्ये सुध्दा पिकांच्या उत्पादनाचे नुकसान होत आहे. त्यांची उपजिविका शेतीवरच असल्यामुळे, शेतपिकाचे नुकसान झाल्यामुळे उदरनिर्वाहाचे गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. कंपनी येण्यापुर्वी शेतीच्या आधारावर त्यांची उपजिविका व्यवस्थित सुरू होती. बेलगांव गावातील सर्वच बेराजगारांना कंपनीमध्ये रोजगार मिळालेला नाही. गावांतील लोकांना कायमस्वरूपी रोजगार देण्यासाठी प्रकल्पधारकाने कोणतीही हमी दिलेली नाही. तसेच मुलांना तांत्रिक शिक्षण प्राप्त करण्यासाठी व्यवस्था केलेली नाही.

८०. श्री विलास भिमराव कांबळे, बेलगांव, ता. जिल्हा वर्धा.

- त्यांनी विचारणा केली की, मांडवा, पुलई व बेलगांव या तीन गावाच्या विकासासाठी प्रकल्प धारकाने कोणकोणत्या उपाययोजना मान्य केलेल्या आहेत? त्यांनी माहिती दिली की, गावामध्ये एक महिला आजारी असतांना सुध्दा प्रकल्प धारकातर्फे ॲम्बुलन्स उपलब्ध असून सुध्दा पुरविण्यात आलेली नाही. त्यांनी आरोप केला की, कंपनीच्या अधिकाऱ्यांनी त्यांना व इतर लोकांना नागपूर येथे नेवून व दिशाभूल करुन प्रकल्पाच्या समर्थनार्थ निवेदनावर सह्या घेतल्या. मात्र, त्यांनी स्वतः सही केली नाही.
- कंपनीने शेत जमीन विकत घेतल्याने परिसरातील जंगली जनावरे जसे रोही, डुकरे, ससे, हरीण इत्यादी त्यांचे शेतात व इतर शेतकऱ्यांच्या शेतात शिरून पिकाचे नुकसान केले आहे.
- त्यांनी मागणी केली की, कंपनीतर्फे गावांतील लोकांच्या वैद्यकीय तपासणीसाठी नियुक्ती वैद्यकीय अधिकारी हे एमबीबीएस, एमडी शिक्षणधारी असावा. कंपनीतर्फे गावकऱ्यांना फक्त आमिष दाखविण्यात येत आहे.
- कंपनीमधून निघणाऱ्या धुरामुळे गांवात प्रदूषण होणार आहे. म्हणून गांवाच्या वतीने त्यांचा या कंपनीस विरोध आहे.
- कंपनी गावामध्ये यावी किंवा कसे याबाबत मतदान घेण्यात येवून सिध्द करावे.
- कंपनी शेतपिकाची नुकसान भरपाई कोणत्या माध्यमातून करणार आहे? त्याचप्रमाणे, गावकऱ्यांना स्थलांतर करण्याचा विषय असल्यास, त्यांची १०० टक्के काळजी घेण्यात यावी व तसे लेखी आश्वासन द्यावे.
- आयटीआय प्रशिक्षण घेतलेल्या मुलांना नोकरी मिळावी.
- नदीचे पाणी प्रदूषित झाले असल्यामुळे पिण्याचा पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शुध्द पाण्याची योग्य व्यवस्था करावी. अन्यथा, गावांतील प्रत्येक घराला पाणी पुरवठा करावा.
- कंपनीतील कर्मचारी कंपनीमध्ये दारू पिवून गावांतील लोकांना त्रास देतात. त्यामुळे, गावांतील सामाजिक वातावरण वाईट होत आहे. त्यामुळे, पोलीस चौकी उभारावी.
- शेतकऱ्यांकडून किती जमिन घेणार आहे? किती जमिन घेतलेली आहे? शेतकऱ्यांसाठी काय उपाययोजना करणार आहेत? याचा सर्व्हे प्रकल्प धारकाने करून मा.जिल्हाधिकारी, वर्धा यांना अहवाल सादर करावा.

..२४/-

मा. अध्यक्षांनी सूचना केली की, कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण करुन उपाययोजना करावी.

८१. श्री ताराचंद चौबे, वर्धा, जिल्हा वर्धा.

- ही लोक सुनावणी सकाळी ११ वाजता ऐवजी दुपारी १२.०० वाजता का सुरु करण्यात आली? या सुनावणीमध्ये प्रकल्प धारकाने त्यांच्यातर्फे बोलण्यासाठी लोकांना आणलेले आहे. त्याचप्रमाणे, मप्रनि मंडळाकडे प्राप्त झालेल्या निवदेनानुसार हजर असलेल्या लोकांपैकी लॅन्कोच्या समर्थनार्थ मते मांडणाऱ्या लोकांना प्रथम संधी देण्यात येत आहे. तसेच, लॅन्को कंपनीमध्ये काम करीत असलेले कर्मचारीच लॅन्को प्रकल्पाचे समर्थन करीत आहेत. असा आक्षेप घेतला. लॅन्को कंपनीमुळे प्रदूषणाचे काय परिणाम होणार आहेत? याबाबत फार कमी लोकांनी मते मांडलेली आहेत.
- लॅन्को प्रकल्प धारकाने केलेल्या सादरीकरणामध्ये प्रदूषण व प्रदूषण नियंत्रणाबाबत माहिती दिली नाही. प्रकल्पाच्या माहितीनुसार २००९-२०१० मध्ये परिसरामध्ये उच्चतम तापमान ३१°C दाखविण्यात आले आहे. मात्र, या कालावधीमध्ये वर्धा परिसरातील उच्चतम तापमान ४२-४७°C होते.
- वर्धा शहरापासून २० कि.मी. अंतरावर ७ पॉवर प्लँट आहेत. हे सर्व औष्णिक विद्युत प्रकल्प प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार प्रदूषण नियंत्रणासाठी कोणतेही कार्य करीत नाही.
- लॅन्को प्रकल्पाच्या धुळीच्या प्रदूषणामुळे वणा नदीचे प्रदूषण होईल. तसेच वर्धा जिल्हयाचे पिण्याचे पाणी प्रदूषित होणार आहे. त्यासाठी, कंपनी प्रदूषण नियंत्रणासाठी काय उपाययोजना करणार आहे? असा प्रश्न उपस्थित केला. याबाबत, त्यांनी उदाहरण दिले की, वर्धा जिल्ह्यातील मे. उत्तम गॅल्वा या कंपनीचे प्रदूषणामुळे ५ कि.मी. परिसरातील पिण्याचे पाण्याचे प्रदूषण होत आहे. याबाबत जिल्हाधिकारी, वर्धा यांच्याकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तसेच उत्तम गॅल्वा या प्रकल्पामुळे परिसरातील जमिनी नापीक झालेल्या आहेत. त्यामुळे, लॅन्को औष्णिक विद्युत प्रकल्पामुळे सुध्दा परिसरातील जमिनी नापीक होणार नाही का? त्याचप्रमाणे, लॅन्को प्रकल्पामुळे वर्धा जिल्ह्यातील किती लोकांना रोजगार मिळणार आहे? असे प्रश्न उपस्थित केले.
- या लोकसुनावणी बद्दलची माहिती मा. उच्च न्यायालय, नागपूर येथे सादर करावयाची असल्यास, खरी माहिती सादर करावी.

८२. श्री नरेंद्र गुलाबराव भांडोर, बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- ते लॅन्को प्रकल्पामध्ये ऑफीस बॉय म्हणून नोकरी करतात.
- प्रकल्पातील सांडपाणी त्यांच्या शेतामध्ये येत आहे. पाणी वाहून जाण्यासाठी नाली केलेली नसल्याने पावसामुळे शेतातील पीक वाहून जाते.
- लॅन्को प्रकल्पातील निर्माण होणाऱ्या राखेमुळे त्यांचे शेतजमिनीचे होणारे प्रदूषण ते सहन करून शकत नाही. त्याचप्रमाणे, प्रकल्पाने उभारलेल्या उच्च दाबाच्या विज दिव्यांच्या प्रकाशामुळे शेत पिकांचे नुकसान होवून उत्पन्नामध्ये घट झालेली आहे.
- कंपनीतर्फे त्यांना नोकरीवरून कमी करण्याची धमकी देण्यात येत आहे. त्यांनी मागणी केली की, कोणत्याही ऑफीस बॉयला काढू नये. तसेच इतर कामगारांना सुध्दा नोकरीतुन काढू नये, अन्यथा ते आंदोलन करतील व स्वतः दिल्लीतील मंत्रालयासमोर आत्मदहन करतील.
- त्यांनी भोपाळ येथील घडलेल्या प्रदूषणाच्या घटनेचे व त्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या लोकांचे उदाहरण दिले.
- सध्या, या परिसरातील तापमान ४८ डिग्री सेल्शिअस आहे. मात्र, या प्रकल्पामुळे तापमान ६० डिग्री सेल्शिअस पर्यंत गेले तर यासाठी दिल्ली येथील केंद्र शासन, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर व जिल्हाधिकारी, वर्धा जबाबदार राहतील.

..२५/-

- या प्रकल्पाने प्रदूषण होणार नाही, असे लेखी अश्वासन न्यायालयामार्फत द्यावे. त्यावेळेस ते गावांतील लोकांचा पाठींबा कंपनीला मिळवून देतील.
- या प्रकल्पाने शेतकऱ्यांच्या जमीनी विकत घेवून त्यांना बेघर केले आहे.
- या प्रकल्पाची पुर्वी जनसुनावणी झालेली होती. प्रकल्प धारकाने जर चांगले कार्य केले असते, तर पुन्हा लोकसुनावणी घेण्याची आवश्यकता भासली नसती.
- कंपनी पुर्नवसन करणार नसेल तर प्रत्येक कुटुंबाला रु. १० लाख द्यावे.
- १५ कि.मी परिसरातील शेती प्रत्येक एकरी ५० लाख रुपयांनी विकत घ्यावी.
- प्रत्येक कर्मचाऱ्याला कायमस्वरूपी रोजगार द्यावा.
- प्रकल्पाच्या धुळीमुळे ४ कि.मी. परिसरामध्ये प्रदूषण होईल.
- गावकऱ्यांना न्याय द्यावा, अशी त्यांनी विनंती केली.

८३. श्री सुरेंद्र रविशंकर पटले, नागपूर, जिल्हा नागपूर.

- त्यांचा लॅन्को प्रकल्पाला पाठींबा आहे. प्रदूषणाचाच विषय धरून ठेवला तर, या शहराचा विकास होणार नाही. नागपूरच्या मिहान प्रकल्पाचे उदाहरण देवून सांगितले की, या प्रकल्पास सुध्दा विरोध झाला होता. लॅन्को प्रकल्पामध्ये सुपर क्रिटीकल अद्ययावत तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. या शहराचा मुंबई सारखा विकास होण्यासाठी या प्रकल्पास त्यांचा पाठींबा आहे.

८४. श्री आशिष सावंत, नागपूर, जिल्हा नागपूर.

- लॅन्को प्रकल्प पर्यावरणाची काळजी घेत आहे. त्याचप्रमाणे, बेरोजगारांना रोजगार देत आहेत. त्यामुळे, त्यांचा प्रकल्पास पाठींबा आहे.

८५. कु. अनुजा मिश्रा, वर्धा, जिल्हा वर्धा.

- त्या अभियांत्रिकी विषयाच्या विद्यार्थ्यांनी आहेत. त्यांचे लॅन्को विद्युत प्रकल्पाला पूर्णपणे समर्थन आहे.
- लॅन्को प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांना सुविधा प्राप्त झालेल्या आहेत. ३० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली आहे. यामध्ये, त्यांना सुध्दा शिष्यवृत्ती मिळालेली आहे.
- या प्रकल्पामुळे रोजगार मिळत आहे. त्यामुळे, इतर शहर जसे, पुणे व मुंबई येथे रोजगारासाठी जाण्याची आवश्यकता वाटत नाही. वर्धा जिल्ह्याचा काहीही विकास झालेला नाही. मात्र, लॅन्को प्रकल्पामुळे ग्रामिण भागात विकास झाला आहे. ग्रामिण भागाचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास शक्य नाही.
- देशामध्ये असलेल्या विविध प्रकल्पांना पर्यावरण राखण्यामध्ये विविध समस्या आहेत व त्याचे निराकरण करणेसाठी आवश्यक उपाययोजना करीत आहेत.
- प्रदूषण नियंत्रणासाठी विविध उपकरणे उपलब्ध आहेत, ज्याचा वापर करून प्रदूषण कमी करता येवू शकेल.
- प्रकल्प बंद झाल्यावर सुध्दा प्रदूषणाचे निराकरण होणार नाही. कारण प्रकल्पा व्यतिरिक्त इतरही बाबी, जसे वाहनांचे प्रदूषण हवा प्रदूषणास कारणीभुत आहे. त्यामुळे, प्रदूषण नियंत्रण करण्याची जबाबदारी प्रकल्पाचीच नसून प्रत्येकाची आहे.
- कंपनी प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करीत आहे.
- वर्धा शहराचा विकास करणेसाठी त्यांचे कंपनीला पाठींबा आहे.

८६. श्रीमती विजया तोंडरे, वर्धा, जिल्हा वर्धा.

- प्रकल्प धारकाने ज्या शेतकऱ्यांच्या शेतजमीनी विकत घेतल्या आहेत, त्यांना नोकरीसाठी प्रथम प्राधान्य द्यावे. वर्धा जिल्हयातील लोकांना रोजगार द्यावा. जाम, हिंगणघाट व जवळपासच्या गांवातील नागरीक रोजगारासाठी त्या ठिकाणी असलेल्या प्रकल्पावरच अवलंबून आहेत. सद्यस्थितीत रोजगार हे प्रथम प्राधान्य आहे. प्रकल्प धारकाने प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात. त्यांचे प्रकल्पास समर्थन आहे.

८७. श्रीमती कृष्णाबाई कथोटे, वर्धा, जिल्हा वर्धा.

- रोजगार मिळालेला आहे. प्रकल्पास पाठींबा आहे.

८८. श्री निळकंठराव सराडे, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- ते एक शेतकरी आहे.
- त्यांनी इतर शेतकऱ्यांसोबत या लोक सुनावणीच्या एक दिवस अगोदर प्रकल्प स्थळास भेट देवून प्रदूषण नियंत्रण उपकरणाची पाहणी केलेली आहे.
- या प्रकल्पामुळे तिन्ही गांवातील लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.
- प्रकल्पाच्या हलगर्जीपणामुळे प्रदूषण होवून शेतकऱ्यांच्या शेत पीकाचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई करणेसाठी प्रभावी व्यवस्था असणे आवश्यक आहे. त्यासाठी, शेतकरी, कृषी विकास अधिकारी व प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांची समिती तयार करणे आवश्यक आहे.
- प्रकल्पासाठी जमीनीचे क्षेत्र दिल्यामूळे, त्या क्षेत्रातील वन्य प्राणी शेतीमध्ये शिरुन शेतपिकांचे नुकसान करीत आहेत. त्यामुळे, शेतकऱ्यांना त्रास होऊ नये म्हणून वन विभागाने व जिल्हाधिकाऱ्यांनी पूढाकार घेवून काळजी घ्यावी.
- त्यांचा कंपनीला पाठींबा आहे.

८९. श्री लक्ष्मण सोमाजी गेडाम, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- मनुष्याला निरोगी जगण्यासाठी प्रदूषण होऊ नये. मात्र, केवळ प्रदुषणाच विचार केला तर कोणताही उद्योग येणार नाही.
- लोकांना रोजगाराची व व्यवसायाची आवश्यकता आहे व प्रकल्पाशिवाय वर्धा जिल्हयाचा विकास होणे शक्य नाही.
- या परिसरातील मुलांचे भवितव्याचा विचार करुन त्यांचा प्रकल्पास पाठींबा आहे.

९०. श्रीमती उमा दुबे, वर्धा, जिल्हा वर्धा.

- लॅन्को प्रकल्पामध्ये बेरोजगारांना काम मिळावे. त्यांचा प्रकल्पास पाठींबा आहे.

९१. श्रीमती किरण शंकरराव मारवडी, जिल्हा वर्धा.

- त्यांच्या मुलांच्या पुढच्या भवितव्यासाठी प्रकल्पास पाठींबा आहे.

९२. श्री गजानन एकनाथ कातरकर, बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- प्रकल्पामूळे सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळत आहे.
- प्रकल्पाने पर्यावरण संरक्षणाची काळजी घ्यावी.

..२७/-

- कंपनीने वृक्ष लागवड केलेली आहे.
- कंपनी कार्यरत राहावी. ही आग्रहाची विनंती आहे.

९३. श्री संजय सुटे, मांडवा, ता.व जिल्हा वर्धा.

- ज्याप्रमाणे, मनुष्याला दोन वेळ अन्नाची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे, विजेची सुध्दा तितकीच आवश्यकता आहे. त्यामुळे, येथेच प्रकल्प कार्यरत असावा.

९४. श्री प्रमोद म. लांडगे, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- वर्धा जिल्ह्यात आजूबाजूला प्रकल्प असल्यामुळे थोड्याफार प्रमाणात प्रदूषण होत आहे. त्याचप्रमाणे, त्यांच्या गावात सुध्दा थोड्याफार प्रमाणात प्रदूषण होणार आहे, मात्र, प्रकल्पाद्वारे वृक्षलागवड व प्रदूषण नियंत्रणासाठी इतर उपाययोजना करणे सुरू आहे. त्यामुळे, त्यांचा प्रकल्पास पाठींबा आहे.

९५. श्री शाम दत्ताजी जावळकर, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- त्यांनी मत लेखी स्वरुपात दिले आहे.

९६. श्री अनिल देवकते, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- कंपनी आल्यापासून गावांतील लोकांना रोजगार मिळालेला आहे. त्याचप्रमाणे, गावात सुधारणा केल्या आहेत. त्यामुळे, त्यांचा कंपनीस पाठींबा आहे.

९७. श्री दिपक सुधाकरराव बावनकर, सरपंच, ग्रामपंचायत आंजी (मोठी), ता. व जिल्हा वर्धा.

- कंपनीचे काम मगील वर्षा पासून चालू आहे.
- कंपनीच्या प्रदूषणामुळे फक्त मांडवा, पुलई व बेलगांव हीच गांवे प्रभावित होणार नसून आंजी हे गांव सुध्दा, जे कंपनी पासून ६ कि.मी. अंतरावर आहे, प्रभावित होईल. मात्र, प्रकल्पधारकाँचे आंजी गांवाकडे दुर्लक्ष आहे. प्रदूषण टाळायचे असेल तर झाडे लावली पाहिजेत. वृक्ष लागवड केली आहे, असा दावा प्रकल्पधारक करतात. मात्र, आंजी गावाच्या परिसरामध्ये किंवा आंजी गावाच्या दिशेने असलेल्या रस्त्यावर वृक्ष लागवड केलेली नाही.
- मागील वर्षी आंजी गावाच्या रस्त्यावरुन कंपनीसाठी खडी, दगड, माती भरलेले ट्रकच्या वाहतुकीमुळे रस्ते खराब झाले व अपघात सुध्दा झाले. याबाबत, कंपनीला बरेचवेळा निवेदन दिले, वृत्तपत्रामध्ये सुध्दा याविषयी बातमी प्रकाशित केली. परंतु प्रकल्पधारकाने याकडे दुर्लक्ष केले.
- कंपनीने आंजी या गांवाचे पर्यावरण राखण्यासाठी वृक्षलागवड केली पाहिजे, असे न झाल्यास त्यांना प्रकल्पास विरोध करावा लागेल.

९८. श्री मारोती मेश्राम, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- हा औष्णिक विद्युत प्रकल्प कोळशावर आधारीत आहे. कोळशाच्या ज्वलनामुळे कार्बन डायऑक्साईड वायूचे उत्सर्जन होते. तसेच सल्फर डायऑक्साईड या वायुचे सुध्दा उत्सर्जन होते. सल्फर डायऑक्साईड वायू आरोग्यास हानीकारक आहे व मनुष्याचा सहा महिन्यामध्ये मृत्यु होवू शकतो. त्याचप्रमाणे, सल्फर डाय आक्साईड वायु गर्भवती स्त्रीच्या सेवनामध्ये शिरल्यास गर्भावर विपरीत परिणाम सुध्दा होतो.
- या तिन्ही गावांमध्ये प्रकल्पामुळे प्रदूषण होणार नाही, असे स्टॅम्पपेपरवर, न्यायालयामार्फत लॅन्कोच्या प्रकल्प धारकाने व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पाच दिवसामध्ये प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे, अन्यथा ही कंपनी चालु होणार नाही.

९९. श्री संदेश केन्डे, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- प्रकल्प धारकाने त्यांची शेतजमीन कमी भावामध्ये खरेदी केली आहे. मात्र, त्यांना अद्याप रोजगार दिलेला नाही व कंपनीतर्फे टाळाटाळ करण्यात येत आहे.

१००. श्री अमीत मुळे, पुलई, ता.व जिल्हा वर्धा.

- लॅन्को थर्मल पॉवर लि. या प्रकल्पामुळे मांडवा, पुलई, बेलगांव या तिन्ही गावांत फार थोड्या प्रमाणात रोजगार निर्माण झालेला आहे. तिन्ही गावांचा विकास करायचा असेल तर, शिक्षणानुसार कायमस्वरूपी नोकरी देण्याची मागणी केली.
- कंपनीने मोठमोठ्या झाडांची कत्तल केलेली आहे. वृक्षारोपन केल्यानंतर झाडे मोठी होण्यास बरेच वर्षे लागतात, तोपर्यंत झाडे मोठी होणार नाहीत. त्यामुळे, प्रदूषण नियंत्रणात राहणार नाही.

१०१. श्रीमती हर्षा मधुकरराव केन्डे, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- तो स्वतः शेतकऱ्याचा मुलगा आहे. सध्या पेरणीचा हंगाम असल्यामुळे शेतकरी लोकसुनावणीसाठी आलेले नाहीत. प्रकल्पातुन निर्माण होणाऱ्या राखेमुळे त्यांच्या शेतीवर भविष्यात परिणाम होणार आहे. त्यामुळे, प्रकल्पधारकाने याबाबत दक्षता घ्यावी.

१०२. श्री मिलींद लक्ष्मणराव मानवटकर, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- मागील जनसुनावणी १७/०९/२०१० ला घेण्यात आली होती. त्यावेळेस ११६५ एकर ओसाड जमिन दर्शविण्यात आली होती. त्याबद्दल प्रकल्पधारकाला स्पष्टीकरण मागितले.

  यावर प्रकल्पधारकाने माहिती दिली की, संबंधित वक्त्यास ११९५ एकर जमिनीच्या वापराबद्दलचे स्पष्टीकरण अपेक्षित आहे. प्रकल्पधारकाने माहिती दिली की, ११९५ एकर जमिनीचा वापर करण्याबद्दलची माहिती डीपीआर (DPR) मध्ये दिली आहे. यामध्ये, प्रकल्पाच्या रेल्वे लाईन, औष्णिक विद्युत निर्मिती प्रकल्प, ॲश पॉंड इ. बाबत माहितीचा समावेश आहे.

- कंपनीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कन्सेंट टू एस्टॅब्लीश (Consent to Establish) कधी मिळाले? अशी विचारणा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली.

  यावर, सदस्यांनी वक्त्यास सुचना केल्या की, वक्त्याकडे असलेल्या माहितीच्या आधारावर त्यांना पर्यावरण विषयक मुद्दे मांडायचे आहेत. त्यांची नोंद येते घेण्यात येईल. त्यावर, वक्त्याने त्यांचे पुढील मुद्दे मांडले.

- कंपनी परिसराच्या १० कि. मी. अंतरामध्ये जनसुनावणी घ्यायला हवी होती. १० कि.मी. क्षेत्रामधील प्रभावित प्रत्येक गावांमध्ये लोकसुनावणीबाबत दवंडी देवून जनजागृती करायला पाहिजे होती.
- सध्या पेरणीचा हंगाम असल्यामुळे शेतकरी या लोकसुनावणीसाठी उपस्थित नाहीत.
- या प्रकल्पाची लोकसुनावणी पुन्हा आयोजीत करणेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ नागपूर यांनी मागील ६ महिन्यापुर्वी आदेश दिले होते. यानंतर, मप्रनि मंडळाने केलेल्या कार्यवाहीची माहिती विचारली.

यावर, सदस्य तथा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी यांनी सांगितले की, लोकसुनावणी आयोजीत करणेसाठी विशिष्ट पध्दत आहे व त्यानुसार, मप्रनि मंडळाने प्रथम प्रकल्पधारकाकडुन आवश्यक कागदपत्रे मराठी भाषेमध्ये रूपांतरीत करून मागविलेले होते. त्यानंतर, जाहिर लोकसुनावणीची दिनांक, वेळ व स्थळ निश्चित करणेसाठी मा.जिल्हाधिकारी, वर्धा यांना पत्र पाठविण्यात आले. तसेच स्थळ निश्चित करणेसाठी पोलिस अधिक्षक, वर्धा यांच्याकडून अभिप्राय घेण्यात आला व तद्नंतर जाहीर सुनावणी आयोजीत करणेसाठी ३० दिवसाची नोटीस वृत्तपत्रामध्ये प्रकाशित करावी लागते. त्यानुसार, ही लोकसुनावणी जून महिन्यामध्ये आयोजीत करण्यात आलेली आहे.

त्यावर, वक्त्यांने आक्षेप घेतला की, सहा महिन्यापुर्वी मा.उच्च न्यायालयाने आदेश देवून सुध्दा ही लोकसुनावणी ऐन पेरणीच्या हंगामात आयोजीत करण्यात आलेली आहे.

- १० कि.मी. परिसरात असलेल्या गावांतील लोकांना लोकसुनावणीच्या स्थळी उपस्थित राहणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे काय व्यवस्था करण्यात आली? याची माहिती विचारली.
- जमिनीच्या ७/१२ मधील शेतजमीनीच्या पिकाबद्दल असलेल्या नोंदीनुसार ५३ टक्के क्षेत्र दुहेरी पिकाचे दाखविलेले आहे. ही जमिन ओलिताखालील क्षेत्रामध्ये समाविष्ट आहे. असा तहसिलदार तसेच उपविभागीय अधिकारी यांचा अहवाल आहे. मात्र, फक्त ७ टक्के ओलीताखाली क्षेत्र कां दाखविण्यात आले? याचे स्पष्टीकरण उपविभागीय अधिकारी यांना मागितले. उर्वरीत ९३ टक्के जमिनीचे क्षेत्र हे एकेरी पिकाचे आहे, असा अहवाल तहसिलदारांनी कोणत्या आधारावर पाठविला? जेव्हा की, ५३ टक्के जमिनीचे क्षेत्र दुहेरी पिकाचे असून ओलिताखाली आहे. असे प्रश्न वक्त्याने उपस्थित केले.
- ओलीत क्षेत्रामध्ये ज्या विहीरी होत्या त्या पुर्ण बुजविण्यात आल्या आहेत.
- कंपनीला दि. १५/०९/२०११ ला कंन्सेंट टू एस्टॅब्लीश (Consent to Establish) देण्यात आल्यानंतर बांधकाम सुरू करण्यात आले. त्यानंतर, लगेचच दि. १७/०९/२०११ रोजी प्रथम लोकसुनावणी घेण्यात आली होती. या प्रकल्पास जनसुनावणीच्या अगोदरच Consent to Establish देण्यात आले होते. याबद्दल, स्पष्टीकरण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास मागितले.
- परिसरातील ४० गावांमध्ये व शेतामध्ये राख पडणार आहे. याचे स्पष्टीकरण मागितले.
- राखेच्या ढिगाऱ्यांमुळे व हवा प्रदूषणामुळे १० कि.मी. परिसरातील शेतातील पिके नष्ट होतील. याचे स्पष्टीकरण कंपनीच्या प्रतिनिधीस मागितले.
- प्रकल्पातर्फे निम्न वर्धा प्रकल्पातुन पाणी घेण्यात येत आहे. या प्रकल्पातील पाणी आर्वी गावासाठी मंजुर केलेले आहे. मात्र, लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. मांडवा या प्रकल्पासाठी हे पाणी वळविण्यात आले. आर्वी व धनोडी गावासाठी असलेले पाणी लॅन्को थर्मल पॉवर साठी वळविण्यात आल्यामुळे ४० कि.मी. पर्यंतच्या परिसरातील शेतकरी, ज्यांची उपजिवीका शेतीवरच आहे, ते पाण्यापासून वंचित झाले आहे. याचे स्पष्टीकरण मागितले.
- या प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे १५ कि.मी. च्या परिसरामध्ये लोकांना भयंकर रोग जसे टि.बी. अस्थमा, कॅन्सर होणार आहेत. अशाप्रकारचे रोग लोकांना झाल्यास, यासाठी शासन, कंपनी की, स्वतः तिथे राहणारा मनुष्य जबाबदार राहणार आहे? याबाबत विचारणा केली. अशा प्रदूषणकारी कारखान्याची विदर्भामध्ये, वर्धा जिल्ह्यामध्ये, तसेच त्यांच्या गावा शेजारी ५०० मीटर अंतरावर काहीही आवश्यकता नाही, असे वक्त्याने म्हटले.

- या प्रकल्पाचा अहवाल फक्त तीन गावांमध्येच ठेवण्यात आलेला होता. मात्र, या प्रकल्पाचा प्रभाव फक्त तीन गावात होत नसून, इतरही गावात होतो. जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रभावित क्षेत्रातील संपूर्ण ४० गावांमध्ये या लोकसुनावणीबद्दल दवंडी द्यायला हवी होती. परंतु असे करण्यात आलेले नाही.
- ही लोकसुनावणी आजच्या ऐवजी पुढील तारखेस प्रकल्पाच्या स्थळी घेतली असती, तर शेतकरी पोहोचू शकले असते व तेथे त्यांनी आपले मते मांडली असती.
- जीवनाला हानीकारक असलेला हा प्रकल्प त्यांना नको आहे.

सदस्यांनी वक्त्यास, त्यांचा या प्रकल्पाबाबत असलेली विरोधाची नोंद घेतली असल्याचे सांगितले व पुढे सांगितले की, या लोकसुनावणीमध्ये वक्त्यास त्यांचे मत मांडायचे आहे व याची नोंद पॅनेलतर्फे घेण्यात येवून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे केंद्र शासनास पाठविण्यात येईल. या इतिवृत्ताची तपासणी केंद्र शासनाची तज्ञ समिती करते. लोकसुनावणीच्या या पॅनेलला या इतिवृत्ताची तपासणी करण्याचा अधिकार नाही. संबंधित वक्त्याने पुन्हा प्रश्न केला की, प्रकल्पास कन्सेट टू एस्टब्लिश (Consent to Establish) दि. १५/०९/२०११ रोजी दिल्यानंतर दि. १७/०९/२०११ रोजी प्रथम लोक सुनावणी कशी काय घेण्यात आली होती? याचे उत्तर त्यांनी मागितले.

१०३. श्री विशाल खोन्डे, झाडगांव, जिल्हा वर्धा.

- त्यांनी या प्रकल्पास आक्षेप नोंदविला.
- या प्रकल्पाच्या बांधकामास आणखी तीन वर्ष लागणार आहे. या प्रकल्पाच्या सादरीकरणामध्ये सांगितल्यानुसार, या प्रकल्पामुळे पर्यावरणावर व सार्वजनिक जिवनावर कोणताही परिणाम होणार नाही, ही शाश्वती होती तर, लोक सुनावणी घेण्याची गरज कां भासली? असा प्रश्न उपस्थित केला.
- हा १३२० मेगावॅट औष्णिक विद्युत प्रकल्प असून या प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणावर कोळशाचे ज्वलन होणार आहे. त्यातुन निर्माण होणाऱ्या राखेच्या प्रदूषणामुळे सभोवताली असलेल्या शेतजमिनीमधील कापसाच्या पिकावर विपरीत परिणाम होणार आहे. त्यामुळे, प्रदूषित कापसाच्या पिकाला निम्मा भाव मिळेल.
- रेशीम उद्योगावर सुध्दा प्रदूषणाचा परिणाम होईल.
- प्रकल्पातुन निर्माण होणारे सांडपाणी जमीनीवर विल्हेवाट केल्यावर भूगर्भातील पाण्याचे प्रदूषण होईल. प्रकल्पाच्या सांडपाण्यात मिश्रित असलेले तेल सुध्दा विहीरीच्या पाण्यामध्ये मिसळेल. हे तेलयुक्त पाणी शेतीला वापरल्यास शेतपिकाचे उत्पन्न होणार नाही. भूगांव येथील मे.लाईड स्टील लि. या कारखान्याच्या सांडपाण्यामुळे निर्माण झालेल्या समस्येचे अद्यापपर्यंत निवारण झालेले नाही. तेव्हा या नवीन प्रकल्पाच्या प्रदूषणाच्या समस्याचे निवारण कसे करणार? असा प्रश्न उपस्थित केला.
- हवा प्रदूषणामुळे श्वसनाचे रोग होणार आहे.
- प्रदूषणाचे प्रश्न ४० गावांमध्ये निर्माण झाल्यास, तेथील नागरीकांनी त्यांच्या समस्या कोणाकडे मांडावेत? प्रकल्प धारक सर्वसामान्य प्रश्नाचे निराकरण करू शकत नाही, तेव्हा प्रदूषण नियंत्रणासाठी हा प्रकल्प अद्ययावत तंत्रज्ञान वापरणार आहे, यावर विश्वास कसा ठेवावा? या सर्व समस्यांचे प्रकल्प धारक निवारण करत असेल तर, त्यांची या प्रकल्पास अनुमती आहे.
- वर्धा ते मांडवा हा रस्ता अवजड वाहतुकीमुळे ना-दुरूस्त झालेला आहे.
- सर्वसामान्य नागरीकांच्या प्रश्नाची / समस्यांचे उत्तरे प्रकल्प धारकाने द्यावी. त्यांच्या विचारांची माहिती घ्यावी, कृती आराखडा तयार करून प्रत्येक गावांमध्ये ठेवावा व त्यावर लोकांचे विचार जाणून पुढील कार्य करावे.

१०४. श्री नितेश बाळकृष्ण कराळे, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- यापुर्वी, ज्या लोकांनी कंपनीच्या बाजुने मते मांडली आहेत, त्यापैकी काही कंपनीमधील कर्मचारी होते व काहींना कंपनीने प्रलोभने दिलेले होते.
- कंपनीने ज्या लोकांना नागपूर येथे नेवून त्यांची मते मांडण्यासाठी नावाची नोंद केली, त्यांना येथे प्रथम संधी देण्यात येत आहे.
- त्यांनी या प्रकल्पाच्या प्रथम लोकसुनावणीमध्ये कंपनीचे या मुद्यावर समर्थन केले होते की, या कंपनीमुळे रोजगार मिळेल. गावांमध्ये सुविधा निर्माण होतील व गावाचा विकास होईल. परंतु त्यांचा हा भ्रम नाहीसा झालेला आहे.
- ग्रामपंचायतीच्या वतीने मागणीचे २०० गावकऱ्यांचे सह्यांचे निवेदन पुर्वी प्रकल्प धारकास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले होते. या मागण्या पुर्ण करण्याचे तोंडी आश्वासन प्रकल्प धारकाने दिले होते. मात्र, लेखी आश्वासन दिले नाही. गावामध्ये दिड लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी बांधण्याचे आश्वासन दिले होते. परंतु ते पुर्ण केले नाही.
- मांडवा ते वर्धा १७ कि.मी. चा रस्ता प्रकल्पाच्या अवजड वाहतुकीने ना-दुरूस्त झालेला आहे.
- वक्त्याने एक उदाहरण देवनू सांगितले की, मुंकुदरावजी सावर यांच्या शेतामध्ये आवळ्यांचा बगीचा होता. या बगीच्यातील ५ वर्षाचे वय असलेले झाडे उपटून, ती दुसरीकडे लावण्याचा प्रयत्न केला. परंतु, ती सर्व झाडे वाळली आहेत. ही आवळ्याची झाडे जिवंत आहेत काय? याबाबत, प्रकल्प धारकाने उत्तर द्यावे. असा प्रश्न केला.

  प्रकल्प धारकाने सांगितले की, एका शेतकऱ्यांने त्यांच्या शेतामध्ये आवळ्याची झाडे लावली होती. ती झाडे लहान व नगण्य होती. संबंधित विभागाची परवानगी घेवून ही झाडे उपटलेली होती व केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या मार्गदर्शिकेनुसार इतरत्र वृक्ष लागवड करीत आहे.

  यावर वक्त्याने आक्षेप घेतला की, आवळ्याची झाडे लहान नसुन साधारण ५ वर्ष वयाची होती व सर्व झाडे मृत झालेली आहेत.

- हरित विकास पट्टयाच्या नावाखाली कंपनी दिशाभूल करीत आहे. कोणत्याही भागात हरित विकासाचा पट्टा सलग स्वरूपात विकसीत केलेला नाही. फक्त वेगवेगळ्या ठिकाणी १०० ते २०० झाडे लावलेली आहेत. याची तपासणी अध्यक्षांना करण्याची विनंती केली.
- प्रकल्प धारकाने रु. ४१५ करोड पर्यावरणासाठी खर्च दाखविलेला आहे. परंतु, त्यापैकी पर्यावरणावर खर्च केला किंवा नाही, याची शाश्वती वाटत नाही.
- पिकांच्या उत्पादन कियेसाठी दिवसा सुर्यप्रकाशाची व रात्री काळोखाची अत्यंत आवश्यकता असते. परंतु, प्रकल्पाचे कामकाज रात्री सुरू ठेवणेसाठी उभारलेल्या उच्च दाब विद्युत दिव्यांच्या प्रकाशामुळे पिकांची अवास्तव वाढ होवून फुलधारण क्षमता कमी होते व उत्पन्नात ५० टक्के घट होते. त्याचप्रमाणे, त्या पिकाचा कालावधी वाढतो. त्यामुळे, शेतकऱ्यांना दुसरे पिक घेणे शक्य होत नाही. विद्युत दिव्याच्या प्रकाशामुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रामध्ये नुकसान झालेले असून निम्मे उत्पन्न झालेले आहे. याचे सर्व्हेक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.
- महाराष्ट्र राज्यात ४००० मेगावॅट विजेचा तुटवडा असल्यामुळे, विजेची गरज होती. त्यामुळे, त्यांनी प्रथम लोकसुनावणीमध्ये या औष्णिक विद्युत प्रकल्पास समर्थन केले होते. मात्र, आता समर्थन परत घेत आहेत.
- पर्यावरणाच्या विषयावर गावातील लोकांचा किंवा ग्रामपंचायत समितीचे मत प्रकल्पधारकातर्फे घेण्यात येत नाही.

- एका शेतकऱ्याची विहिर ब्लास्टिंगच्या धक्क्यामुळे खचली. याबाबत, तक्रार केली असता मागणी केलेल्या नुकसान भरपाई पैकी निम्मी नुकसान भरपाई दिली. मात्र, शेतकऱ्यांकडून पोचपावती घेतांना, ही मदत विहिर दुरूस्तीसाठी आर्थिक मदत म्हणून दिलेली आहे, असे लिहून घेतले. यावर, प्रकल्प धारकाने उत्तर द्यावे, अशी विचारणा केली.
- पर्यावरण विभागाला अनुमोदन केले की, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई साठी मानके तयार करावी किंवा कंपनीकडे, याबाबत स्वतंत्र विभाग असावा. या विभागाने, शासनाने ठरवून दिलेल्या मानकानुसार नुकसान भरपाईबाबत कार्य करावे. त्याचप्रमाणे, याबाबत एक समिती तयार करावी. ज्यामध्ये, गावातील सुशिक्षित लोकांचा समावेश असावा.
- प्रकल्पाने सादरीकरणामध्ये दिलेल्या माहितीनुसार कमाल तापमान ३१.२°C दाखविले आहे. हे चुकीचे आहे. वर्धा शहरामध्ये किंवा मांडवा गावामध्ये कोणत्याही वर्षातील उन्हाळ्यामध्ये कमाल तापमान ४७°C ते ४८.०°C पर्यंत असते. सन २०१०-२०११ च्या उन्हाळ्यामध्ये वर्धा शहराचे तापमान ४८.३ °C नोंद झालेले आहे. यावर, प्रकल्पाच्या सल्लागाराने माहिती दिली की, या प्रकल्पाचा पर्यावरणाचा अभ्यास आक्टोबर-२००९ ते डिसेंबर-२००९ मध्ये करण्यात आला होता व त्यावेळेस कमाल तापमान ३१.२°C नोंद केलेली होती. भारत सरकारच्या हवामान खात्याने सुध्दा या कालावधीमध्ये याच तापमानाची नोंद केली होती. यावर, वक्त्याने सांगितले की, उन्हाळ्यामध्ये तापमानाचा सर्वात जास्त त्रास होत असल्यामुळे, तापमानाची नोंद उन्हाळ्यामध्ये करणे आवश्यक होते.
- प्रदूषण विरहीत कंपनी जसे सॉफ्टवेअर कंपनी या परिसरात स्थापित होत असेल तर स्वागत करु.
- प्रकल्पाच्या कुलिंग टॉवर क्रियेत पाण्याची वाफ करण्यात येत असल्यामुळे पाण्यामधील ८० टक्के ऑक्सिजन कमी होते. हे पाणी झाडांना दिल्यास पुरेसा ऑक्सीजन मिळत नाही. त्यामुळे, या पाण्यातील ऑक्सीजन वाढविण्यासाठी प्रकल्पातर्फे काय उपाययोजना करणार आहे? या पाण्यामधील ऑक्सीजन कमी झाल्यामुळे मासे सुध्दा जिवंत राहत नाही.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांनी वनसंरक्षण कायदा १९८०, पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ ची कडक अंमलबजावणी करावी, असे वक्त्याने सुचविले.
- कंपनीने प्रदूषण नियंत्रणासाठी उपाययोजना करावी. कंपनीला ते पुन्हा मागण्या देणार आहेत, त्याच्यावर विचार करण्यात यावा. असे मत वक्त्याने मांडले.

१०५. श्री सारंग बाबाराव खेडकर, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- वक्त्याने सांगितले की, त्यांनी प्रकल्पाच्या अहवालाचा अभ्यास केलेला असून, तसेच कंपनीने प्रकल्पा संबंधी सादरीकरणामध्ये दिलेली माहितीनुसार असे दिसून येते की, प्रकल्प धारकाने अहवालामध्ये अपूर्ण माहिती दिलेली आहे. पुर्वीच्या लोकसुनावणीमध्ये सुध्दा अपुर्ण माहिती दिलेली होती. प्रकल्पाचा प्लान्ट लेआऊट स्पष्ट केलेला नाही. प्रकल्प धारकाने प्लान्ट लेआऊट मध्ये बॉयलर, हरितपट्टा इ. चे स्थळ दाखविलेले नाही. प्रकल्पाचा खरा नकाशा प्रकल्प धारकाने दाखविलेला नाही. याची माहिती प्रकल्पधारकास मागितली.

यावर, प्रकल्प धारकाने प्रस्तावित प्रकल्पाचा नकाशा केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालय, तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर केलेला असल्याचे सांगितले.

- प्रकल्पाचे संबंधित कागदपत्रे फक्त पुलई, बेलगांव व मांडवा, ग्रामपंचायत, जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालयात ठेवण्यात आलेले होते. गावातील लोक या माहितीचा अभ्यास करण्यासाठी सक्षम नसल्यामुळे, या लोकसुनावणीमध्ये प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामाची माहिती प्राप्त करणेसाठी उपस्थित झालेले आहे. परंतु, प्रकल्प धारकाने प्रकल्पाविषयी अपुर्ण माहिती दिलेली आहे.

- जाहिर लोक सुनावणी प्रकल्प स्थळावर का घेण्यात आली नाही? असा प्रश्न उपस्थित केला.
- कंपनीने रोजगार उपलब्ध करुन दिला आहे.
- त्यांची शेती सर्वे नं. २९७, गांव-मांडवा मध्ये असून कंपनीच्या कुंपनाला लागून आहे. त्यांच्या शेतामध्ये सोयाबिनचे पिक होते. कंपनीने लावलेल्या उच्च दाब क्षमतेच्या विद्युत दिव्यांच्या प्रकाशामुळे सोयाबीनचे पिक वाढतच होते. मात्र, फलधारणा होत नव्हती. याबाबत, त्यांनी प्रकल्पधारकास विचारणा केली होती. तसेच लेखी निवेदन सुध्दा देवून पिकाच्या नुकसानीबाबत, आर्थिक नुकसानीबाबत अवगत केले होते व इशारा दिला होता की, त्यांचे पिकाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रकल्प धारकाने उपाययोजना करावी. अन्यथा, त्यांचेवर उपासमारीची वेळ येवून उपोषण करावे लागेल. मात्र, या निवेदनावर प्रकल्प धारकाने समाधानकारक माहिती दिलेली नाही.
- वक्त्याने सांगितले की, प्रकाशामुळे शेत पिकांवर होणाऱ्या परिणामाबाबत पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोला यांचेकडून प्रकल्प धारकास प्राप्त झालेल्या अहवालानुसार, या विषयाबाबत विद्यापीठाकडे अभ्यास किंवा संशोधन उपलब्ध नाही, असे कृषी विद्यापीठाने कळविले.
- सोयाबीनचे उत्पादन प्रती एकर १० ते १२ क्विंटल असतांना सुध्दा ६ क्विंटल प्रती एकर याप्रमाणे, त्यांना १२००० रु. पिकाची नुकसान भरपाई म्हणून कंपनीने दिले. मात्र, पोचपावती घेतांना ही रक्कम आर्थिक मदत म्हणुन दाखविण्याचा प्रयत्न केला. शेत पिकाचे नुकसान होणे, ही शेतकऱ्यांची महत्वाची समस्या आहे व यावर तोडगा काढणे गरजेचे आहे.
- त्यांच्या शेताच्या वरच्या बाजूस असलेल्या प्रकल्पाच्या पाच पाणी साठवण टाक्यामधून प्रकल्प पाण्याचा उपसा करीत असल्यामुळे, त्यांच्या शेतातील विहिरीच्या पाण्याची पातळी फेब्रुवारी-२०१२ च्या पहिल्या आठवड्यामध्येच नाहिसी झाली आहे. त्यामुळे, कंपनीच्या प्रकल्पासाठी पाण्याचा काय स्त्रोत आहे? याबाबत विचारणा केली.

यावर, सदस्यांनी प्रकल्प धारकास सूचना केली की, प्रकल्पासाठी पाण्याच्या स्त्रोतांबद्दल माहिती द्यावी.

प्रकल्प धारकाने सांगितले की, प्रकल्पाच्या बांधकामासाठी पाणी धाम नदीमधून घेतलेले आहे.

मात्र, ही माहिती चुकीची असल्याचे वक्त्याने सांगितले व पुन्हा प्रश्न केला की, किती प्रमाणात पाणी घेण्यात येते?

प्रकल्प धारकाने सांगितले की, याबाबतची माहिती उपलब्ध करण्यात येईल. मा.अध्यक्षांनी सुध्दा याबाबत, प्रकल्प धारकास सूचना केल्या की, वक्त्यास सविस्तर माहिती देण्यात यावी.

- वक्त्याने सांगितले की, दि. २०/०२/२०१२ रोजी कंपनीमध्ये चना पिकाच्या नुकसानीबाबत गेले होते. याबाबत, कंपनीच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्यासोबत चना पिकाच्या नुकसानीबाबत, त्याच दिवशी पाहणी केली. मात्र, त्यानंतर नुकसान भरपाईबाबत कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे, त्यांनी कंपनीला दि. १/०३/२०१२ च्या पत्राद्वारे लेखी निवेदन देवून प्रकल्पाने उभारलेल्या विद्युत दिव्याच्या प्रकाशामुळे चना पिकाचे नुकसान झाले आहे, चना पिकाचे उत्पन्नांमध्ये घट झालेली आहे, याबाबत कळविले. तसेच, प्रकल्पाने पाण्याच्या उपसा केल्यामुळे, त्यांच्या विहिरीतील पाण्याची पातळी नाहीसी झालेली आहे. त्यामुळे, त्यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. या विषयाबाबत कंपनीतील अधिकाऱ्यांचा प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता.
- या प्रकल्पामुळे काही प्रमाणात प्रदूषण होणार आहे व पिकांचे सुध्दा नुकसान होणार आहे.

..३४/-

- मप्रनि मंडळातर्फे प्रकल्पास देण्यात येणाऱ्या नाहरकत प्रमाणपत्रामध्ये शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईबाबत योग्य तरतुद करावी.
- प्रकल्प धारकाने पर्यावरणाचा अभ्यास आक्टोबर-२००९ ते डिसेंबर-२००९ या कालावधीमध्ये केलेला आहे. मात्र, सध्या सन २०१२ वर्ष सुरू आहे. या तीन वर्षा दरम्यान पर्यावरणामध्ये नक्कीच बदल झालेले असतील.

यावर, प्रकल्प धारकाने सांगितले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयास सादर केला होता. त्यामध्ये, पर्यावरण अभ्यासाचा कालावधी नमुद केला होता. त्या आधारावर प्रकल्पास पर्यावरण विषयक परवाना प्राप्त झालेला आहे.

- मा. उच्च न्यायालयाने पुन्हा जनसुनावणी आयोजीत करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे या लोकसुनावणीसाठी नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर कां करण्यात आला नाही? असा प्रश्न विचारला.

१०६. श्रीमती शारदा श्रावणजी भगत, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- प्रकल्पासाठी शेतजमिन विकत घेण्यात येत आहे. त्यामुळे, शेतमजुरांची उदरनिर्वाह समस्या निर्माण झालेली आहे. या विषयाची कोणीही दखल घेतलेली नाही. अशी खंत व्यक्त केली. त्याचप्रमाणे, मागणी केली की, शेतमजुरांच्या उदरनिर्वाहाच्या समस्यावर समाधानकारक तोडगा काढणे गरजेचे आहे, शेतमजूरांच्या मुलांकडून शिक्षणासाठी देणगी घेण्यात येवू नये. तसेच पिण्याचे पाणी विनामुल्य पुरवावे. अशी सुध्दा मागणी केली.

१०७. श्री धिरज बावणे, मांडवा, ता.व जिल्हा वर्धा.

- मजुरांचे प्रश्न अद्यापपर्यंत कुणीही मांडलेले नाही. त्यामुळे त्यांनी मागणी केली की, निराधार लोकांचे सर्व्हेक्षण करून प्रत्येक कुटूंबातील एका व्यक्तीस कंपनीमध्ये रोजगार द्यावा. वृक्ष लागवडीबाबत सांगितले की, साधारणपणे ६५ टक्के वृक्ष जिवंत आहेत. उर्वरीत ३५ टक्के झाडे कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे व अयोग्य देखरेखीमुळे नष्ट झालेली आहेत. लॅन्को कंपनीकडून वृक्ष लागवडीबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत. मात्र, हे प्रयत्न वाढविण्याची गरज आहे.

१०८. श्री सुधीर बावणे, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- विदर्भामध्ये या प्रकल्पाचे स्वागत आहे. मात्र, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदूषण नियंत्रणासाठी जे नियम ठरवून दिलेले आहेत, त्याचे काटेकोरपणे, प्रकल्प धारकाने पालन करावे. त्याचप्रमाणे, पर्यावरणासाठी असलेला निधीचा वापर सुध्दा पर्यावरण संरक्षणासाठी करावा. सध्या मांडवा, पुलई व बेलगांव या गावाच्या परिसरामध्ये हा प्रकल्प आलेला आहे. यासोबतच औद्योगिक वसाहत सुध्दा स्थापित करण्याची त्यांनी मागणी केली. याबाबत सांगितले की, लॅन्को कंपनी प्रकल्पासाठी ११९५ एकर जमिन संपादित करणार असली तरी, प्रभावित क्षेत्रा व्यतिरिक्त इतरही परिसरामध्ये प्रदूषणाचे व पिकांचे नुकसानीचे परिणाम उद्‌भवतील. त्यामुळे, लॅन्को प्रकल्पाने संपादन केलेल्या जमिनी व्यतिरिक्त इतर परिसरामध्ये औद्योगिक वसाहती स्थापन केल्यास तेथील शेतकऱ्यांचा जमिनी संपादीत होतील व त्यामुळे तेथील परिसरातील प्रदूषणाच्या व पिक नुकसानीच्या बाबी उद्‌भवणार नाहीत. मात्र, त्या सर्व लोकांचा विकास होईल. प्रकल्प धारकाकडून विकासासाठी योजना राबविण्यात येत आहेत. मात्र, संबंधित विभागाने (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ) या प्रकल्पाचे प्रदूषण नियंत्रणात राहील, याची खबरदारी घ्यावी.

..३५/-

१०९. श्री रत्नाकर अवजड, झाडगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- त्यांचे गांव प्रकल्पापासून ४ कि.मी. अंतरावर आहे. रात्रीच्या वेळेस लॅन्को प्रकल्पाच्या अवजड वाहतुकीमुळे रस्ते ना-दुरूस्त झाले आहे. वाहनांच्या प्रकाश झोतामुळे वाहतुकीची समस्या निर्माण झाली आहे. फक्त वृक्ष लागवडीमुळे धूर व राखेचे प्रदूषण नियंत्रण शक्य नाही. त्यामुळे धूराच्या प्रदूषणामुळे कापसाचे पिक निकृष्ट होईल. त्याचप्रमाणे, त्यांच्या रेशीम उद्योगावर सुध्दा धुराचा परिणाम होईल. तसेच, मित्र किड नष्ट होईल. त्यांची शेती नष्ट झाल्यास त्यांच्यावर उपासमारीची वेळ येईल. प्रकल्पास त्यांनी विरोध दर्शविला. या लोकसुनावणीमध्ये फक्त मांडवा, पुलई व बेलगांव या गावांच्या विकासाचाच विचार करण्यात येत आहे. त्यामुळे, इतरही गावांचा विकासाचा विचार करणे आवश्यक आहे, अशी मागणी केली.

११०. श्री आर. बी. गोयनका, आयोजक, विदर्भ पर्यावरण कृती समिती (विपकृस), नागपूर, जि.नागपूर.

- विद्युत निर्मिती प्रकल्प धोकादायक असल्यामुळे खरच त्यांची आवश्यकता आहे काय? असा प्रश्न उपस्थित केला. याबाबत, महाराष्ट्र व विदर्भातील कार्यरत / प्रस्तावित असलेले औष्णिक विद्युत प्रकल्प, जल विद्युत केंद्र, पवन उर्जा प्रकल्पामधील विद्युत निर्मितीची सांख्यिकी माहिती दिली.
- महाजेनकोचे नाशिक, कोराडी, खापरखेडा, परळी, पारस, चंद्रपूर, भुसावळ, कोयना व उरण येथे औष्णिक विद्युत प्रकल्प, जल विद्युत केंद्र व पवन उर्जा केंद्र कार्यरत असून एकुण विजनिर्मिती ८२१० मेगावॅट उपलब्ध आहे, ज्यामध्ये ३८८ मेगावॅट विज निर्मिती महाजेनकोच्या जल विद्युत केंद्रातुन होत आहे. पंचवार्षीक योजने अंतर्गत महाजेनकोचे मंजुर केलेले नवीन प्रकल्प व विस्तारीकरणाच्या प्रकल्पाद्वारे सन २०१४-१५ पर्यंत महाराष्ट्र राज्यामध्ये एकुण १३३०१ मेगावॅट विज निर्मीती होईल. त्याचप्रमाणे, राज्य शासनाचे व वितरण कंपनीचे (Discom) विद्युत निर्मिती प्रकल्पाद्वारे सन २०१४-१५ पर्यंत एकुण ३२२८ मेगावॅट विज निर्मीती होईल. या व्यतिरिक्त केंद्रिय क्षेत्राच्या विद्युत प्रकल्पामधून महाराष्ट्र राज्याला ३४१२ मेगावॅट विजेचे वाटप करण्यात आलेले आहे व सन २०१४-१५ पर्यंत महाराष्ट्र राज्याला ५८३८ मेगावॅट विजेचे वाटप होणार आहे. या व्यतिरिक्त खाजगी विज निर्मिती प्रकल्पाद्वारे (औद्योगिक विद्युत प्रकल्प, स्वयं वापर विद्युत प्रकल्प बायोमास व बायोगॅसवर आधारीत विद्युत प्रकल्प) सद्यस्थितीत २२४ मेगावॅट विज निर्मिती सुरू आहे. या व्यतिरिक्त खाजगी विज निर्मिती प्रकल्पाद्वारे सन २०१४-१५ पर्यंत एकुण १२७८८ मेगावॅट विज निर्मीती होईल. तसेच या व्यतिरिक्त ५२७३ मेगावॅट क्षमतेचे पवन उर्जा निर्मिती प्रकल्प प्रस्तावित आहेत. या सांख्यिकी आकडेवारीमध्ये मे. लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. च्या विजनिर्मितीचा समावेश नाही. त्यानुसार, महाराष्ट्र राज्यामध्ये सन २०१२-१३ मध्ये विजेच्या मागणीपेक्षा एकुण ६९८८ मेगावॅट विजेची अतिरिक्त निर्मिती होईल.
- विदर्भामध्ये महाजेनकोचे औष्णिक विद्युत प्रकल्प कोराडी, खापरखेडा, पारस व चंद्रपूर येथे कार्यरत असून एकुण ४२९८ मेगावॅट विज निर्मीती सुरू आहे. या व्यतिरिक्त महाजेनकोचे पारस, खापरखेडा, चंद्रपूर व कोराडी येथील औष्णिक विद्युत प्रकल्पाचे विस्तारीकरणामुळे सन २०१३-१४ पर्यंत एकुण ७०१२ मेगावॅट विज निर्मीती होईल. या व्यतिरिक्त खाजगी विद्युत प्रकल्पातुन सध्या २००.६५ मेगावॅट विजनिर्मिती सुरू आहे. या व्यतिरिक्त खाजगी विद्युत प्रकल्पाद्वारे सन २०१३-१४ पर्यंत एकुण ४६६० मेगावॅट विज निर्मिती होईल. या सर्व विज निर्मितीच्या आकडेवारी नुसार विदर्भामध्ये सन २०१३-१४ मध्ये एकूण विज निर्मीती ११६७२ मेगावॅट होईल. या विज निर्मितीच्या आकडेवारीमध्ये मे. लॅन्को थर्मल पॉवर लि. चे आकडे समाविष्ट नाही. परंतु सद्यस्थितीत विदर्भामध्ये विजेची मागणी फक्त १५०० मेगावॅट आहे व ही विजेची मागणी सन २०१३-१४ पर्यंत सीएजीआर च्या आकडेवारीनुसार फक्त १५७५ मेगावॅट राहील. याचे कारण म्हणजे या परिसरातील औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे विकास झालेला नाही. याबाबत त्यांनी चंद्रपूर शहराचे उदाहरण देवून सांगितले की, प्रदूषणामुळे तेथे उद्योगांना स्थापन करण्याची अनुमती नाही व पर्यावरण विषयक परवाना सुध्दा प्राप्त होत नाही.

..३६/-

- विदर्भातील एकुण ११६७२ विज निर्मितीपैकी फक्त १५७५ मेगावॅट विजेचा वापर होईल व उर्वरीत १०१०० मेगावॅट विज विदर्भाच्या बाहेर पारेषित करण्यात येईल. विदर्भाबाहेर विज पारेषण करणेसाठी टॉवर्स उभारणेसाठी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची सुपिक जमिन जाणार आहे. विदर्भातुन पश्चिम महाराष्ट्रामध्ये १०१०० मेगावॅट विज पारेषण करतांना ५०५ मेगावॅट विजेची गळती होईल व लॅन्को औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या १३२० मेगावॅट विज निर्मितीमुळे अतिरिक्त ६० मेगावॅट विजेची गळती होईल. मात्र, महाराष्ट्र इलेक्ट्रीसिटी रेग्युलेटरी बोर्ड विजेचे दर आकारतांना विज निर्मितीचा खर्च व विज गळतीमुळे विजेचे नुकसान झालेला खर्च जोडून त्या आधारावर दर आकारते. मात्र, हा दर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये विज वापरणाऱ्यावर समानतेने लागु करण्यात येतो. विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात विज निर्मिती होवून सुध्दा या वाढीव दरातुन विदर्भाला काहीही सुट देण्यात येत नाही. या व्यतिरिक्त येथील लोकांना प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागतो. त्याचप्रमाणे, विदर्भात ४९ विद्युत प्रकल्प उभारण्याचे अर्ज शासनाकडे प्रलंबित आहेत. त्यापैकी ५००० मेगावॅट विज निर्मिती नागपूर शहराच्या जवळपासच्या क्षेत्रात होणार आहे. त्यामुळे, विद्युत प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे चंद्रपूर पेक्षाही नागपूर शहर प्रदूषणग्रस्त होईल.

- लॅन्को प्रकल्पामुळे महाराष्ट्रामध्ये तसेच प्रकल्पाच्या परिसरातील गावामध्ये भार नियमन नाहीसे होईल, ही बाब खरी नाही. प्रत्यक्षात, महाराष्ट्राला अतिरिक्त विजेची गरज नाही. गावातील शेतकऱ्यांना शासनाच्या अर्थसहाय्य योजने अंतर्गत कमी दरात विज पुरवठा करण्यात येतो. ही बाब विज वितरण कंपनीला मान्य नाही. त्यामुळे, विज वितरण कंपनी उद्योजकांना वाणिज्य दराप्रमाणे विज पुरवठा करून गावांमध्ये भार नियमन करते.
- मे.लॅन्को कंपनीकडे विज वितरण परवाना नसल्यामुळे प्रकल्पाच्या परिसरातील शेतकऱ्यांना कमी दरात विज पुरवठा करू शकत नाही. त्यामुळे, मे. लॅन्को प्रकल्पामुळे परिसरातील गावांमध्ये भार नियमन नाहीसे होईल, हे खरे नाही.
- विद्युत प्रकल्पाच्या प्रदूषणापेक्षा प्रकल्पासाठी लागणाऱ्या कोळशाच्या वाहतुकीमुळे व राखेच्या वाहतुकीमुळे जास्त प्रदूषण होते.
- लॅन्को प्रकल्पाच्या बांधकामा दरम्यान पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्यामुळे, भुगर्भातील पाण्याची पातळी कमी झालेली आहे. तेव्हा प्रकल्प सुरू झाल्यावर पाण्याच्या समस्या अधिक तीव्र होतील. सिंचनासाठी असलेले पाणी विद्युत प्रकल्पासाठी वळविण्यात येत आहे.
- मे. लॅन्को कंपनीने विज खरेदी करार कोणासोबत केलेला आहे? याची माहिती दिलेली नाही.
- मे. लॅन्को प्रकल्पामध्ये निर्मित होणारी औष्णिक विज महाराष्ट्रामध्येच वापरण्यात येईल किंवा महाराष्ट्राबाहेर पारेषित करण्यात येईल. याची सुध्दा माहिती दिलेली नाही.
- या प्रकल्पाची विज पारेषण वाहिनी उभारण्यासाठी किती क्षेत्र लागणार आहे? विपकृसच्या प्रतीनिधीनेच पुढे सांगितले की, विज पारेषण वाहिनीच्या दोन्ही बाजूस १०० मीटर अंतरापर्यंत बांधकाम करता येत नाही, मोठी झाडे लावता येत नाही. त्यामुळे, मोठ्या प्रमाणात जमिनीचे विज पारेषण वाहिनीमुळे नुकसान होणार आहे.
- या प्रकल्पामुळे रोजगार निर्मीती नगण्य होणार आहे. ज्या ठिकाणी विद्युत प्रकल्प कार्यरत असतो, त्या परिसराचा विकास होत नाही. विद्युत प्रकल्पाच्या परिसरामध्ये प्रदूषण असल्यामुळे प्रदूषण विरहित कारखाने जसे, सॉफ्टवेअर कंपनी उभारण्यात येत नाही.
- राखेच्या विल्हेवाटीसाठी राखेचा बंधारा नदीच्या काठावर बांधण्यात येतो व पावसाळ्यामध्ये राख नदीमध्ये सोडण्यात येते. राखेच्या विल्हेवाटीसाठी फार मोठ्या प्रमाणात जमिनीची आवश्यकता असते. त्यामुळे, या प्रकल्पाद्वारे राखेची विल्हेवाट कशाप्रकारे करण्यात येणार आहे? असा प्रश्न उपस्थित केला.

- विपकृसच्या प्रतिनिधीने विदर्भामध्ये औष्णिक विद्युत प्रकल्प नको, असे ठामपणे सांगितले. अतिरिक्त विजेची गरज नसून या प्रकल्पास तिव्र विरोध दर्शविला.
- विपकृसच्या प्रतिनिधीने उदाहरण देवून सांगितले की, कोराडी थर्मल पॉवर प्लान्ट मधील राखेमुळे कोराडी परिसरातील जनावरांच्या दूधामध्ये पारा या घातक धातूचे अंश आढळून आलेले आहेत, असा निष्कर्श पशुवैद्यकी महाविद्यालय (Veternery College, Nagpur) नागपूर यांच्या संशोधनामध्ये नमुद केलेला आहे.

सदस्यांनी प्रकल्प धारकाला सूचना केल्या की, विपकृसच्या प्रतिनिधीने उपस्थित केलेल्या तांत्रिक मुद्यावर माहिती द्यावी.

प्रकल्प धारकाने माहिती दिली की, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीसोबत ५० टक्के विद्युत वितरणासाठी करार झालेला आहे. उर्वरीत ५० टक्के विद्युत वितरणासाठी अद्याप कोणाशीही करार झालेला नाही.

यावर, विपकृसच्या प्रतिनिधीने निदर्शनास आणून दिले की, सद्यस्थितीत कार्यरत असलेले विद्युत प्रकल्पांचा विज खरेदी करार झालेला नाही व विद्युत प्रकल्पांना विज विकणे कठीण झाले आहे.

यावर, प्रकल्प धारकाने पुन्हा सांगितले की, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीसोबत विज खरेदी करार झालेला आहे. प्रकल्पातील १३२० मेगावॅट विद्युत पारेषण करणेसाठी पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. च्या विद्युत पारेषण वाहिनीची जोडणी मिळालेली आहे. प्रकल्पाच्या ५ कि.मी. अंतरावर पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन इंडिया लि. ची विद्युत पारेषण वाहिनी आहे. विद्युत पारेषण वाहिनीचे टॉवर्स उभारण्यासाठी अंदाजे ५० एकर जमिन लागेल.

- विपकृसच्या प्रतिनिधीने प्रश्न उपस्थित केला की, उच्च दाबाच्या विद्युत वाहीनी मुळे पिकांवर प्रदूषणाचा काय परिणाम होतो? याचा प्रकल्प धारकाने अभ्यास केलेला आहे काय? याबाबत, विपकृसच्या प्रतिनिधीनेच माहिती दिली की, उच्च दाबाच्या विद्युत वाहीनीमधून निर्माण होणाऱ्या इलेक्ट्रो मॅग्नेटीक लहरींमुळे पिकांचे नूकसान होते. त्यांनी पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडीया लि या कंपनीबद्दल सांगितले की, या कंपनीने विद्युत पारेषण करण्यासाठी एमआयडीसी देवळी येथे फार मोठा परिसर व्यापलेला आहे व माहिती दिली की, विद्युत पारेषण वाहीनीच्या कॉरीडोर साठी अंदाजे ८० हजार हेक्टर शेतकऱ्यांची जमीन वापरलेली आहे.
- विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले की, राखेची विल्हेवाट नदीच्या काठावर राखेचा बंधाऱ्यामध्ये होईल. त्यामुळे, ही राख नदीमध्ये जाईल. उर्जा प्रकल्पातील राख धोकादायक असून त्यामध्ये पारा सारखे घातक घटक असतात. ही राख नदीमध्ये मिसळल्यामुळे पिण्याचे पाण्याचे प्रदूषण होऊन संपूर्ण वर्धा जिल्हा प्रभावित होईल. त्यामुळे, राखेचा बंधारा नदीपासून दूर असावा.

यावर, प्रकल्प धारकाने माहिती दिली की, राखेच्या विल्हेवाटीसाठी उच्च घनता स्लरी डिस्पोझल सिस्टीम हे अद्ययावत तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. ज्यामध्ये, पाण्याचा वापर कमी होतो. या सिस्टीम मुळे राखेच्या बंधाऱ्यातून धुळीकणांचे उत्सर्जन कमी होते. त्याचप्रमाणे, भूगर्भातील पाण्याचे स्त्रोत प्रदूषीत होऊ नये यासाठी ॲश पॉंडला lining करण्यात येणार आहे.

मात्र, ही बाब विपकृसच्या प्रतिनिधीने मान्य केली नाही व राख मिश्रीत पाण्याच्या अयोग्य विल्हेवाटीमूळे प्रदूषण होईल असे ठामपणे सांगितले. याबाबत, त्यांनी कोराडी थर्मल पॉवर स्टेशन नागपूर चे उदा. दिले व राख बंधाऱ्यामध्ये विचरणाऱ्या गाईच्या दूधात पारा आढळल्याचे सांगितले.

..३८/-

१११. श्री मिलींद भेंडे, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- पश्चिम महाराष्ट्र, पुणे, मुंबई व देशाच्या इतर राज्यामध्ये तेथील लोक कोळशावर आधारीत औष्णीक विद्युत प्रकल्पासाठी जमिन देत नाहीत व प्रकल्प उभारणीस परवानगी देत नाहीत. मात्र, या परीसरातील नागरीकांना या प्रकल्पामूळे गावांचा मोठा विकास होणार आहे असे वाटत आहे व शेतकरी त्यांची जमीन फक्त दिड लाख रुपये एकर या भावाने प्रकल्पास विकत आहे, ही खेदाची बाब आहे.
- लोकसुनावनीसाठी उपस्थित असलेल्या काही लोकांना ते कशासाठी आले आहेत, हे सुध्दा माहीत नाही. प्रकल्प धारकाने मांडवा, पुलई व बेलगांव लोकांना प्रलोभने देवून येथे मते मांडण्यासाठी प्रवृत्त केलेले आहे, असा आक्षेप घेतला.
- कंपनीने ५०० लोकांना रोजगार देणार असे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमुद केले आहे. या प्रकल्पामध्ये किती स्थानिक नागरिकांना स्थायी स्वरूपाचा? व कोणत्या प्रकारचा रोजगार दिलेला आहे? याची माहीती प्रकल्पधारकाला विचारली.

यावर, प्रकल्पधारकाने माहीती दिली की, नागपूर व वर्धा जिल्हयाच्या अभियांत्रीकी महाविद्यालयातून एकूण ६ अभियंत्यांना स्थायी स्वरुपाचा रोजगार दिला आहे.

वक्त्याने पुन्हा प्रश्न केला की, या ६ अभियंत्यापैकी स्थानिक नागरिकांची संख्या किती आहे? तसेच, इतर क्षेत्रामध्ये एकूण स्थायी कर्मचाऱ्यांपैकी किती स्थानिक नागरिकांना स्थायी स्वरुपाचा रोजगार दिलेला आहे?

यावर, प्रकल्पधारकाने माहीती दिली की, प्रकल्पाच्या रखरखावासाठी १० कर्मचारी कंत्राटी पध्दतीवर कार्यरत आहेत. उद्यानविकासाठी (Horticulture) एकूण २३ स्थानिक कर्मचारी कंत्राटी पध्दतीवर कार्यरत आहेत व एक स्थानिक कर्मचारी सुरक्षा पर्यवेक्षक कंत्राटी पध्दतीवर कार्यरत आहे. एकूण ३९ कर्मचारी व अधिकाऱ्यांना स्थायी स्वरुपाचा रोजगार दिलेला आहे.

यावर, वक्त्याने आक्षेप नोदविला की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये मध्ये ५०० कर्मचाऱ्यांना रोजगार देणार आहे, असे नमूद असून सुध्दा अद्याप पर्यंत फक्त ३९ कर्मचाऱ्यांना स्थायी रोजगार देण्यात आलेला आहे.

- ५०० कर्मचाऱ्यांपैकी कुशल व अकुशल कामगार व स्थायी कामगारांची संख्येची माहिती मागितली.

प्रकल्पधारकाने माहीती दिली की, त्यांनी १०० लोकांना आय टी आय चे शिक्षण व ३ ते ४ लोकांना डीप्लोमा चे शिक्षण घेण्यासाठी पाठविलेले होते. प्रथम त्यांना प्रकल्पाच्या बांधकामाच्या टप्यामध्ये अनूभव देवून पूढे प्रकल्पामध्ये आत्मसात करण्याचे आश्वासन दिलेले आहे.

- पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल २००९ या वर्षाचा असल्यामूळे जूना आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा किमान सहा महिने ते एक वर्ष या कालावधी पूर्वीचा असावा.
- या प्रकल्पातुन दरवर्षी साधारण ३० ते ३५ लाख टन राख निर्माण होणार आहे. प्रकल्पाच्या अहवालात नमुद केल्यानुसार ४ वर्षाच्या कालावधीत गोळा झालेली राख ४ वर्षानंतर पुढील प्रत्येक वर्षात २५-२५ टक्के प्रमाणे विल्हेवाट करण्यात येईल. त्यामुळे, ४ वर्षानंतर एकुण १ करोड २० लाख टन राख प्रकल्पाच्या परिसरात गोळा होईल. या राखेच्या विल्हेवाटीच्या पध्दतीबद्दल स्पष्टीकरण अहवालात दिलेले नाही. याबाबत, माहिती प्रकल्प धारकाने द्यावी.

- प्रकल्पाच्या अहवालात नमुद केल्यानुसार, साधारण ७० गावे प्रदूषणामुळे प्रभावित होणार आहेत. मात्र, प्रकल्प धारकातर्फे फक्त मांडवा, पुलई व बेलगांव याच गावास सुविधा देण्याचे कार्य करीत आहे व इतर गांवामध्ये काहीही सुविधा पुरविलेल्या नाही. या तीन गावां व्यतिरिक्त इतर १२ कि.मी. परिसरातील गांवेसुध्दा प्रदूषणामुळे प्रभावित होणार असल्यामुळे या गावांना लॅन्को प्रकल्प धारकाने काय सुविधा दिलेल्या आहेत? याची माहिती द्यावी. त्याचप्रमाणे, सामाजिक कार्यासाठी किती खर्च केला? हे स्पष्ट करावे.

यावर, प्रकल्प धारकाने माहिती दिली की, मांडवा, पुलई व बेलगांव या गावांतील शेती प्रकल्पासाठी संपादीत केली असल्यामुळे, या गावाच्या विकासासाठी प्रथम प्राधान्य देण्यात आलेले आहे. परंतु विकासाच्या काही योजना जसे, आरोग्य सेवा तीन गावांपर्यंत मर्यादित नसून १० गावांपर्यंत पुरविण्यात येते. त्याचप्रमाणे, काही योजना वर्धा शहरापर्यंत सुध्दा पोहोचविण्यात आलेल्या आहेत. जसे वर्धा येथील अभियांत्रिकी, विधी व वैद्यकीय शिक्षण संस्थामधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.

यावर, संबंधित वक्त्याने सुचना केली की, प्रकल्प धारकाने इतर गावांचा सुध्दा विकास करणे व तेथे सुविधा तातडीने पुरविणे आवश्यक आहे.

- प्रकल्प धारक पर्यावरणावर अंदाजे रू. ४५० कोटी खर्च करणार आहे. प्रकल्प उभारण्यासाठी झाडे कापण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने नवीन झाडांची जी लागवड करीत आहे, ही झाडे मोठी होइपर्यंत लागणारा कालावधी लक्षात घेता या बाबीचा पर्यावरणाच्या दृष्टीने असलेले महत्व विचारले. त्याचप्रमाणे, पर्यावरणाच्या दृष्टीने झाडांची वयोमर्यादा व उंचीबाबत विचारणा केली. तसेच या प्रकल्पामध्ये किती झाडे लावण्यात येणार आहे? अद्यापपर्यंत किती झाडे लावलेली आहेत? याची माहिती विचारली.

प्रकल्प धारकाने याची माहिती दिली की, लॅन्को प्रकल्प हा साधारण २०१४ मध्ये सुरू होणार आहे. वने व पर्यावरण मंत्रालयाच्या मार्गदर्शिकेनुसार साधारणपणे १ लाख ७५ हजार वृक्ष लागवड करावयाची आहे. त्यानुसार, १ आक्टोंबर २०११ ते ३१ मार्च २०१२ पर्यंत काही वृक्ष लागवड केलेली आहे. याची तपासणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ करू शकते. यापैकी, साधारणपणे ८५ टक्के झाडे या उन्हाळयामध्ये सुध्दा आवश्यक पाण्याची सोय उपलब्ध करून जगविलेले आहे व उर्वरीत १५ टक्के झाडांची भरपाई करण्यात येईल व अतिरिक्त ५० हजार झाडांची या वर्षाच्या पावसाळयामध्ये सुध्दा लागवड करणार आहे व त्यानुसार केंद्र शासनाने वृक्ष लागवडीचे दिलेले लक्ष पुर्ण करण्यात येईल.

वक्त्याने सूचना केल्या की, झाडांमध्ये प्रदूषण शोषण्याची क्षमता असली पाहिजे.

- विदर्भामध्ये औष्णिक विद्युत प्रकल्प मोठ्या प्रमाणात स्थापन होत असून, हा परिसर प्रदूषणाचे केंद्र होत आहे. त्यामुळे, विदर्भामध्ये सॉफ्टवेअर, ॲटोमोबाईल व ए ग्रेडचे (प्रदूषण विरहीत) कारखाने स्थापित होत नाहीत. हे प्रदूषण विरहित कारखाने पुणे व मुंबई या सारख्या ठिकाणी स्थापन होत आहेत. विदर्भामधून प्रत्येक वर्षी साधारण १४००० अभियंते निर्माण होतात. मात्र, या अभियंत्याना अनुभवा अभावी औष्णिक विद्युत प्रकल्पासारख्या प्रकल्पामध्ये रोजगार देण्यात येत नाही. त्यामुळे, हे अभियंते पुणे, मुंबई व इतर राज्यामध्ये रोजगारासाठी स्थलांतरित होतात. त्यामुळे, त्यांच्या पालकांचा उदरनिर्वाहाचा आधार नष्ट होतो. त्यासाठी निवृत्ती वेतन निधी क्षेत्र म्हणून घोषित करावे लागणार आहे.
- विदर्भात स्थापित होत असलेल्या औष्णिक विद्युत प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. केंद्र शासनाच्या तज्ञसमितीस सूचना केली की, विदर्भामध्ये औष्णिक विद्युत प्रकल्पांना परवानगी दिल्यास शेतकऱ्यांच्या समस्या निर्माण होतील. त्यामुळे, या औष्णिक विद्युत प्रकल्पाला मान्यता देण्यात येवू नये.

११२. श्री सुधीर पालीवाल, विदर्भ पर्यावरण कृती समिती (विपकृस), नागपूर, जि.नागपूर.

- मप्रनि मंडळाकडे केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाची १४ सप्टेंबर २००९ च्या अधिसूचनेची प्रत मागितली. मप्रनि मंडळाच्या अधिकाऱ्यांनी या अधिसूचनेची प्रत त्यांना दिली.
- या प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा मसुदा तयार केलेल्या संस्थेचे प्रतिनिधी या लोकसुनावणीमध्ये उपस्थित आहे किंवा नाही? याची माहिती विचारली.

यावर, प्रकल्प धारकातर्फे सांगण्यात आले की, त्यांच्या प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा मसुदा मे. विम्टा लॅबस्, हैद्राबाद या संस्थेने तयार केलेला आहे. या संस्थेचे प्रतिनिधी लोकसुनावणी मध्ये उपस्थित आहेत.

- लोकसुनावणी सकाळी ११.०० वाजता सुरू होण्याऐवजी दुपारी १२.०० वाजता, एक तास उशिरा सुरू झाली. त्यामुळे, काही उपस्थित असलेले लोक उशिरापर्यंत थांबू शकत नसल्यामूळे निघून गेलेले आहेत. त्यामुळे, त्यांना मते व्यक्त करण्याची संधी मिळालेली नाही, असा आक्षेप घेतला.
- केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या १४ सप्टेंबर २००६ च्या अधिसूचनेचा हवाला देवून सांगितले की, या अधिसूचनेनुसार लोकसुनावणी घेण्यासाठी एक विशिष्ट पध्दत आहे. त्यानुसार, संबंधित प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सदस्य सचिवांना, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा मसुदा प्राप्त झाल्यापासून ७ दिवसामध्ये लोकसुनावणीचे दिनांक, वेळ व स्थान निश्चित करायचे असते. ही पुर्नलोकसुनावणी असून, मा. उच्च न्यायालयाने पुर्नलोकसुनावणी आयोजीत करण्यासाठी आक्टोबर-२०११ मध्ये आदेश दिल्यानंतर, प्रकल्प धारकाने लवकरच अर्ज केला होता. मात्र, या अर्जावर ताबडतोब कार्यवाही करण्यात आली नाही व सहा-आठ महिने उशिरा पुर्नलोकसुनावणी आयोजीत करण्यात आली. त्याचप्रमाणे, या अधिसूचनेनुसार "अ" वर्गाच्या प्रकल्पासाठी प्रकल्प धारकाकडून लोकसुनावणीसाठी विनंती अर्ज प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांमध्ये लोकसुनावणी आयोजीत केलेली नसल्यास ही प्रक्रिया पुर्ण करणेसाठी केंद्र शासन इतर एजन्सी व प्राधिकरणास नियुक्त करू शकते. ही पुर्नलोकसुनावणी अधिसुचनेनुसार ठराविक कालावधीमध्ये आयोजित केलेली नाही. त्यामुळे, जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला ही लोकसुनावणी संचालन करण्याचा अधिकार नाही.
- केंद्र शासनाच्या १४ सप्टेंबर २००६ च्या अधिसुचनेनुसार लोक सुनावणीचे अध्यक्ष म्हणून जिल्हादंडाधिकारी किंवा अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकाऱ्यांच्या सहाय्याने लोकसुनावणीचे संचालन करावयाचे आहे. असे अधिसुचनेमध्ये स्पष्ट केलेले आहे. मात्र, या लोकसुनावणीची समिती अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार नाही. त्याचप्रमाणे, या अधिसुचनेनुसार लोकसुनावणीच्या समितीमध्ये पोलिस विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश नसतो. मात्र, या लोकसुनावणीच्या समितीमध्ये पोलिस विभागाचे अधिकारी सुध्दा मंचावर उपस्थित आहेत. लोकसुनावणीमध्ये जिल्हाधिकारी वर्धा साधारण एक तासाच्या कालावधीसाठी हजर होत्या. लोकसुनावणीचे अध्यक्ष व लोकसुनावणीच्या समितीमधील सदस्यांची समिती अधिसूचनेमधील तरतुदीनुसार नसल्यामुळे, या समितीस लोकसुनावणी घेण्याचा अधिकार नाही. ही लोकसुनावणी पुर्णतः बेकायदेशीर आहे. असा आक्षेप घेवून, याबद्दल स्पष्टीकरण मागितले.

यावर, मा. अध्यक्षांनी खुलासा केला की, ही लोकसुनावणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घेण्यात येत असून, जिल्हाधिकारी, वर्धा व पोलिस अधिक्षक, वर्धा किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी लोकसुनावणी दरम्यान उपस्थित राहून, लोकसुनावणीचे कामकाजाची देखरेख करावी, असे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेले आहेत. त्याचप्रमाणे, ते स्वतः उपविभागीय दंडाधिकारी असून उपविभागीय दंडाधिकारी व अतिरिक्त जिल्हादंडाधिकाऱ्यांचे पद सममुल्य आहे. तसेच त्यांना जिल्हाधिकारी, वर्धा यांनी या लोकसुनावणीसाठी अध्यक्ष म्हणुन नियुक्त केलेले आहे.

..४१/-

मात्र, विपकृसच्या प्रतिनिधीने आक्षेप घेतला की, लोकसुनावणीच्या स्थळी सुमारे ३०० पोलिस कर्मचारी लोकसुनावणीसाठी हजर आहेत. त्यामुळे पोलिस अधिकाऱ्यांने समितीच्या मंचावर उपस्थित राहणे, अयोग्य आहे. तसेच, उपविभागीय दंडाधिकारी व अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी हे पद सममुल्य असल्याचे त्यांना मान्य नाही. ही लोकसुनावणी बेकायदेशीर असून या लोकसुनावणीस विरोध आहे. याची नोंद घेण्यात यावी. अशी मागणी केली.

- केंद्र शासनाच्या अधिसुचनेनुसार लोकसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या लोकांना प्रकल्प धारकांकडून / अर्जदाराकडुन खुलासा व माहिती मागण्याची मुभा आहे, असे सांगितले. मात्र, यापुर्वी लोकसुनावणीमध्ये ज्या लोकांनी प्रकल्प धारकाकडुन माहिती मागितली, त्यांना मते नोंदविण्यास सांगितले गेले.
- केंद्र शासनाने प्रकल्प धारकास सन २००९ मध्ये दिलेल्या TOR नुसार प्रकल्प धारकाने पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा मसुदा तयार केला आहे किंवा कसे? याचे स्पष्टीकरण मागितले. त्याचप्रमाणे, प्रकल्प धारकाने पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करतांना राष्ट्रीय हवा गुणवत्तेची कोणती मानके विचारात घेतली? या पर्यावरण विषयक मुल्यांकन अहवालाच्या मसुद्यामध्ये त्याची प्रत जोडली आहे किंवा कसे? हे प्रश्न उपस्थित केले.

त्यावर, उपस्थित असलेल्या मे.विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने सांगितले की, केंद्र शासनाने दिलेल्या TOR नुसार त्यांच्या संस्थेने पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा मसुदा तयार केलेला आहे.

- प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा मसुदा तयार करतांना कोणती पर्यावरण मुल्यांकन अहवाल अधिसूचना विचारात घेण्यात आली? या अधिसुचनेची प्रत पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या मसुद्यासोबत जोडली आहे काय? त्याचप्रमाणे, या अधिसुचनेमधील हवा गुणवत्तेचे मानकांची माहिती अहवालामध्ये जोडलेली आहे काय?

प्रकल्प धारकाने माहिती दिली की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये हवा गुणवत्तेची मानके दिलेली आहेत.

- प्रकल्प धारकाने पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा अभ्यास करतांना अधिसुचनेनुसार आवश्यक असलेल्या प्रदूषण घटकांच्या प्रमाणाची तपासणी केलेली नाही. याबाबत, माहिती दिली की, प्रकल्प धारकाने सल्फर डायऑक्साईड, ऑक्साईड ऑफ नायट्रोजन, धुळीकण, श्वसनीय धुळीकण (पीएम-१०) या प्रदूषण घटकांच्या प्रमाणाची तपासणी केलीआहे. मात्र, श्वसनीय धुळीकण (पीएम- २.५) चे प्रमाण तपासलले नाही. याचे स्पष्टीकरण मागितले.

यावर, प्रकल्प धारकाने माहिती दिली की, ज्या कालावधीमध्ये (आक्टोंबर-२००९ ते डिसेंबर-२००९) हवा प्रदूषण घटकाची तपासणी करण्यात आली होती, त्यावेळेस श्वसनीय धुळीकण (पीएम- २.५) चे मानके अस्तित्वात नव्हते.

यावर, विपससच्या प्रतिनिधीने आक्षेप घेतला की, या कालावधी (नोव्हेंबर-२००९) मध्ये श्वसनीय धुळीकण (पीएम- २.५) चे मानके अस्तित्वात होती.

याबाबत, विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने अधिक माहिती देतांना सांगितले की, श्वसनीय धुळीकण (पीएम- २.५) या प्रदूषण घटकाचे प्रमाण तपासण्यासाठी त्यावेळेस उपकरणाचे विनिर्देश (Specification) उपलब्ध नव्हते. हे विनिर्देश सन २०१० मध्ये उपलब्ध झाले.

यावर, विपकृसच्या प्रतिनिधीने प्रश्न केला की, उपकरणाचे विनिर्देश (Specification) जेव्हा उपलब्ध नव्हते व श्वसनीय धुळीकण (पीएम- २.५) प्रदूषण घटकाचे तपासणी करणे शक्य नव्हते, तर केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयातर्फे सुट कां घेण्यात आली नाही? त्यांनी सांगितले की, प्रकल्प धारकाने ही सुट केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयातर्फे प्राप्त केलेली नाही. श्वसनीय धुळीकण (पीएम- २.५) प्रदूषण घटक हा कोळशावर आधारित औष्णिक विद्युत प्रकल्पातुन उत्सर्जित होतो व आरोग्यास धोकादायक प्रदूषण घटक आहे.

- TOR हा लॅन्को महानदी पावर या प्रकल्पास देण्यात आलेला आहे. या प्रकल्पाचे नांव बदलले असून, आता लॅन्को विदर्भ औष्णिक विद्युत लि. असे आहे. परंतु, प्रकल्पाचे फक्त नांव बदलले आहे किंवा लॅन्को महानदी पॉवर प्रकल्प हे लॅन्को विदर्भ थर्मल पॉवरने स्विकारलेला आहे? याबाबत कोणतेही दस्तावेज प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नाही.

यावर, प्रकल्प धारकाने सांगितले की, याबाबत ते आवश्यक दस्तावेज देतील.

- प्रकल्पाच्या अहवालामध्ये, प्रकल्प स्थळापासून १५ कि.मी. अंतरावर अस्तित्वात असलेले किंवा प्रस्तावित असलेले राष्ट्रीय उद्याने, वन्यजीव अभयारण्ये, व्याघ्र प्रकल्प, प्राण्यांचे स्थलांतर मार्ग इ. ची माहिती दिलेली नाही. प्रकल्प स्थळापासून १५ कि.मी. अंतरावर या बाबी अस्तित्वात किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणपत्र मुख्य वन्यजीव संरक्षकाकडून प्राप्त केले आहे काय? त्याचप्रमाणे, या विषयाबाबत त्यांनी माहिती दिली की, प्रकल्प स्थळापासून १५ कि.मी. अंतरामध्ये प्राण्यांचे स्थलांतर मार्ग अस्तित्वात आहेत.

याबाबत, प्रकल्प धारकाने माहिती दिली की, लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. या प्रकल्पाच्या स्थळापासून बोर वन्यजीव अभयारण्य १५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर आहे, असे नाहरकत प्रमाणपत्र परिक्षेत्र वन अधिकारी (Range Forest Officer), वर्धा यांनी दिलेले आहे. प्रकल्प धारकाने अधिक माहिती दिली की, उपवनसंरक्षक (Deputy Consevetor of Forest), वर्धा यांनी सुध्दा प्रकल्पाच्या स्थळापासून सरळ समांतर रेषेमध्ये बोर वन्यजीव अभयारण्य १५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर आहे, असे नाहरकत प्रमाणपत्र दिले आहे.

यावर, विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले की, प्रकल्प अहवालातील माहितीनुसार या परिसरामध्ये अंदाजे १० ते १५ वने आहेत. त्यामुळे, प्राण्यांचे स्थलांतर मार्ग नक्कीच अस्तित्वात असून वन्यजीव एका वनामधुन दुसऱ्या वनामध्ये स्थलांतर करीत असतात. या प्रकल्पामुळे जर प्राण्यांचे स्थलांतरीत मार्ग बाधीत होत असतील तर, ती गंभीर बाब आहे. त्याचप्रमाणे, बोर वन्यजीव अभयारण्य हे राष्ट्रीय उद्यान म्हणुन प्रस्तावित आहे.

- प्रकल्पासाठी लागणाऱ्या कोळशाचे पृथःकरण TOR नुसार करणे आवश्यक आहे. त्यानुसार कोळशामध्ये असलेले गंधक, राख, जड धातु जसे क्रोमीअम (Cr), लेड (Pb), मर्क्युरी (Hg) व आर्सेनिक (As) या घटकांचा पृथःकरण अहवालाबद्दल विचारणा केली.

प्रकल्प धारकाच्या सल्लागाराने माहिती दिली की, मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. प्रकल्पाला साऊथ इस्टर्न कोल लि. (SECL) चा कोळसा मिळणार आहे. या भागातील कोळशामध्ये पारा (Hg) आढळत नाही. देशामध्ये फक्त दामोदर नदीच्या खोऱ्यामधील कोळशामध्ये पारा (Hg) आढळतो.

* विपकृसच्या प्रतिनिधीने पुन्हा कोळशाच्या पृथःकरण अहवालाची माहिती मागितली व सांगितले की, प्रकल्प धारकाने कोळशाच्या घटकाबद्दल जी माहिती उपलब्ध केली आहे, त्यामध्ये, कार्बन, हायड्रोजन, नायट्रोजन, ऑक्सीजन, सल्फर इ. घटकांचे प्रमाण दिलेले आहे. या अहवालाची मदत फक्त बाष्पके विकत घेण्यासाठीच होवू शकते. असे सांगितले. मात्र, प्रकल्पाला दिलेल्या TOR नुसार कोळशाचे पृथःकरण केलेले नाही, प्रकल्प धारकास कोळशाच्या उगमस्थानाची माहिती नाही, असे असतांना सुध्दा, तसेच कोळशाच्या पृथःकरण अहवालाची माहिती उपलब्ध नसतांना सुध्दा मांडवा, पुलई, बेलगांव व वर्धा येतील लोकांवर पर्यावरणाचा काय परिणाम होणार आहे, याचे मुल्यांकन केलेले आहे. त्यामुळे, प्रकल्पाचा पर्यावरण मुल्यांकन अहवाल चुकीचा आहे. असा आक्षेप घेतला.

यावर, प्रकल्प धारकातर्फे मे.विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने सांगितले की, कोळशाचे पृथःकरणाची माहिती अहवालामध्ये उपलब्ध आहे.

मात्र, विपकृसच्या प्रतिनिधीने पुन्हा आक्षेप घेतला की, कोळशाचा पृथःकरण अहवाल TOR मध्ये दिलेल्या घटकांसाठी उपलब्ध केलेला नाही.

यावर, सदस्यांनी प्रकल्प धारकास सूचना केल्या की, विपकृसच्या प्रतिनिधीने TOR नुसार कोळशाच्या पृथःकरण अहवालाबद्दल मागितलेली माहिती द्यावी, विशेषतः जड धातुंचा पृथःकरण अहवालाबाबत माहिती द्यावी.

याबाबत, विपकृसच्या प्रतिनिधीने ठामपणे सांगितले की, प्रकल्प धारकाने TOR नुसार कोळशाचे पृथःकरण केलेले नाही, विशेषतः कोळशामधील जड धातुंचे पृथःकरण व हा पृथःकरण अहवाल उपलब्ध नाही. त्यांनी आक्षेप घेतला की, या पृथःकरण अहवालाशिवाय पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करता येणे शक्य नाही. प्रकल्प धारकाने कोळशाचे पृथःकरण न करता कोळशामधील घटकांची माहिती गृहित धरलेली आहे.

* प्रकल्पाने सादर केलेल्या अहवालातील माहितीनुसार, प्रकल्प धारकाला कोल लिंकेज मिळालेला आहे, कोळसा प्राप्त करण्याचा उगम सुध्दा माहिती होता. त्यामुळे, प्रकल्प धारकाला कोळसा कोणत्या खाणीच्या क्षेत्रातुन प्राप्त होणार आहे, ही पक्की माहिती असून सुध्दा त्या क्षेत्रातील कोळशाचे पृथःकरण केलेले नाही. याबाबत विपकृसच्या प्रतिनिधीने निदर्शनास आणून दिले की, कदाचित त्या क्षेत्रातील कोळशामध्ये सल्फर, पाऱ्याचे व किरणोत्साराचे (Radioactivity) प्रमाण जास्त असावे. म्हणुन प्रकल्प धारकाने कोळशाचे पृथःकरण जाणूनबूजून केलेले नाही.

यावर, प्रकल्प धारकाने खुलासा केला की, केंद्र शासनाच्या प्रचलित पध्दतीनुसार कोल लिंकेज देण्यात येवून प्रकल्प कार्यान्वीत करण्याच्या सहा महिन्यापुर्वी विशिष्ट कोळसा खाणींचे वाटप करण्यात येते.

यावर, विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले की, प्रकल्प धारकाला कोळशाच्या उगमस्थानाचे क्षेत्र माहिती असून सुध्दा कोळशाचे पृथःकरण केले नाही व पुन्हा दावा केला की, प्रकल्प धारकाला जिथून कोळसा मिळणार आहे, त्या कोळसा खाणीची माहिती होती.

प्रकल्प धारकाने खुलासा की, कोळशाच्या उगमस्थानाच्या क्षेत्राच्या आधारावरच कोळशाचे पृथःकरण केलेले आहे.

..४४/-

विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले की, प्रकल्प धारकास कोल लिंकेज कोणत्या क्षेत्रातुन मिळणार आहे, याची माहिती आहे. कारण इंधनाचे कायम लिंकेज असल्याशिवाय पर्यावरण मुल्यांकन अहवाल तयार करता येत नाही.

- रेन वॉटर हार्वेस्टिंग (Rain Water Harvesting) द्वारे प्रकल्पाच्या क्षेत्रामध्ये पडणारे पावसाचे पाणी गोळा करून त्या पाण्याचा वापर कशाप्रकारे करणार आहे?

मे. विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने सांगितले की, या विषयाबाबत माहिती पर्यावरण मुल्यांकन अहवालामध्ये दिलेली आहे.

विपकृसच्या प्रतिनिधीने या अहवालाबाबत सांगितले, प्रकल्पासाठी ७०४७२.५ घनमिटर प्रतीतास गतीने पाणी गोळा करणार आहे. मात्र, एकुण पाणी किती गोळा होणार आहे? व त्याचा वापर प्रकल्पामध्ये कशासाठी करणार आहे? याची माहिती दिली नाही. ही माहिती TOR नुसार देणे आवश्यक आहे.

मे. विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने माहिती दिली की, रेनवॉटर हार्वेस्टिंगद्वारे भुगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यात येईल.

विपकृसच्या प्रतिनिधीने आक्षेप घेतला की, TOR नुसार रेनवॉटर हार्वेस्टिंग द्वारे गोळा केलेल्या पाण्याचा वापर प्रकल्पासाठी करावयाचा आहे. प्रकल्पाने हजारो एकर जमिन संपादन करून सुध्दा रेनवॉटर हार्वेस्टिंगचे पाणी साठवणाची व्यवस्था अद्याप तयार केलेले नाही. त्याचप्रमाणे, रेनवॉटर हार्वेस्टिंगच्या पाण्याचा वापर खोल विहिरीद्वारे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी केला तर भूगर्भातील पाणी प्रदूषित होईल.

प्रकल्प धारकाने सांगितले की, रेनवॉटर हार्वेस्टिंगचे संकल्पन (Design) तयार करून केंद्रिय भुजल प्राधिकरणास मंजुरीसाठी पाठविलेला आहे. त्यास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर ही योजना अंमलात आणण्यात येईल. मात्र, रेनवॉटर हार्वेस्टिंगद्वारे पाण्याचा वापर प्रकल्पासाठी करण्याची बाब त्यांनी नोंद केली आहे. रेनवॉटर हार्वेस्टिंगची योजना प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतरच राबविण्यात येईल.

यावर, विपकृसच्या प्रतिनिधीने पुन्हा आक्षेप घेतला की, TOR नुसार रेनवॉटर हार्वेस्टिंगचे पाणी प्रकल्पामध्ये कशासाठी वापरण्यात येणार आहे? याची माहिती दिलेली नाही व आरोप केला की, जलाशयामध्ये पाणी साठवून ठेवणे खर्चिक बाब होईल. त्यामुळे, रेनवॉटर हार्वेस्टिंगचे पाणी प्रकल्पामध्ये वापरायची योजना प्रकल्प धारकाने तयार केलेली नाही.

विपकृसच्या प्रतिनिधीने पुढे सांगितले की, प्रकल्पाच्या हजारो एकर क्षेत्रामध्ये कोळशापासून निर्माण झालेली धूळ, राख, सांडपाण्याचा या प्रभावित क्षेत्रामध्ये प्रभाव होईल व रेनवॉटर हार्वेस्टिंगद्वारे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवायचा प्रयत्न केल्यास या रेनवॉटर हार्वेस्टिंगच्या माध्यमातून प्रदूषण घटक विशेषत: मर्क्युरीमुळे भुगर्भातील पाण्याचे प्रदूषण होईल. रेनवॉटर हार्वेस्टिंगद्वारे पाण्याची साठवण करून प्रकल्पासाठी वापरल्यास त्या प्रमाणात शेतकऱ्यांसाठी पाणी उपलब्ध झाले असते. सदस्यांनी त्यावर प्रकल्प धारकास विचारणा केली की, रेनवॉटर हार्वेस्टिंगचे पाण्याची साठवण व्यवस्था केलेली आहे काय?

प्रकल्प धारकाने माहिती दिली की, २९ मे २०१२ रोजी विभागीय संचालक, केंद्रीय भूजल प्राधिकरणास रेनवॉटर हार्वेस्टिंग बद्दलची संपूर्ण योजना सादर केलेली असून, मंजुरी मागितलेली आहे. या संपूर्ण योजनेची माहिती आवश्यक असल्यास देण्यात येईल.

यावर, विपकृसच्या प्रतिनिधीने निदर्शनास आणून दिले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा आक्टोबर-२०१० मध्ये तयार केलेला आहे. मात्र, रेनवॉटर हार्वेस्टिंगची योजना सन २०१२ मध्ये सादर करण्यात आहे. ही योजना सन २०१० च्या अहवालामध्ये समाविष्ट करणे आवश्यक होती.

- राखेच्या बंधाऱ्याची अभेद्यता (Impermeability) बद्दल माहिती विचारली.

याबाबत, प्रकल्प धारकाने सांगितले की, राखेच्या बंधाऱ्याला अस्तर (Lining) लावण्यात येईल. ज्यामुळे सांडपाण्याची गळती होणार नाही.

यावर, विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले की, राखेच्या बंधाऱ्यामध्ये कृत्रिम अस्तर लावणे आवश्यक आहे. मात्र, कुठल्या प्रकारचे अस्तर लावणार आहे, ही माहिती अहवालामध्ये दिलेली नाही. त्यामुळे १० ते १५ वर्षामध्ये राखेच्या बंधाऱ्यातुन सांडपाण्याची गळती होवून तिन्ही गावाचे भूजल क्षेत्र नष्ट होईल.

यावर, प्रकल्प धारकाने सांगितले की, प्रथम प्रकल्पाच्या अहवालामध्ये राबविण्याच्या योजनांची ठळक माहिती दिलेली असते. मात्र, त्यावेळेस या योजनांची अभियांत्रिकी पुर्ण झालेली नसते. मात्र, योजना राबविण्यापुर्वी त्या सर्व योजनांची अभियांत्रिकी पूर्ण करण्यात येईल. यामध्ये राखेच्या बंधाऱ्याला अस्तर लावण्याची योजना सुध्दा समाविष्ट आहे. परंतु, अद्याप प्रकल्प पुर्ण झालेला नाही. त्यामुळे, योजनांची अभियांत्रिकी पुर्ण करण्याची स्थिती आलेली नाही.

सदस्याने सुध्दा प्रकल्प धारकास विचारणा केली की, राखेच्या बंधाऱ्यामध्ये अभेद्यता राखणेसाठी जिओ अस्तर किंवा कृत्रिम अस्तर वापरणार आहे?

प्रकल्प धारकाने याबाबत सांगितले की, आवश्यकतेनुसार योग्य अस्तर वापरण्यात येईल व हा अभियांत्रिकीचा भाग आहे.

मात्र, विपकृसच्या प्रतिनिधीने निदर्शनास आणले की, TOR नुसार अस्तराची विस्तृत माहिती अहवालामध्ये देणे आवश्यक होते व खंत व्यक्त केली की, संपूर्ण विदर्भामध्ये स्थापित होत असलेले औष्णिक विद्युत प्रकल्प, ही योजना खर्चिक असल्यामुळे, या विषयाकडे दुर्लक्ष करीत आहेत.

- वनस्पती व प्राणी संरक्षण योजनेबद्दल माहिती विचारली. परिसरामध्ये आढळलेल्या वनस्पती व वन्यजीव विशिष्ट प्राधिकरणाकडून अधिप्रमाणित (Authenticate) करून त्याची संरक्षण योजना तयार करावयाची आहे.

याबाबत, मे.विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने माहिती दिली की, वनस्पती व वन्यजीव अधिप्रमाणित केल्याची यादी उपलब्ध आहे.

यावर, विपकृसच्या प्रतिनिधीने वनस्पती व वन्यजीव संरक्षण योजनेबद्दल पुन्हा माहिती विचारली व सांगितले की, शेड्युल-२ (Sheduled-II) मध्ये मोडणारे सुध्दा प्राणी आढळल्यामुळे, ही संरक्षण योजना सादर करणे आवश्यक आहे.

- प्रकल्प धारकाने या लोकसुनावणी दरम्यान माहिती दिली आहे की, राख व्यवस्थापनासाठी उच्च घनता स्लरी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल. मात्र, अहवालामध्ये कृश (Lean) घनता स्लरी तंत्रज्ञानाचा उल्लेख केलेला आहे. याबाबत, स्पष्टीकरण विचारले.

 यावर, प्रकल्प धारकाने खुलासा केला की, मुळ अहवालामध्ये कृश घनता तंत्रज्ञानाचा उल्लेख केलेला होता. या आधारावर केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाकडून पर्यावरण परवाना सुध्दा प्राप्त झालेला आहे. मात्र, राखेच्या व्यवस्थापनासाठी उच्च घनता स्लरी तंत्रज्ञानाचा वापर प्रस्तावित असून हे तंत्रज्ञान राबविण्यात येईल, असे आश्वासन दिले.

- प्रकल्पाने संपादित केलेल्या जमिनीच्या वापराबद्दल प्रकल्प अहवालामध्ये उल्लेख केला आहे की, प्रकल्पाने संपादित केलेली जमिन एकेरी पिकाची आहे. यासाठी प्रकल्प धारकाने २००१ ची जनगणना नुसार असलेले आकडेवारी, त्यावेळेस जमिनीचा असलेला वापर इ. माहिती व सॅटेलाईट मार्फत मिळालेली आधार सामुग्री (Data) चा आधार घेतलेला आहे. मात्र, १२ वर्षापुर्वीच्या (२००१ ची जनगणना) माहितीवर अवलंबून राहणे चुकीचे आहे. त्याचप्रमाणे, सॅटेलाईट मार्फत मिळालेली आधार सामुग्री (Data) कोणाकडून प्राप्त केली आहे? ही आधार सामुग्री कोणत्या कालावधीची आहे? याची माहिती विचारली.

 मे.विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने माहिती दिली की, ही आधारसामुग्री नॅशनल रिमोट सेन्सींग एजन्सीकडून ७ मार्च २००९ रोजी प्राप्त केलेली आहे.

 विपक्षसच्या प्रतिनिधीने निदर्शनास आणून दिले की, मार्च महिन्यामध्ये शेतकरी शेती करीत नसतो. त्यामुळे, मार्च २००९ च्या सॅटेलाईट आधार सामुग्रीच्या माहितीमुळे जमिन एकेरी पिकाची आहे किंवा दुहेरी पिकाची आहे, हे सिध्द करता येत नाही. सॅटेलाईट आधार सामुग्रीनुसार प्रभावित क्षेत्र एकुण ४१७६३ हेक्टर आहे व सन २००१ च्या जनगणनेच्या माहितीनुसार अहवालामध्ये हे क्षेत्र आणखी दहा हजार हेक्टरने जास्त दाखविलेले आहे. या दोन्ही माहितीमध्ये त्रुटी आहेत. त्यामुळे या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये बऱ्याच त्रुटी आहेत, हे निदर्शनास आलेले आहे.

- केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाने प्रकल्पास निर्देश दिले होते की, प्रकल्पाद्वारे संपादित केलेली जमिन एकेरी पिकाची आहे किंवा दुहेरी पिकाची आहे, याबाबतचा अहवाल तहसिल दाराकडून घेण्यात यावा. याबाबत पुढे सांगितले की, प्रकल्प धारकाने संपादित केलेली जमिन दुहेरी पिकाची आहे.
- प्रकल्पातुन किती सांडपाण्याची निर्मीती होणार आहे? त्यावर, कशाप्रकारे प्रक्रिया केली जाणार आहे? व प्रक्रियाकृत सांडपाण्याचा वापर कसा करण्यात येणार आहे?

 मे.विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने सांगितले की, प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विविध प्रकारच्या सांडपाण्याची व त्यावर करण्यात येणाऱ्या प्रक्रियेची माहिती दिलेली आहे. त्यानुसार, शितकरणामधून ६७२ घनमीटर प्रतीदिन सांडपाणी निर्माण होणार आहे व त्यातील प्रदूषण घटक, एकुण विरघळलेले पदार्थ (TDS) आहे. डी.एम. प्लान्टला लागणाऱ्या पाण्याच्या प्रक्रियेसाठी असणाऱ्या क्लॅरीफायरमधून ७७ घनमीटर सांडपाणी निर्माण होणार. प्रकल्पाची वसाहत व प्रकल्पामधून एकुण १७ घनमीटर प्रतीदिन घरगुती स्वरूपाचे सांडपाणी निर्माण होणार आहे. डी.एम. प्लान्टमधून ११ घनमीटर प्रतीदिन सांडपाणी निर्माण होणार आहे.

..४७/-

विपकृसच्या प्रतिनिधीने निदर्शनास आणून दिले की, सांडपाण्यावरील प्रस्तावित प्रक्रियेनुसार सांडपाण्याचा जास्तीत जास्त भाग राख हाताळणी केंद्रामध्ये वापरण्यात येईल. याबाबत, विचारणा केली की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ राख हाताळणी केंद्रास सांडपाणी प्रक्रिया केंद्र म्हणून विचारात घेते काय? व निदर्शनास आणून दिले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या प्रकल्पास प्रकल्प उभारण्यासाठी संमतीपत्र प्रदान केलेले असून, त्यानुसार, सर्व प्रकारच्या सांडपाण्यावर प्रक्रिया केल्यानंतरच त्याचा पुर्नवापर करण्यात यावा. प्रकल्पाच्या अहवालानुसार मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. सांडपाण्यावर सिवेज ट्रिटमेंट प्लान्टमध्ये (STP) प्रक्रिया करणार आहे, मात्र, हे चुकीचे शास्त्र आहे. तसेच या अहवालामध्ये सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेची माहिती दिलेली नाही. त्याचप्रमाणे, प्रकल्पाच्या अहवालानुसार सांडपाणी प्रक्रिया संयंत्र उभारण्यासाठी ५० करोड रुपयांची तरतूद केली आहे, ही सुध्दा माहिती चुकीची आहे. ही रक्कम मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. मधून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याच्या तुलनेमध्ये फार मोठ्या प्रमाणात दाखविलेली आहे. सर्वच औष्णिक विद्युत प्रकल्पामध्ये सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्यात येत नाही.

यावर, प्रकल्पाच्या वतीने सल्लागाराने खुलासा केला की, ही बाब खरी नाही. मात्र, काही औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या बाबतीत ही वस्तुस्थिती असू शकते.

- मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. च्या धुराड्यांमधून ५० कि.ग्रॅ. /दिन पाऱ्याचे उत्सर्जन होणार आहे. याबाबत, प्रकल्पधारक सहमत आहे काय? त्यांनी असा प्रश्न विचारला.

ही बाब अमान्य करून प्रकल्प धारकाच्या वतीने सल्लागाराने निदर्शनास आणून दिले की, प्रकल्प धारकाने कोळशामधील घटकांचे प्रमाण अद्यापपर्यंत निश्चित केलेले नाही, असे विपकृसच्या प्रतिनिधीने यापुर्वी या लोकसुनावणीमध्ये सांगितलेले आहे व पुढे सांगितले की, राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान केंद्र नागपूर तर्फे दामोदर नदीचे खोरे व उथळा नदीच्या खोऱ्यांमधील कोळशाच्या गुणवत्तेचा अभ्यास केला होता. त्यानुसार पाऱ्याचे प्रमाण या क्षेत्रामध्ये जास्त आढळले. मात्र, हा पाऱ्याचा पट्टा साऊथ ईस्टर्न कोलफिल्ड्स (SECL) च्या क्षेत्रामध्ये नाही. त्यामुळे, साऊथ ईस्टर्न कोलफिल्ड्स (SECL) च्या क्षेत्रातील खाणीच्या कोळशामध्ये, जेथून मे. लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. कोळसा घेणार आहे, पाऱ्याचे प्रमाण नगण्य आहे.

मात्र, विपकृसच्या प्रतिनिधीने निदर्शनास आाणून दिले की, प्रकल्पाच्या अहवालामध्ये, कोळशामध्ये पाऱ्याचे प्रमाण ०.४ मिलीग्रॅम/कि.ग्रॅ. नमुद केलेले आहे.

- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकानुसार कोळश्या मधील राखेचे प्रमाण ३४ टक्क्या पेक्षा जास्त नसावे. परंतु, या प्रकल्पामध्ये ४२ टक्के राख असलेला कोळसा वापरण्यात येणार आहे व त्यामध्ये पाऱ्याचे प्रमाण ०.४ मिलीग्रॅम/कि.ग्रॅ. नमुद केलेले आहे. या प्रकल्पास मानकानुसार ३४ टक्के राख असलेला कोळसा वापरायचा असल्यामुळे कोळशामधील पाऱ्याचे प्रमाण ४२ टक्के राख असलेल्या कोळशापेक्षा जास्त राहील. त्यांनी मागणी केली की, पाऱ्याचे प्रमाण ०.४ मिलीग्रॅम/कि.ग्रॅ. नमुद केलेले असून, त्यानुसार, एकुण पाऱ्याचे प्रतीदिन उत्सर्जनाचे प्रमाणाबद्दल माहिती विचारली.

यावर, प्रकल्प धारकाच्या सल्लागाराने सांगितले की, पाऱ्याचे प्रतिदिन उत्सर्जनाचे प्रमाण प्रत्यक्ष कोळसा प्राप्त झाल्यानंतर त्याच्या पृथःकरण अहवालानंतर ठरविण्यात येईल. त्याचप्रमाणे, ठामपणे सांगितले की, फक्त दामोदर नदीच्या खोऱ्यामध्ये असलेल्या कोळशामध्येच पारा आढळलेला आहे, अन्य क्षेत्रात नाही. अन्यथा देशाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये कोळशातील पाऱ्यामुळे लोकांना मिनीमोटा आजार झाला असता.

..४८/-

विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालानुसार मे. लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. प्रकल्पामध्ये वापरण्यात येणाऱ्या कोळशातील पाऱ्याचे प्रमाण नमुद केले आहे. त्यामुळे मांडवा, पुलई व बेलगांव हे तिन्ही गांवे प्रभावित होणार आहेत. या परिणामाबाबत फक्त लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. या एकाच प्रकल्पाच्या परिणामाचा विचार करण्यात येवू नये, मात्र, विदर्भात येणाऱ्या इतर औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या परिणामाचा विचार करणे आवश्यक आहे, असे सांगितले.

- विदर्भामध्ये १३२ नवीन औष्णिक विद्युत प्रकल्प प्रस्तावित आहेत, अशी बातमी Times of India व Economics Times या इंग्रजी वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेली होती. या क्षेत्रामध्ये औष्णिक विद्युत प्रकल्प स्थापन्यासाठी पाण्याची उपलब्धता हे कारण आहे. यासाठी सिंचनाचे पाणी विज प्रकल्पासाठी वर्ग करण्यात येत आहे. या प्रस्तावित औष्णिक विज प्रकल्पातून १ लाख मेगावॅट विज निर्माण होणार आहे. दररोज ५० लाख टन पाणी लागणार आहे. दररोज १५ लाख टन कोळशाचे ज्वलन होणार आहे. एकुण ७ लाख टन राख निर्माण होणार आहे. उर्जा संशोधन संस्थेच्या मानकानुसार १ मेगावॅट औष्णिक विजनिर्मिती प्रकल्पामधून निर्माण होणाऱ्या राखेच्या व्यवस्थापनासाठी १ एकर जागेची आवश्यकता असते. त्यामुळे, एकुण १ लाख एकर सुपिक जमीन राखेच्या व्यवस्थापनासाठी लागणार आहे. त्यामुळे जेथे आवश्यकता आहे, त्या क्षेत्रामध्येच विकेंद्रीकरणाच्या तत्वावर विद्युत प्रकल्प उभारण्याची आवश्यकता आहे. मात्र, एकाच क्षेत्रात हजारो मेगावॅट विजनिर्मिती करून पर्यावरणाचा ऱ्हास करणे, चुकीची बाब आहे.
- प्रकल्प धारकाच्या बांधिलकी (Commitment) नुसार ४ वर्षामध्ये १०० टक्के राखेचा वापर करणार आहे. ही बाब संपूर्ण देशामध्ये अद्याप शक्य झाली नाही. लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. ला राख साठविण्यासाठी अंदाजे १३२० एकर जमिनीची आवश्यकता आहे. त्यामुळे प्रस्तावित राखेच्या बंधाऱ्याची आकारमानानुसार क्षमता काय आहे? याबद्दल माहिती विचारली. उच्च घनता स्लरी तंत्रज्ञान सुध्दा १०० टक्के यशस्वी नाही. मात्र, प्रकल्प धारक निम्न घनता स्लरी तंत्रज्ञाना ऐवजी उच्च घनता स्लरी तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे, याचे स्वागत केले.

मे. विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने सांगितले की, राखेच्या बंधाऱ्याचे क्षेत्र ४०० एकर आहे.

मात्र, आकारमानानुसार राखेच्या बंधाऱ्याची क्षमतेबद्दल विपकृस च्या प्रतिनिधीने माहिती विचारली.

यावर, प्रकल्प धारकाने खुलासा केला की, राखेच्या बंधाऱ्याचे क्षेत्र ३५० एकर आहे, ही माहिती अहवालामध्ये दिलेली आहे. मात्र, राखेच्या बंधाऱ्याची क्षमता निश्चित करणे संकल्पनची (Design) बाब आहे. त्यांनी आश्वासन दिले की, ४ वर्षानंतर १०० टक्के राख वापरली जाईल.

यावर, विपकृसच्या प्रतिनिधीने आक्षेप घेतला की, राखेच्या बंधाऱ्याची आकारमानानुसार क्षमतेची माहिती आज देणे आवश्यक आहे. सदस्यांनी, प्रकल्प धारकाला विचारणा केली की, ४ वर्षानंतर १०० टक्के राख वापरली जाणार आहे काय? यावर, प्रकल्प धारकाने पुन्हा सांगितले की, पहिल्या वर्षापासूनच राख वापरण्याचा प्रयत्न केला जाईल व ४ वर्षानंतर शासनाच्या नियमानुसार १०० टक्के राख वापरली जाणार आहे.

मात्र, पुन्हा विपकृसच्या प्रतिनिधीने आकारमानानुसार राख बंधाऱ्याच्या क्षमतेची माहिती विचारली.

..४९/-

यावेळेस, सदस्यांनी हस्तक्षेप करत विपकृसच्या प्रतिनिधीला सांगितले की, प्रकल्प धारकाने राख बंधाऱ्याच्या क्षेत्राची माहिती दिलेली आहे, मात्र, आकारमानानुसार राख बंधाऱ्याच्या क्षमतेची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

याबाबत, विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले की, सदर प्रकल्पाकडे ४ वर्षापर्यंत राख साठविण्यासाठी पुरेशी क्षमता नाही. त्यामुळे, प्रकल्प धारक संबंधित गावांतील शेतकऱ्यांची अधिक जमिन संपादित करू शकते. तसेच राखेच्या अयोग्य विल्हेवाटीमुळे जमिनीच्या प्रदूषणाचे सुध्दा प्रश्न निर्माण होतील. त्याचप्रमाणे, प्रकल्प ४ वर्षानंतर १०० टक्के राखेचा वापर करू शकत नाही व याबाबत विविध कारणे दिली.

प्रकल्प धारकाने माहिती दिली की, केंद्रिय विद्युत प्राधिकरणाच्या मानकानुसारच प्रकल्पासाठी लागणारी जमिन संपादित करणे सुरू आहे.

राखेचा १०० टक्के वापर करावयाचा असल्यास औष्णिक विद्युत प्रकल्पांचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे, असे विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले. विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात औष्णिक विद्युत प्रकल्प स्थापित केल्यास पर्यावरण व प्रदूषणाचे प्रश्न निर्माण होतील.

- शेतजमीनीमध्ये दोन टन प्रती हेक्टर राख टाकल्यास ३० टक्के पिकाची उपज वाढते, हे सांगून कंपनीकडून शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात आहे, विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले की, या प्रकल्पाद्वारे दरवर्षी २००० टन राख शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये विल्हेवाटीचा उद्देश आहे. याबाबत, स्पष्टीकरण मागितले.

प्रकल्पाच्या वतीने मे.विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने माहिती दिली की, एनटीपीसी, दादरी येथे उडणाऱ्या राखेवर वृक्ष लागवड केलेली असून, झाडांचा चांगल्याप्रकारे टिकाव (Survival) होत आहे.

यावर, विपकृसच्या प्रतिनिधीने निदर्शनास आणुन दिले की, वृक्ष लागवड व शेती या दोन भिन्न बाबी आहेत व वृक्ष लागवड हा दूषित (Contaminated) जमिनींचा सुधारात्मक (Soil Remeadiation) उपाय आहे.

प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने खुलासा केला की, संस्थेने केलेल्या अभ्यासानुसार राख शेतजमिनीवर वापरल्याने पिकांची उपज वाढते ही, त्या संस्थेची एक सूचना आहे. याचा अर्थ असा नाही की, प्रकल्पातील राख शेतकऱ्यांच्या शेतात विल्हेवाट करण्यात येईल.

विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले की, प्रकल्पातुन राखेची विल्हेवाट शेतात करण्यात येणार आहे. त्यामुळे या राखेत असलेले प्रदूषण घटक जसे, पारा व किरणोत्सारी (Radioactivity) शेतीतून उत्पन्न होणाऱ्या धान्यांमध्ये समाविष्ट होईल व असे दूषित धान्य शेतकरी सेवन करतील काय? याबाबत उदाहरण देवून सांगितले की, पशुवैद्यकीय संस्थेने कोराडी थर्मल पॉवर स्टेशन, नागपूर च्या ५ कि.मी. परिसरात केलेल्या अभ्यासानुसार, त्या परिसरात चरणाऱ्या (Grazing) गायी, म्हशींच्या दूधामध्ये पाऱ्याचे प्रमाण आढळले आहे.

- सदर प्रकल्प वर्धा शहर तसेच गावांजवळ असल्यामुळे, या प्रकल्पातुन उत्सर्जित होणाऱ्या सल्फर डायऑक्साईड वायू व पीएम २.५ धुळीकणावर प्रक्रिया करणेसाठी फ्ल्यु गॅस डिसल्फरायझेशन व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. यासाठी ईएसपी हे हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उपयुक्त नाही. कोराडी थर्मल पॉवर स्टेशनच्या विस्तारी प्रकल्पाच्या अनुषंगाने राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने आदेश दिला आहे की, शासनास किरणात्सारीचे मानके निश्चित करावयाचे आहेत, असे विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले. त्यामुळे, या प्रकल्पास कार्बन डायऑक्साईड वायु, पारा, किरणोत्सारी या प्रदूषण घटकांवर नियंत्रण राखणेसाठी प्रभावी प्रक्रिया यंत्रणा उभारावी लागेल.

..५०/-

- प्रकल्पाच्या जवळपास वारसा (Heritage) असलेल्या वास्तु नाहीत, अशी माहिती अहवालामध्ये आहे. हे चुकीचे असून, बापू कुटी वर्धा जिल्ह्यांमध्ये आहे. ज्या वास्तू, स्मारक चुन्यापासून तयार केलेल्या असतात, त्यावर सल्फर डायऑक्साईड वायुचा प्रदूषणाचा परिणाम होवून त्यांच्या बांधकामास हानी पोहोचते.
- पाऱ्याचे नमुने कसे गोळा केले? पृथःकरण कशाप्रकारे केले? अशी विचारणा विपकृसच्या प्रतिनिधीने केली.

मे. विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने सांगितले की, कोल्डव्हेपर ॲटोमीक ॲब्सॉरपशन स्पेक्ट्रोफोटोमीटर द्वारे पाऱ्याचे पृथःकरण करण्यात आलेले आहे व पृथःकरणाबाबत थोडक्यात माहिती दिली. तसेच, फिल्टर पेपरद्वारे हवेचे नमुने गोळा केलेले असून, त्यानंतर डायझेशन केलेले आहे, असे सांगितले.

विपकृसच्या प्रतिनिधीने निदर्शनास आणून दिले की, नमुने रिकव्हर करण्याची पध्दत तसेच, नमुने गोळा करण्याची पध्दत अहवालामध्ये देण्यात आलेली नाही.

विम्ला लॅबसच्या प्रतिनिधीने सांगितले की, पीएम-१० प्रदूषण घटकांसाठी हवेचे नमुने गोळा करण्यात आले.

विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले की, पीएम-१० हवेच्या नमुन्यातील पारा हा श्वसनीय पारा होता.

- विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले की, २० जून या दिवसाचे पर्यावरणाच्या बाबत फार महत्व आहे. २० जून १९९२ रोजी ब्राझील येथे रिओ द जिनेरो येथे १५४ देशांनी एकत्र येवून कायमविकास (Sustainable Development) व पर्यावरणाबाबत चर्चा केलेली आहे. त्याचप्रमाणे, २० जून १९७२ रोजी जगातील देशांना पर्यावरण हा आंतरराष्ट्रीय विषय असल्याची जाणीव झाली. २००५ च्या एकत्रित उर्जा धोरणानुसार, देशाची प्रगती १० टक्के दराने करावयाची असल्यास, २०२० पर्यंत एकुण ७ लाख मेगावॅट उर्जा निर्माण करावयाची आहे. त्यामुळे, उर्जा प्रकल्प मोठ्या संख्येने स्थापित होत आहेत. त्यामुळे, पर्यावरणाचा ऱ्हास होणार आहे, ही खेदाची बाब आहे.
- विपकृसच्या प्रतिनिधीने लॅन्को कंपनीबद्दल इतर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, लॅन्को कंपनीवर २८००० करोड रूपयाचे कर्ज आहे व या प्रकल्पासाठी ६००० करोड रूपयाचे कर्ज घेतलेले आहे. लॅन्को कंपनी त्यांचे प्रकल्प विकत आहे, जसे जल विद्युत प्रकल्प, नॉर्वे देशातील एका कंपनीला विकलेला आहे. ही कपंनी कोणतेही प्रदूषण नियंत्रण करणार नाही. जी कंपनी प्रकल्प विकत आहे, जी कंपनी कर्जबाजारी आहे, अशा कंपनीकडून चांगले औष्णिक विद्युत प्रकल्प मिळण्याची कशी अपेक्षा करणार? असा प्रश्न उपस्थित केला. ही कंपनी मांडवा येथील औष्णिक विद्युत प्रकल्प सुध्दा विकून, येथून निघून जाईल, ही बाब लोकांनी समजून घ्यावी. देशातील इतर राज्यामध्ये व विदेशामध्ये असलेल्या प्रकल्पामुळे होणाऱ्या प्रदूषणाबद्दल माहिती दिली. त्यांनी माहिती दिली की, या कंपनीच्या आस्ट्रेलिया देशातील प्रकल्पामुळे झालेल्या प्रदूषणामुळे त्या देशातील एका कंपनीने मे.लॅन्को कपंनीविरूध्द २०० करोड रूपयाचा नुकसान भरपाईचा दावा केलेला आहे.

याबाबत, मा. अध्यक्ष तसेच सदस्यांनी विपकृसच्या प्रतिनिधीला फक्त लॅन्को कंपनीच्या मांडवा येथील प्रकल्पाबद्दलच मत मांडण्याच्या सूचना केल्या होत्या. तरीसुध्दा विपकृसच्या प्रतिनिधीने उपरोक्त माहिती दिली.

११३. श्री आशिष सिन्हा, नागपूर, जिल्हा नागपूर.

- या प्रकल्पामुळे येथील शेतकऱ्यांची उपासमारी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, या परिसरात प्रदूषणकारी प्रकल्प येणार नाही, यासाठी प्रत्येक नागरीकाने जागरूक असायला पाहिजे. या प्रकल्पास विरोध केला.

११४. श्री परमजीत सिंह, विदर्भ पर्यावरण कृती समिती (विपकृस), नागपूर, जिल्हा नागपूर.

- विद्युत प्रकल्पाचे स्थान निश्चयन दोन तत्वांवर आधारीत असते. प्रकल्पाचे स्थान कोळसा उत्पादनाचे ठिकाणाजवळ, किंवा कोळसा उत्पादनाच्या ठिकाणापासून कोळसा रोप वे द्वारे वहन करता येईल, त्या ठिकाणी असावा. दुसरी बाब म्हणजे, जिथे विजेची गरज व विज विकल्या जाणार आहे, अशा ठिकाणीच विद्युत प्रकल्पाचे स्थान निश्चयन करावे लागते. मात्र, लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. हा प्रकल्प मांडवा येथे प्रस्तापित करणेसाठी या दोन्ही तत्वांच्या पालन होत नाही. कारण, येथे कोळसा नाही, तसेच विजेची खपत सुध्दा नाही. त्यामुळे, हा प्रकल्प येथे स्थापन करण्याचे कारण असे दिसनू येते की, पाण्याची उपलब्धता, स्वस्त जमिनी व येथील गरीब शेतकरी, जो या प्रकल्पाचा विरोध करीत नाही.
- या परिसरात विजेची खपत नसल्यामुळे, ही विज विदर्भाबाहेर पाठविण्यात येईल. तेव्हा औष्णिक विज निर्मिती प्रकल्प विदर्भाबाहेर जेथे विज / उर्जा पाठविण्यात येणार आहे, त्या ठिकाणी स्थापित कां करण्यात येत नाही? याबाबत कारण दिले, पश्चिम महाराष्ट्र व पुण्यामधील आयटी सेक्टर व फार्मासिटीकल सारख्या कंपन्यांनी त्या ठिकाणी त्यांचे प्रकल्प उभारण्यासाठी अट घातलेली आहे की, त्यांच्या प्रकल्पांना स्वच्छ उर्जा पूरविण्यात यावी. त्यामुळे, विदर्भात विज निर्मिती करून तेथील कारखान्यांना उर्जा पुरवठा करण्यात येईल. मात्र, विदर्भातील नागरीकांना प्रदुषण सहन करावे लागणार. विदर्भामध्ये १३२ औष्णिक विद्युत प्रकल्प येणार असल्यामुळे, हा परिसर प्रदूषणाने प्रभावित होईल. त्यामुळे, या परिसरामध्ये प्रदूषण विरहित उद्योग स्थापित होणार नाही. त्यामुळे, देशातील इतर राज्ये तसेच महाराष्ट्र राज्यातील इतर परिसरांची प्रगती होईल.
- पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये विद्युत पारेषण वाहिनीमुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत माहिती दिलेली नाही. तसेच या प्रदूषणाचे पर्यावरण आघात मुल्यांकन केलेले नाही. फक्त ७६५ केव्हीए क्षमतेचे पारेषण टॉवर्स उभारून ते पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. च्या पारेषण वाहिनीस जोडण्यात येणार आहे. या माहितीचा उल्लेख आहे.
- विद्युत पारेषण वाहिनींच्या टॉवर्समधून इलेक्ट्रो मॅग्नेटीक लहरींचे उत्सर्जन होवून प्रदूषण होते. त्याचप्रमाणे, ७६५ केव्हीए क्षमतेच्या विद्युत पारेषण वाहिनींच्या टॉवर्समधून भ्रमनध्वनी टॉवर्सपेक्षा मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रो मॅग्नेटीक लहरींचे उत्सर्जन होते.
- ७६५ केव्हीए क्षमतेच्या विद्युत पारेषण वाहिनींच्या टॉवर्समधून होणाऱ्या प्रदुषण माहिती करून घेणेसाठी, ४०० केव्हीए विद्युत पारेषण वाहिनींच्या टॉवर्समधून होणाऱ्या प्रदूषणाबाबत माहिती दिली. याबाबत उदाहरण देतांना सांगितले, कोराडी-वर्धा विद्युत पारेषण वाहिनीची लांबी १२० कि.मी. असून ४०० केव्हीए ची क्षमता आहे. या वाहिनीच्या दोन शेवटच्या टोकामधील अंतर २६ मीटर असते. या वाहिनीच्या दोन्ही बाजूस १३-१३ मीटर अंतर अविकसीत क्षेत्र म्हणून राखावे लागते. त्यामुळे एकुण ५२ मीटर (१७१ फुट) क्षेत्र प्रभावित होते. म्हणून ७६५ केव्हीए क्षमतेच्या विद्युत पारेषण वाहिनीमुळे यापेक्षा जास्त क्षेत्र प्रभावित होईल. ४०० केव्हीए विद्युत पारेषण वाहिनीच्या टॉवर्ससाठी १७१ फुटाच्या पट्टयामध्ये या वाहिनीच्या एकुण लांबीपर्यंत वाहिनीच्या खालील प्रभावित क्षेत्रात अकृषक कार्य करता येत नाहीत. मात्र, प्रकल्प धारकाचे असे म्हणणे आहे की, शेतकऱ्यांच्या शेतामधून जाणाऱ्या पारेषण वाहिनीच्या खालच्या प्रभावित क्षेत्रामध्ये शेतकऱ्याने शेती करावी. टॉवर्सच्या ठिकाणी शेती करता येणार नसल्यामुळे, शेतकऱ्यांना शेतपिकाच्या नुकसानीनुसार आयुष्यात एकदाच नुकसान भरपाई देण्यात येईल. तसेच शेतकऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले की, शेतकरी विद्युत पारेषण वाहिनीच्या खालच्या प्रभावित क्षेत्रामध्ये त्यांचे इच्छेनुसार कृषी कार्य करू शकत नाही. उदा. शेड नेट, पॉली हाऊस, पोल्ट्री, ग्रीन हाऊस क्रिया इ. कृषी कार्य करता येवू शकत नाही. त्याचप्रमाणे, विद्युत पारेषण वाहिनी ज्या परिसरातुन टाकण्यात येते, तेथील क्षेत्र तसेच परिसरातील क्षेत्रसुध्दा प्रभावित होवून त्याचे सौंदर्यदृश्य (Aesthetic) नष्ट होते.

..५२/-

- कोराडी-वर्धा विद्युत पारेषण वाहिनीचे प्रभावित क्षेत्र १५४२ एकर आहे. या परिसरातील जमिनीचा भाव १५ लाख रूपये प्रती एकर गृहित धरल्यास एकुण २३२ करोड किमतीची जमिन प्रकल्प धारकास विज विकण्यासाठी / विज पारेषण च्या मोबदल्यात मोफत मिळते. विज विकल्याशिवाय / पारेषित केल्याशिवाय विज प्रकल्प टिकू शकत नाही. त्यामुळे, विज उत्पादन व विज पारेषित करणे / विकणे ही एक कडी (Link) आहे.
- इलेक्ट्रो मॅग्नेटीक लहरींचे उत्सर्जनामुळे विद्युत पारेषण टॉवर्सच्या ३०० मीटर अंतरापर्यंत असलेले नागरीक कॅन्सरसारख्या रोगाने प्रभावित होतात, असा अहवाल आस्ट्रेलियाच्या होबार्ड विद्यापीठाचा आहे. या प्रदूषणाबाबत प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये माहिती उपलब्ध नाही. ही या अहवालामधील त्रुटी आहे.

  प्रकल्प धारकाने माहिती दिली की, पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. ची विद्युत पारेषण वाहिनी प्रकल्पापासून साधारण १ कि.मी. अंतरावर प्रकल्प क्षेत्राच्या सिमे जवळ टाकलेली आहे. या विद्युत पारेषण वाहिनीला स्विच यार्ड मार्फत जोडणी करण्यात येईल व खुलासा केला की, विद्युत पारेषण वाहिनीची बाब त्यांच्या प्रकल्पाशी संबंधित नाही.

  ही बाब विपकृसच्या प्रतिनिधीने अमान्य केली व विद्युत पारेषण वाहिनीमुळे प्रदूषणाचा परिणाम होईल, असे सांगितले.

- विद्युत पारेषण वाहिनीच्या प्रदूषणामुळे मधमाश्यांच्या (Bee) जीवनमानावर परिणाम होतो. त्यामुळे, पोलीनेशन (Pollination) ची क्रिया प्रभावित होवून पिकांची वाढ होत नाही. त्यामुळे अन्न सुरक्षा प्रभावित होवून मनुष्याच्या जिवनावर / अस्तित्वावर सुध्दा विपरीत परिणाम होतो.
- पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा प्रकल्प धारकाने (Proponent EIA) तयार करण्याऐवजी सर्वसामान्य नागरीकांनी (Peoples EIA) तयार करावा, अशी सूचना केली.

११५. श्री श्याम पांढरीपांडे, विदर्भ पर्यावरण कृती समिती (विपकृस), नागपूर, जिल्हा नागपूर.

- ही लोकसुनावणी पर्यावरण विषयाबाबत आहे. त्यामुळे या लोकसुनावणीमध्ये पर्यावरण विषयांवर मते मांडणे आवश्यक होते. मात्र, बऱ्याच वक्त्यांनी नोकरीबद्दल मते मांडले व हा मुद्दा बारंवार मांडण्यात आला. मात्र, अध्यक्षांनी फार उशिरा या लोकांना पर्यावरणाबद्दल बोलण्याच्या सूचना केल्या.
- मांडवा, पुलई व बेलगांव या गावांतील नागरिकां व्यतिरिक्त इतर नागरिकांना व्यवस्थित मते मांडण्याची संधी देण्यात आली नाही. लोकसुनावणीच्या समितीने नागरीकांना सांगितले, फक्त त्यांचे मत नोंदविण्यासाठी ही समिती आहे व नागरीकांना प्रश्न किंवा खुलासे विचारू दिले नाही.

  सदस्यांनी खुलासा केला, जे नागरीक येथे लोकसुनावणीमध्ये सकाळपासून आलेले होते. त्या सर्वांना त्यांच्या इच्छेप्रमाणे वेळ दिलेला आहे. कोणालाही मते मांडतांना मध्यंतरीच लोकसुनावणी कक्षाबाहेर जावे, असे म्हटले नाही. नागरीकांनी जे काही प्रश्न किंवा माहिती विचारली, त्यावर प्रकल्प धारक जी काही माहिती देवू शकत होते, ती माहिती प्रकल्प धारकास सूचना करून दयायला लावली. नागरीक मते मांडत असतांना मध्यंतरीच त्यांनी लोकसुनावणी कक्षाबाहेर जावे, असे म्हटले नाही. त्याचप्रमाणे, त्यांचे मुद्दे संपले आहेत, असा आक्षेप समितीने घेतला नाही. नागरीकांचे जे मुद्दे प्रकल्पधारकाशी संबंधित होते. त्यावर प्रकल्प धारकास माहिती देण्यास सांगितले. तसेच, सदस्यांनी पुढे सांगितले की, नागरीकांनी या सुनावणीमध्ये प्रखरतेने त्यांचे मुद्दे मांडलेले आहेत.

- वक्त्याने सांगितले की, नागरीकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला विचारलेली माहिती देण्यात आलेली नाही.

यावर सदस्यांनी सांगितले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी समितीमध्ये आहेत व लोकसुनावणी संचालित करणेसाठी सहाय्य करतात. ज्या नागरीकांचे जे प्रश्न असतात, माहिती किंवा खुलास्यांची आवश्यकता असते, ती माहिती प्रकल्प धारक / प्रकल्पाच्या अर्जदाराने द्यावयाची असते.

- या लोकसुनावणीमध्ये लॅन्को कंपनीने लोकांना प्रवृत्त करून त्यांच्या समर्थनार्थ मते मांडण्यासाठी आणल्याचे दिसून आले. या सर्वांनी त्यांना नोकरी मिळाली आहे, मे.लॅन्को प्रकल्पामुळे या परिसरामध्ये भार नियमन होणार नाही, असे मत मांडले. याबाबत वक्त्याने माहिती दिली, कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर येथे यापेक्षाही मोठ्या क्षमतेचे औष्णिक विद्युत प्रकल्प असून सुध्दा, त्या परिसरात भार नियमन नाहीसे झालेले नाही. त्यामुळे, मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. या प्रकल्पामुळे परिसरात भार नियमन होणार नाही, ही चुकीची कल्पना आहे.
- विदर्भामध्ये निर्माण होणाऱ्या विजेचे तीन चतुर्थांस प्रमाण पश्चिम महाराष्ट्राला पुरविण्यात येते. पश्चिम महाराष्ट्राला विजेची गरज असल्यामुळे, विदर्भामध्ये निर्माण होणारी विज पश्चिम महाराष्ट्राला भविष्यात सुध्दा पुरविण्यात येणार आहे.
- सद्यपरिस्थितीत, ज्या प्रमाणात विदर्भाला विजेची आवश्यकता आहे, त्यापेक्षा ४ पटीने विज निर्मिती विदर्भात होत आहे. त्यापैकी, तीन चतुर्थांस विज पश्चिम महाराष्ट्राला पुरविण्यात येते. तेव्हा लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. प्रकल्प येथे विज निर्मिती करून विदर्भाला विज पुरवठा करणार आहे काय? असा प्रश्न प्रकल्प धारकास केला व पुढे सांगितले की, पश्चिम महाराष्ट्राला विज पुरवठा करण्यासाठी विदर्भामध्ये प्रकल्प स्थापित करीत आहेत व प्रकल्प धारकाचा केवळ आर्थिक फायदा हाच उद्देश आहे.
- विदर्भामध्ये विजनिर्मिती प्रकल्प स्थापित करून येथील पाणी व जमिनीचा वापूर करून विज निर्मिती करायची, मात्र, विजेचा पुरवठा विदर्भाबाहेर इतर स्थानी करायचा व या परिसरातील लोकांसाठी प्रदूषणाच्या समस्या निर्माण करायच्या, हे योग्य नाही.
- लॅन्को प्रकल्पामध्ये निर्मित झालेली विज येथे वापरण्यात येणार नसून विजेचा पुरवठा पश्चिम महाराष्ट्रामध्ये होणार आहे. या विज पारेषणाचा खर्च कोण करणार आहे? लॅन्को प्रकल्प ही विज कोणाला विकणार आहे? हे प्रश्न वक्त्यांनी उपस्थित केले.

प्रकल्प धारकाने खुलासा केला, असे कधीही सांगण्यात आले नाही की, लॅन्को कंपनीतर्फे विजेचे वितरण करण्यात येणार आहे, विदर्भाला विज पुरवठा करणार आहे किंवा गावांमध्ये विज पुरवठा करणार आहे. कारण, लॅन्को कंपनीकडे विज वितरणाचा परवाना नाही. प्रकल्प धारकाने पुन्हा सांगितले, विदर्भामध्ये विज पुरवठा करणे हा लॅन्को कंपनीचा विषय नाही. कोणतीही कंपनी विज निर्मिती केल्यावर निर्मित केलेली विज महाराष्ट्र सरकारच्या किंवा केंद्र सरकारच्या ग्रिडला जोडते. त्यानंतर, विज वितरणाची बाब राज्य शासन किंवा केंद्र सरकारच्या अखत्यारित असते. त्यानुसार, लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. तर्फे विज निर्मिती करून ग्रिडला जोडण्यात येणार आहे. तसेच, ७६० मेगावॅट विज महाराष्ट्र सरकारला विकणार आहे.

यावर वक्त्याने सांगितले की, महाराष्ट्र राज्यामध्ये, देशामध्ये विजेची कमतरता आहे व त्यामुळे लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. औष्णिक विद्युत प्रकल्प विदर्भामध्ये स्थापित करीत आहे, असे चित्र प्रकल्प धारकाने नक्कीच निर्माण केलेले आहे.

..५४/-

११६. श्रीमती सीमा शाहू, विदर्भ पर्यावरण कृती समिती, नागपूर, जिल्हा नागपूर.

- त्यांनी लेखी स्वरूपात आक्षेप सादर केलेले आहेत. त्यातील मुख्य आक्षेप त्या वाचून दाखवित आहेत. त्यांना लेखी स्वरूपात त्यांनी दिलेल्या पत्त्यावर अथवा इ-मेल द्वारे माहिती देण्यात यावी, अशी मागणी केली.
- ही लोकसुनावणी प्रकल्प स्थळापासून अंदाजे २५ कि.मी. अंतरावर घेण्यात येत असून, या लोक सुनावणीमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग अत्यल्प आहे व त्यांनी मते मांडल्याचे निदर्शनास आले नाही.
- शेतकऱ्यांना लोकसुनावणीच्या स्थळापर्यंत पोहोचण्यासाठी वाहनांची काय व्यवस्था केली?
- सन २००६ ते २०१० दरम्यान निर्गमित झालेल्या परिपत्रकानुसार लोक सुनावणी ही प्रकल्प बाधीत क्षेत्रामध्ये, जेथे शेतकरी पोहोचू शकतात, अशा ठिकाणी कां घेण्यात आली नाही? याचे लेखी उत्तर कंपनीने व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने देण्यात यावे.
- पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा सन २००९ चा आहे. मात्र, सध्या सन २०१२ सुरू आहे. या तीन वर्षामध्ये पर्यावरणामध्ये झालेल्या बदलाबाबतची माहिती या अहवालामध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे, जनतेचा सहभाग घेवून किंवा समितीमार्फत नविन सर्वेक्षण करण्यात यावे.
- बोर अभयारण्य क्षेत्राचा विस्तार झालेला आहे. या अभयारण्याचा किती विस्तार झालेला आहे? याबाबत माहिती कंपनीने व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गोळा करावी. या बिस्तारीत अभयारण्यावर सुध्दा प्रकल्पामुळे प्रदूषणाचा परिणाम होईल. जवळपास असलेले दोन आरक्षित वने रत्नापूर व तामसवाडा व संरक्षित वने याचा सक्षम अधिकाऱ्याने अधिप्रमाणित (Authenticate) केलेला संरक्षण आराखड्याची विस्तृत माहिती द्यावी. त्याचप्रमाणे, अशासकीय संस्था व वन्यजीव प्रेमीचें सहकार्य घेवून सर्व्हेक्षण करावे.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कुठलिही माहिती दुर्लक्षित करू नये व कोणत्याही मुद्यांवर नवीन अद्ययावत माहिती घ्यावी. वनांबाबत दिलेली माहिती आणखी विस्तृत स्वरूपात देण्यात यावी.
- या प्रकल्पाची जमिन पडीत असल्याचे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमुद केलेले आहे. ही जमिन जनावरांना चरण्यासाठी योग्य नाही व शेतीला अडथळा निर्माण होत नाही, असेही नमुद केले आहे, ही बाब त्यांना मान्य नाही.
- या प्रकल्पाबाबत विविध न्यायालयामध्ये खटले सुरू असल्यामुळे, प्रकल्पाची बांधकामाबाबत व प्रदूषण नियंत्रणाबाबत सद्यस्थिती काय आहे? याबाबत कंपनीचे काय धोरण आहे? याची माहिती लेखी स्वरूपात द्यावी.
- निम्न वर्धा प्रकल्पामधील पाण्याच्या उपलब्धतेबाबत कंपनीने पुन्हा अभ्यास करावा व विदर्भ सिंचन विकास महामंडळाकडुन नवीन परवानगी घ्यावी.
- पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये तापमान ३१°C नमुद केले आहे. मात्र, प्रत्यक्षात तापमान ४५° - ४६°C व कधी ४८°C पर्यंत सुध्दा पोहोचले असावे.
- यापूर्वी ज्या वक्त्यांनी त्यांना नोकरी / रोजगार प्रकल्पामध्ये मिळाला असल्यामुळे, प्रकल्पाचे समर्थन केल्याचे म्हटले आहे, त्यांचे म्हणणे कार्यवृत्तातून वगळावे. कारण ही लोकसुनावणी पर्यावरण विषयाबाबत असून, या वक्त्यांनी पर्यावरण / प्रदूषणाबाबत मते मांडलेली नाहीत.
- विपकृसच्या प्रतिनिधीने सांगितले की, त्यांचे समितीतर्फे सुध्दा सर्व्हेक्षण करून वनाबाबत स्वतंत्र अहवाल तयार करण्यात येईल. या अहवालाद्वारे वन खात्याच्या अहवालामधील लपविलेल्या बाबी नजरेस आणून देण्यात येईल.

- प्रकल्पाच्या बांधकामाच्या टप्यामध्ये थोडया कालावधीसाठी पर्यावरणावर, आरोग्यावर परिणाम होईल, असे नमुद केले आहे. तसेच, सार्वजनिक आरोग्यावर अल्प परिणाम होणार आहे, असे सुध्दा नमुद केले आहे. याबाबत लेखी स्पष्टीकरण द्यावे.

  प्रकल्प धारकाने सांगितले, प्रकल्पाचे बांधकामाचा टप्पा ३ वर्षाचा असतो व प्रकल्प सुमारे २० ते २२ वर्षे चालणार.

- वृक्ष लागवडीसाठी २९० एकर जमिन प्रस्तावित केलेली आहे. प्रकल्पातर्फे १५०० वृक्ष प्रती हेक्टरमध्ये लागवड करणार आहे. मात्र, केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या मार्गदर्शिकेनुसार २००० ते २५०० वृक्ष प्रती हेक्टरमध्ये लागवड करणे आवश्यक आहे.

  यावर, प्रकल्प धारकाने माहिती दिली की, वृक्ष लागवडीबाबत असलेले शासनाचे मार्गदर्शिकेचे व पर्यावरण परवान्यामधील अटींचे पालन करण्यात येईल.

  याबाबत, वक्त्याने मागणी केली की, ही माहिती सुध्दा लेखी स्वरूपात देण्यात यावी.

- जाहीर लोक सुनावणी आठ महिन्यानंतर कां घेण्यात आली? त्याचप्रमाणे, या कालावधीत प्रकल्पाचे बांधकाम कां करण्यात आले? याचे स्पष्टीकरण मागितले.
- या प्रकल्पाच्या परिसरामध्ये टेकडया नाहीत, असे नमुद केले आहे. मात्र, तेथे ४ टेकड्या होत्या व त्यांना नष्ट करून परिसर समांतर करण्यात आलेला आहे. याबाबत, कोणत्या विभागाची परवानगी घेण्यात आली? याचे स्पष्टीकरण मागून या परवान्याची प्रत मागितली.
- प्रकल्प धारकाने अशासकीय संघटनेचे प्रतिनिधी व इतर कार्यकर्त्यांचा पर्यावरण संरक्षणाच्या कार्यामध्ये समावेश करावा.
- प्रकल्पग्रस्त लोकांचे पुन्हा सर्व्हेक्षण करुन त्याची नोंद घेण्यात यावी.

यावेळेस, मा. अध्यक्षांनी सांगितले की, आता रात्रीचे १० वाजत आहेत. रात्री १० नंतर ध्वनीक्षेपक सुरू ठेवण्यास परवानगी नसल्यामुळे, आजची ही लोकसुनावणी येथेच थांबवून उद्या पुन्हा सुरू करण्यात येईल. यावर, लोकसुनावणी कक्षामध्ये उपस्थित असलेल्या लोकांनी जोरदार आक्षेप घेतला व ही लोकसुनावणी आजा रात्रीचे १० वाजेनंतर सुध्दा सुरू ठेवण्याची मागणी केली. लोकांनी केलेल्या मागणीनुसार मा. अध्यक्षांनी त्यांची विनंती मान्य केली व लोकसुनावणी आज रात्री १० वाजेनंतर सुध्दा सुरू राहील, अशी घोषणा केली. मात्र, आवाजाचा परिमाण कमी ठेवावा, अशा सूचना केल्या.

११७. श्री अच्छेलाल चौव्हाण, विदर्भ पर्यावरण कृती समिती (विपकृस), नागपूर, जिल्हा नागपूर.

- पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमुद केले आहे की, सामाजिक-आर्थिक पर्यावरण अहवाल बनवितांना सन २००१ च्या जनगणनेची आकडेवारी आधार म्हणुन घेण्यात आलेली आहे. मात्र, सध्या सन २०१२ सुरू आहे. त्यामुळे, सन २००१ ची आकडेवारी सन २०१२ मधील परिस्थितीला लागु करता येणार नाही. गावांतील सामाजिक-आर्थिक परिस्थिती प्रत्येक वर्षामध्ये बदलत असते. त्यामुळे, परिसरातील गावांमधील सामजिक-आर्थिक परिस्थिती बदललेली नाही काय? असा प्रश्न उपस्थित केला. तसेच, कंपनीने गावाच्या विकासासाठी ज्या योजना तयार केल्या आहेत त्या सन २००१ च्या आकडेवारीनुसार तयार केल्या असाव्यात. मात्र, सन २००१ च्या जनगणनेनुसार प्रभावित क्षेत्रातील गावांतील लोकसंख्या अंदाजे १ लाख होती. मात्र, ही लोकसंख्या १०-१२ वर्षानंतर दुप्पट झाली नसावी काय? त्यामुळे, गावाच्या विकासाच्या योजना या सन २००१ च्या आकडेवारीनुसार १ लाख लोकसंख्येच्या आधारावर तयार केल्या आहेत किंवा सन २०१२ ची आकडेवारी यांचेकडे उपलब्ध आहे काय? त्या आधारावर योजना तयार केल्या आहेत काय? याबाबत, स्पष्टीकरण मागितले.

यावर, प्रकल्प धारकाने माहिती दिली, भारत सरकार तर्फे जनगणना प्रत्येक १० वर्षांनी करण्यात येते व प्रकल्प धारकाला अहवालामध्ये अधिप्रमाणित (Authenticate) अहवालाचा समावेश करावा लागतो. मात्र, १० वर्षामध्ये नक्कीच परिस्थिती बदलते, हे प्रकल्प धारकाने मान्य करून सांगितले की, गावांतील योजना राबवितांना तेथील सामाजिक-आर्थिक सद्यस्थिती माहिती असणेसाठी गावकऱ्यांशी व ग्रामपंचायतीशी संपर्क ठेवण्यात येतो. मात्र, अधिप्रमाणित (Authenticate) केलेल्या २००१ च्या जनगणनेचीच आकडेवारी वापरण्यात येत आहे. सन २०११ च्या जनगणनेचा अहवाल अद्याप जाहिर झालेला नाही.

- सन २००१ च्या जनगणनेनुसार प्रभावित क्षेत्रातील गावांचा सामाजिक-आर्थिक सर्व्हेक्षण करण्यात आले काय? असा प्रश्न विपकृसच्या प्रतिनिधीने उपस्थित केला.

  यावर प्रकल्प धारकाने सांगितले की, सर्व्हेक्षण केले आहे. मात्र, शासकीय संस्थेला माहिती देतांना सन २००१ च्या जनगणनेनुसार अधिप्रमाणित (Authenticate) केलेली माहितीच द्यावी लागते.

- सामाजिक-आर्थिक परिस्थितीचे आकडे कालावधीनुसार बदलत असल्यामुळे, त्यानुसार प्रकल्प धारकाने गावाच्या विकासासाठी असलेल्या योजनांमध्ये सुधारणा केलेल्या आहेत काय? असा प्रश्न केला.

  प्रकल्प धारकाच्या प्रतीनिधीने सांगितले की, शासकीय प्रमाणित आकडेवारीच द्यावी लागते. मात्र, योजनांमध्ये सुधारणा करणे आवश्यक असते, हे मान्य केले.

- सामाजिक-आर्थिक सर्व्हेक्षण प्रकल्प धारकाने स्वत: केले काय? किंवा अशासकीय संघटना सोबत सर्व्हेक्षण केले काय? गावकऱ्यांना सर्व्हेक्षणामध्ये सामिल केले काय? असे प्रश्न केले. तसेच, याबद्दल असलेल्या पुराव्याची माहिती मागितली. सामाजिक-आर्थिक सर्व्हेक्षण कोणत्या प्रकारे केले, याची माहिती अहवालामध्ये उपलब्ध नाही, असा आरोप केला. त्याचप्रमाणे, सामाजिक-आर्थिक सर्व्हेक्षण करणेसाठी विशेष सुशिक्षित लोकांची आवश्यकता असते, असे सांगुन प्रकल्प धारकाने गावांतील मुलांकडुन सामाजिक-आर्थिक सर्व्हेक्षण कसे काय केले? असा प्रश्न उपस्थित केला.

  प्रकल्प धारकाने सांगितले की, केंद्र शासनाच्या सन २००१ या जनगणनेनुसार असलेली आकडेवारी व माहिती अहवालामध्ये दिलेली आहे.

- विपकृसच्या प्रतीनिधीने आक्षेप घेतला की, प्रकल्पधारक सन २००१ च्या जनगणनेच्या अहवालानुसार कार्य करीत आहे. मात्र, सध्या सन २०१२ चालु आहे. त्यामुळे, सन २००१ च्या जनगणनेमधील आकडेवारी व माहिती सन २०१२ च्या परिस्थितीला लागू होत नाही व त्यामुळे प्रकल्प धारकाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल अपूर्ण आहे.

११८. श्री मनोज लक्ष्मणराव मानवटकर, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- ही लोक सुनावणी सकाळी ११.०० वाजता वेळेनुसार सुरू व्हायला पाहिजे होती. मात्र, साधारणपणे १ तास उशिरा म्हणजे दुपारी १२.०० वाजता का सुरु करण्यात आली? याचे स्पष्टीकरण मागितले व सांगितले की, यामुळे नियमाचे उल्लंघन झालेले आहे.

मा.अध्यक्षांनी स्पष्टीकरण दिले, सकाळी ११.०० वाजेपुर्वीच ते स्वत: लोकसुनावणी स्थळी उपस्थित होते. मात्र, लोकांची उपस्थिती नसल्यामुळे लोकसुनावणी उशिरा सुरू करण्यात आली. यावर श्री.सुधीर पालीवाल यांनी म्हटले, केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार लोकसुनावणीमध्ये लोक उपस्थित असो किंवा नसो, तरी सुध्दा लोकसुनावणी वेळेवर सुरू करावी लागते व सांगितले की, लोक सकाळी ११.०० वाजेपुर्वीच उपस्थित झाले होते.

- पुलई ग्रामपंचायतने कंपनीला पुर्वी दिलेले नाहरकत प्रमाणपत्र रद्द केलेले आहे. त्यामुळे, कंपनीने पुलई ग्रामपंचायतचे नवीन नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त केले काय? असा प्रश्न महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास केला.

सदस्यांनी वक्त्यास सूचना केल्या, मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. या प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक बाबींवर त्यांना आक्षेप नोंदवायचे आहेत व त्यास प्रकल्पधारकाकडून उत्तरे व माहिती देण्यात येईल. तसेच सांगितले की, वक्त्याच्या आक्षेपाची नोंद घेवून प्रकल्पधारकास माहिती देण्यास सांगण्यात येईल.

मात्र, वक्त्याने पुन्हा सांगितले, पुलई ग्रामपंचायतने प्रकल्पाला दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्राच्या आधारावर मागिल वर्षी लोकसुनावणी घेण्यात आली होती. मात्र, प्रकल्पाने ग्रामपंचायत पुलईकडुन नवीन नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त केलेले नसून सुध्दा पुर्न लोकसुनावणी घेण्यात येत आहे.

यावर, सदस्यांनी खुलासा केला, लोकसुनावणीसाठी ग्रामपंचायतच्या नाहरकत प्रमाणपत्राची गरज नाही. प्रकल्पाच्या प्रस्तावावर केंद्र शासनातर्फे प्रकल्पाला TOR देण्यात येतो. त्यानंतर प्रकल्पातर्फे लोकसुनावणीसाठी अर्ज करण्यात येतो. त्या आधारावर लोकसुनावणी घेण्यात येते.

- ते शेतकरी असून त्यांची उपजिविका शेतीवर आधारीत आहे. त्यांचे कुटुंब शेतीवर अवलंबून आहे. त्यांच्या क्षेत्रातील मृदा काळी असून ती कपास व सोयाबीन पिकासाठी चांगली आहे. कोळसा धुतल्यानंतर निघणाऱ्या द्रवरूप टाकावू पदार्थामध्ये विषारी पदार्थ जसे, जड धातु आर्सेनिक, कॅॅडमियम, क्रोमीयम, लेड, ॲन्टीमनी, मर्क्युरी इ. असतात. त्यामुळे जमिन व पाण्याचे प्रदूषण होईल. तसेच, मानवी जिवनावर परिणाम होईल व योग्य पिक होणार नाही. त्यांचे शेतकरी म्हणून अस्तित्व समाप्त होईल व उदरनिर्वाहासाठी मुंबई सारख्या शहरामध्ये स्थालांतरीत व्हावे लागेल.
- त्यांचे क्षेत्रातील शेतकरी मागील १० वर्षापासून दुष्काळामुळे होणाऱ्या नापिकीमुळे आत्महत्या करीत आहे. त्याचप्रमाणे, या क्षेत्रात अगोदरच पाण्याची कमतरता आहे. प्रकल्प सुध्दा विज निर्मितीसाठी या पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर करणार आहे. प्रकल्पाच्या सांडपाण्यामुळे पाण्याचे प्रदूषण होणार आहे. पाण्याच्या तापमानामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होणार आहे. पाण्याचा वापर प्रकल्पाच्या कुलिंग टॉवरमध्ये होणार आहे. या कुलिंग टॉवरमधून उच्च तापमान असलेले पाणी वातावरणामध्ये पुन्हा सोडण्यात येते. त्यामुळे, जिवजंतुवर परिणाम होतो व ऑक्सीजनच्या प्रमाणामध्ये घट होते. तसेच पाण्यामधील तापमानामध्ये वाढ झाल्यामुळे मास्यांचे व इतर जिवजंतुचे अस्तित्व नष्ट होते.
- औष्णिक विज प्रकल्पामधून निघणाऱ्या सल्फर डायऑक्साईडची वातावरणामध्ये पाण्याशी क्रिया होवून सल्फ्युरिक आम्ल निर्माण होते. लॅन्को प्रकल्पामुळे सुध्दा सल्फ्युरिक आम्ल निर्माण होईल. त्यामुळे, नदीतील पाण्याचे प्रदूषण होवून मासे नष्ट होतील. मास्यांचा वापर मनुष्य व त्यांच्यासारखे शेतकरी आहार म्हणून करतात. नदीतील होणाऱ्या प्रदूषणामुळे पिण्याच्या पाण्याचे व शेतीच्या ओलितासाठी लागणाऱ्या पाण्याचे प्रदूषण होईल. या बाबींवर नियंत्रण करणेसाठी केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाने दि.२४/०२/२०११ रोजी मे.लॅन्को विदर्भ पॉवर लि. ला दिलेल्या पर्यावरण विषयक परवान्यातील अटीनुसार, पर्यावरण संरक्षणासाठी असलेल्या योजनांचा समावेश केलेला नाही.

- अमेरिकेतील न्युयार्क टाईम्स या वृत्तपत्रामध्ये एक अहवाल प्रसिध्द झाला होता. त्यानुसार, अमेरिकेतील दहा राज्यामधील २१ विद्युत प्रकल्पाजवळ जे लोक राहतात, त्यांना कर्करोगाच्या धोक्यांना तोंड द्यावे लागत आहे. जे तेथील फेडरल आरोग्याच्या मापदंडापेक्षा २००० पटीने जास्त आहे. केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाने दि. २४/०२/२०११ रोजी मे.लॅन्को विदर्भ पॉवर लि. यांना दिलेल्या पर्यावरण विषयक परवान्यामध्ये पर्यावरण संरक्षणसाठी निर्देश दिलेले आहेत. मात्र, प्रकल्प धारकाने कर्करोगाच्या धोक्याबाबत काहीही भाष्य केलेले नाही.

वक्त्याने सांगितले की, एका ५०० मेगावॅट प्रकल्पामधून खालीलप्रमाणे वर्षाला वायुचे उत्सर्जन होते व त्यामुळे वायु प्रदूषण होते.

- १.७ दशलक्ष टन कार्बन डायऑक्साईड वायुचे उत्सर्जन होते, जे १० दशलक्ष झाडांनी सोडलेल्या कार्बन डायऑक्साईड वायुच्या बरोबर समतुल्य आहे. कार्बन डायऑक्साईड वायुचे प्रदूषण ग्लोबल वार्मींगसाठी कारणीभुत आहे.
- १०००० टन सल्फर डायऑक्साईड वायुचे उत्सर्जन होते, ज्यामुळे आम्ल वर्षा होते. त्याचप्रमाणे, सल्फर डायऑक्साईड चे कण फार मोठ्या प्रमाणात हवेमध्ये पसरून फुफ्फुसावर विपरीत परिणाम होतो. तसेच, हृदयाचे व इतर रोग होतात.
- १०२०० टन नायट्रोजन डायऑक्साईड वायुचे उत्सर्जन होते, जे ५० दशलक्ष वाहनांमधून उत्सर्जन होणाऱ्या नायट्रोजन डायऑक्साईड वायुच्या बरोबर समतुल्य आहे. नायट्रोजन डायऑक्साईड वायूमुळे धुके निर्माण होऊन फुफ्फुसाचे आजार होतात व फुफ्फुसाचे सुध्दा प्रतिरोपण (Transplant) करावे लागते. त्याचप्रमाणे, श्वसनाचे कायमस्वरूपी आजार होतात.
- आम्ल वर्षामुळे दम्याचे, हृदयाचे, निमोनियाचे, रक्तपेशी इ. आजार होतात.
- ५०० टन धुळीकण हवेत पसरून फुफ्फुसावर सुज येवून फुफ्फुसाचे कार्य मंदावते व अकाली मृत्यु होतो.
- २२० टन हायड्रोकार्बन वायुचे उत्सर्जित होतो, ज्यामुळे धुर निर्माण करण्यास मदत होते.
- ७०२ टन कार्बन मोनो ऑक्साईड वायुचे उत्सर्जित होतो. ज्यामुळे, डोकेदुखी, ताप, हृदयविकाराचे आजार होतात.
- १.७ पौंड क्रोमीयम निर्माण होते. हे क्रोमीयम २५ एकर क्षेत्रामध्ये जमा झाल्यास, तेथील मासे आहार योग्य राहत नाही. पाऱ्यामुळे मेंदू व मज्ज्यातंतुचे आजार होतात.
- २२५ पौंड आर्सेनिक चे निर्माण होते. आर्सेनिकयुक्त पाणी पिल्यास लोकांना कर्करोग होतो.
- ११४ टन कॅडमियम व विषारी वायू निर्माण होतात. विषारी वायु मनुष्यांच्या व प्राण्यांच्या पेशीमध्ये जमा होतात, ज्यामुळे, आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत. जसे, बौध्दिक व शरीराचा वाढ खुंटने, मज्जातंतूवर परिणाम होणे इ.
- केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाने प्रकल्पास दि. २४/०२/२०११ रोजी प्रदान केलेल्या पर्यावरण विषयक परवान्यामधील मुद्दा क्र. १० नुसार स्थानिक लोकांना कंपनीत आवश्यक असलेल्या कामाचे प्रशिक्षण देवून रोजगार द्यावा. अशी अट आहे. मात्र, असे प्रशिक्षण केव्हा देणार? कायमस्वरूपी रोजगार केव्हा देणार? याचे उत्तर त्यांनी मागितले.
- प्रकल्पासाठी शेतीयोग्य जमिनी घेण्यात आलेली आहे. ज्यामुळे, शेतकरी भूमीहीन झालेला आहे. मात्र, दि. २४/०२/२०११ रोजी केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाने प्रकल्पास प्रदान केलेल्या पर्यावरण विषयक परवान्यानुसार प्रकल्प धारकाने भुमिहीन शेतकऱ्यांसाठी कोणतीही योजना तयार केलेली नाही.

- लॅन्को कंपनीमध्ये स्थानिक लोकांना प्रशिक्षण देवून नोकरी देणेविषयी काय योजना आहे? शैक्षणिक पात्रता असून सुध्दा फक्त तात्पुरत्या स्वरूपाच्या नोकऱ्या दिलेल्या आहेत. कोणालाही कायमस्वरूपी नोकरी दिलेली नाही.
- दि. २४/०२/२०११ च्या पर्यावरण विषयक परवान्यामध्ये प्रकल्पासाठी लागणारा कोळसा रेल्वेद्वारे आणण्यात यावा, असा उल्लेख केला आहे. मात्र, कोळसा प्रकल्प स्थळी रेल्वेद्वारे किंवा ट्रकद्वारे आणणार आहे, याबाबत अजुनही स्पष्ट केले नाही.
- असे सादरीकरण केले आहे की, विदर्भ हा देशातील एक अतिउष्ण प्रदेश आहे. प्रस्तावित औष्णिक विद्युत प्रकल्पामुळे कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन होईल व प्रदेशात ग्रिन हाऊस वायुंचा प्रभाव वाढेल.
- येथील प्रदेशात येणाऱ्या सुर्यकिरणांमुळे भुपृष्ठ तापेल. या प्रकल्पामुळे, अगोदरच वाढीव तापमानात आणखी भर पडून तापमानात आणखी वाढ होईल, हे नमुद करणे आवश्यक आहे. अशा वाढत्या तापमानामुळे भविष्यात ग्रिन हाऊस वायुंचा प्रभाव वाढेल व शेतीयोग्य जमिनीवर व पावसावर परिणाम होईल.
- पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमुद केलेली संपूर्ण माहिती विपकृसच्या प्रतीनिधींनी सांगितल्याप्रमाणे खोटी आहे. प्रकल्पधारकास कोणतीही माहिती व प्रश्नांची उत्तरे देता आली नाहीत. प्रकल्पाचा हा अहवाल खोटा आहे.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. तर्फे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल फक्त मांडवा, पुलई व बेलगांव याच गावांमध्ये अभ्यासनासाठी ठेवण्यात आलेला होता. परंतु इतर साधारण ७० गावांमध्ये हा अहवाल ठेवण्यात आलेला नाही, असा आक्षेप घेतला.

११९. श्री बाळकृष्ण मारोतराव कराळे, मांडवा, ता.व जिल्हा. वर्धा.

- मांडवा येथील मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. च्या प्रदूषणामुळे येथील १५ ते २० कि.मी. परिसरातील लोकांचे अस्तित्व हळूवारपणे संपविण्याचा प्रयत्न आहे.
- सर्व औष्णिक विद्युत प्रकल्प विदर्भातच का स्थापन्यात होत आहे? पश्चिम महाराष्ट्रात का स्थापन्यात येत नाहीत? असा प्रश्न उपस्थित केला.
- सर्व लोकप्रतीनिधी, राज्य शासन, केंद्र शासनास विदर्भामध्ये औष्णिक विद्युत प्रकल्प स्थापन्याची आवश्यकता नाही, असे माहित असून सुध्दा येथे औष्णिक विद्युत प्रकल्प स्थापन होत आहेत.
- मागील वर्षी प्रथम लोक सुनावणीच्या वेळेस लोकांचा असा गैरसमज होता की, ज्या लोकांच्या शेतजमिनी प्रकल्पामध्ये जाणार आहेत, त्यांच्या शेतजमिनीला चांगली किंमत मिळेल. परंतु लोकांना माहित नव्हते की, या प्रकल्पामुळे प्रदूषणाचे काय दुष्परिणाम होतील. शेतकऱ्यांना कल्पना नव्हती की, १५ ते २० कि.मी. परिसरामधील भुगर्भातील पाण्याची पातळी कमी होवून, पिण्यासाठी पाणी उपलब्ध राहणार नाही, १० ते १५ कि.मी. परिसरातील शेती नापीक होईल, ही सुध्दा कल्पना नव्हती.
- लॅन्को प्रकल्पापासून त्यांची शेती साधारण २ कि.मी. अंतरावर आहे. लॅन्को प्रकल्पातील रात्री प्रकल्पाचे काम सुरू राहणासाठी साधारण १०० ते १५० फुट उंचीवर उच्च दाबाचे विज दिवे उभारलेले आहे. या दिव्यांच्या प्रकाशामुळे त्यांच्या शेत पिकांचे नुकसान होत आहे. या विज दिव्यांची उंची कमी केल्यास, त्यांच्या शेतावर दिव्यांचा प्रकाश पडणार नाही. दिव्याच्या प्रकाशामुळे शेतपिकाचे उत्पादन होत नाही, फलधारणा होत नाही. शेतपिकाच्या उत्पादनाची क्रिया घडण्यासाठी दिवसा सुर्यप्रकाश व रात्री काळोख्याची गरज असते. याबाबत कंपनी व्यवस्थापनाला निवेदन दिल की, दिव्यांच्या प्रकाशामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे उत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी विनंती केली होती.

यावर, प्रकल्प धारकाने या विषयाबाबत, त्यांनी पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला व राहुरी कृषी यांचे कडून उत्तर मागविले, अस सांगितले. कृषी विद्यापीठांनी दिलेल्या उत्तरामध्ये विज दिव्याच्या प्रकाशामुळे पिकांवर होणाऱ्या परिणामाबाबत अभ्यास / संशोधन केलेले नाही, असे कळविले. प्रकल्प धारकाकडून काही शेतकऱ्यांना काही प्रमाणात नुकसान भरपाई देण्यात आली. त्याचप्रमाणे, काही शेतकऱ्यांच्या शेतजमिनीमध्ये पाणी साचत असल्यामुळे शेती करता येत नाही.

- या पुर्वीच्या वक्त्यांनी त्यांना नोकरी मिळालेली आहे, म्हणून विद्युत प्रकल्पाला समर्थन केले. मात्र, कंपनीने दिलेली नोकरी केव्हापर्यंत टिकणार आहे? याची माहिती प्रकल्पधारकाने द्यावी. त्यांच्या मते वर्धा जिल्ह्यात १३२० मेगावॅट प्रकल्पाचे टर्बाईन चालविणारे, बॉयलर अभियंता व सुपरवायजर उपलब्ध नाहीत. त्यामुळे, स्थानिक लोकांना कोणत्या प्रकारचा रोजगार मिळणार आहे? असा प्रश्न केला. सादरीकरणामध्ये दाखविण्यात आले आहे की, या प्रकल्पामध्ये ६०० कर्मचारी / कामगार कार्य करणार आहे. मात्र, या प्रकल्पामध्ये चीन देशातील तंत्रज्ञान असल्यामुळे कमी मनुष्यबळ लागेल. प्रकल्प उभारल्यानंतर चालविण्यासाठी इतर भागातुन कामगार आणले जातील.
- प्रकल्प सुरू झाल्यावर शेतकऱ्यांना या प्रकल्पाचे दुष्परिणाम जाणवतील. त्यावेळेस, प्रकल्पधारकाकडे प्रदूषणाबाबत तक्रारी केल्यास प्रतिसाद मिळणार नाही. आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतीच्या नापिकीमुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागणार आहे. त्यामुळे, कंपनी व्यवस्थापनाने प्रभावित होणाऱ्या शेतकऱ्यांना प्रत्येकवर्षी नुकसान भरपाई देवू, असे न्यायालयामार्फत प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे.
- बेलगांव-मांडवा रोडची क्षमता ६ टन वजनाच्या वाहनाची आहे. मात्र, या रस्त्यावरून २० टन वजनाचे व त्यापेक्षा जड वाहनाच्या वाहतुकीमुळे रस्त्यावर खड्डे झाले आहेत. त्यामुळे, वाहतुकी दरम्यान हवा प्रदूषणामुळे श्वसनाचा त्रास होतो.
- गावातील बेरोजगार मुलांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ६ महिन्यांचे प्रशिक्षण देवून नोकरी देण्यात येईल, असे प्रकल्पधारकातर्फे सांगण्यात आले. मात्र, हा प्रशिक्षण कालावधी २ वर्षाचा असून सुध्दा फक्त सहा महिन्याचे प्रशिक्षण दिले. त्यामुळे, त्या मुलांना विषयाचे संपूर्ण ज्ञान प्राप्त झाले नाही. त्यांना वेल्डींग इ. कार्याचा पुर्वी अनुभव नसल्यामुळे, प्रकल्पामध्ये मुलांनी नोकरी पत्करली नाही, असे वक्त्याने सांगितले. त्यांना फक्त २०००/- रूपये भत्ता प्रती महिना देण्यात आला होता. याबाबत सुध्दा कंपनीने योग्य कार्यवाही करावी, अशा सूचना केल्या.
- मे महिन्यामध्ये या परिसरातील तापमान ४६°C ते ४६.५°C पर्यंत असते. या प्रकल्पामुळे त्यामधे १°C ते २°C ने वाढ होणार असून ४८°C तापमानामध्ये पक्षी सुध्दा जिवंत राहू शकत नाही, हे सर्वांना माहित आहे व मनुष्यावर सुध्दा या तापमानाचा परिणाम होईल.
- हरीत पट्टा हा प्रकल्पापासून १० कि.मी. परिसरामध्ये किंवा कमीतकमी ४ ते ५ कि.मी. परिसरामध्ये विकसीत करण्यात यावा, जेणे करुन हवा व ध्वनी प्रदूषण होणार नाही व तापमानामध्ये वाढ होणार नाही.

१२०. श्री गणेश गायकी, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- लॅन्को कंपनीने या परिसरामध्ये खरेदी केलेल्या ५०० ते ६०० एकर जमिनीवरील किती झाडे तोडली? किती झाडे तोडायची परवानगी घेतली? प्रदूषण नियंत्रणाची ही हानी भरून काढणेसाठी किती नवीन झाडे लावायची होती? याबाबत स्पष्टीकरण प्रकल्प धारकास विचारले.

प्रकल्प धारकाच्या प्रतीनिधीने माहिती दिली, खरेदी केलेल्या जमिनीमध्ये पराटी व सोयाबीनचे पिक होते. बाष्पकेक्षेत्रात असलेल्या १०० ते १५० झाडे शासनाची परवानगी घेवून तोडण्यात आले. जिथे झाडे तोडण्याची आवश्यकता नव्हती, तिथे झाडे तोडलेली नाहीत. ही झाडे किती होती व कोणत्या प्रजातीची होती, याबाबत त्यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे व ती वक्त्यास देता येईल, असे प्रकल्पाच्या प्रतीनिधीने सांगितले.

यावर, वक्त्याने आक्षेप घेतला, त्यांच्या माहितीप्रमाणे प्रकल्प धारकाने ५०० ते ७०० एकर जमिनीमध्ये जवळ-जवळ ८० ते ९० हजार झाडे तोडली. मात्र, वन खात्याकडून, २१ झाडे तोडण्याची व महसुल खात्याकडून, ३९ झाडे तोडण्याची, असे एकुण ६० झाडे तोडण्याची परवानगी प्रकल्प धारकाने घेतली. प्रकल्प परिसरात १ लाख ७५ हजार झाडे लावणार आहेत, असा दावा प्रकल्प धारक करीत असला तरी, सध्या फक्त लहान रोपटे लावलेले आहेत व त्यांच्या माहितीप्रमाणे त्यापैकी ९० टक्के रोपटे नष्ट झालेले आहेत. असे वक्त्याने सांगितले.

यावर, प्रकल्प धारकाने खुलासा केला की, प्रकल्पाने केलेल्या वृक्ष लागवडींची पाहणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व लोकसुनावणीचे अध्यक्ष करू शकतात.

यावर, अध्यक्षांनी वक्त्यास सांगितले, ते स्वतः प्रकल्पातील वृक्ष लागवड तपासू शकतात.

- प्रकल्पासाठी जी शेतजमिन दलाला मार्फत खरेदी केली, त्या शेतजमिनीची माहिती द्यावी. प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमुद केले आहे की, प्रस्तावित प्रकल्पासाठी लागणारी ११९५ एकर जमीन प्रामुख्याने ओसाड आहे. या जमिनीबाबत तहसिलदार, वर्धा यांनी लॅन्को कंपनीला कळविले होते की, ९३ टक्के जमीन एकेरी पीकाची आहे व उर्वरीत ७ टक्के दुबार पिकाची आहे. या विषयाबाबत वक्त्याने आक्षेप घेतला की, त्यांनी तहसिलदार कार्यालयाकडून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त केलेल्या माहितीनुसार, ५३ टक्के जमिन सिंचनाची असून, दुबार पिकाची आहे. प्रशासनाने (तहसिलदार) लॅन्को कंपनीस खोटा अहवाल पाठविला, ज्यामुळे लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. प्रकल्पाला केंद्र शासनामार्फत पर्यावरण विषयक परवाना मिळाला.
- प्रकल्पासाठी खरेदी केलेल्या जमिनीच्या प्रकाराबाबत विवरण प्रकल्प धारकाने व उपविभागीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट करावे, अशी मागणी केली. याबाबत वक्त्याने पुढे सांगितले, या जमिनीचे ७/१२ चे अहवाल तहसिल कार्यालय, उपविभागीय कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध आहेत. या जमिनीच्या ७/१२ च्या अहवालामध्ये, विहिरी, बोरवेल, रबी पिके, खरीप पिके असल्याचा उल्लेख स्पष्टपणे केलेला आहे. तरीसुध्दा जमिनीच्या वापराबाबत चुकीचा अहवाल कां पाठविण्यात आला? हा मुद्दा कंपनीने तसेच मा. अध्यक्षांनी स्पष्ट करावा, अशी मागणी केली.

अध्यक्षांनी सांगितले, त्यांच्या कार्यालयाकडे या विषयाबाबत तक्रार प्राप्त झाली आहे व चौकशी सुरू आहे. चौकशी पुर्ण झाल्यावर माहिती देण्यात येईल.

प्रकल्प धारकाने माहिती दिली की, ११९५ एकर जमिनीमध्ये मुख्यतः कोरडवाहू जमिन आहे.

- लॅन्को कंपनीने मांडवा, पुलई व बेलगांव ग्रामपंचायत कार्यालयाला कोणतेही कागदपत्रे दिले नसतांना सुध्दा दि.२५/७/२०१० रोजी ग्राम पंचायतने लॅन्को कंपनीस प्रकल्पाचे बांधकाम करण्याकरीता नाहरकत प्रमाणपत्रे दिले, ही बाब योग्य आहे काय? असा प्रश्न उपस्थित केला व माहिती दिली की, ज्यावेळेस या तिन्ही ग्रामपंचायतीने प्रकल्पांना नाहरकत प्रमाणपत्र दिले, तेव्हा तिन्ही ग्रामपंचायतीच्या नावावर एक एकर सुध्दा जमिन नव्हती.

प्रकल्प धारकाने खुलासा केला की, तिन्ही ग्रामपंचायतींनां आवश्यक कागदपत्रे देण्यात आली होती. ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी प्रथम गावनकाशावर प्रकल्पाचे प्रस्तावित भुखंड सर्व्हे क्रमाकांनुसार दाखविण्यात येते व नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यात येते. मात्र, प्रकल्प उभारण्यासाठी नक्कीच प्रकल्प धारकास जमिन विकत घेणे आवश्यक आहे.

ही बाब वक्त्याने अमान्य करून ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यापुर्वीच जमिनीचा ७/१२ अहवाल प्रकल्प धारकाच्या नावावर असणे, आवश्यक आहे, असे सांगितले.

- प्रकल्पाला लोकसुनावणीच्या पुर्वीच विविध विभागांनी सर्व परवानग्या दिलेल्या आहेत. त्यामुळे, लोकसुनावणी ही फक्त औपचारीकताच आहे. असे वक्त्याने म्हटले.

सदस्यांनी खुलासा केला की, लोकसुनावणी पुर्वी प्रकल्प उभारण्याचे संमतीपत्र (Consent to Establish) देता येते व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे संमतीपत्र देत असते. मात्र, प्रकल्पाने पर्यावरण विषयक परवाना प्राप्त केल्याशिवाय प्रकल्प सुरू करण्याचे संमतीपत्र (Consent to Operate) देण्यात येत नाही.

- सद्या १०-२० टँकर पाणी आंजी गावा जवळील धाम नदीवरुन कंपनीच्या बांधकामा करीता वापरण्यात येत आहे. कंपनीने यासाठी संबंधीत ग्रामपंचायतीची परवानगी घेतली आहे काय? असा प्रश्न वक्त्याने केला.

प्रकल्प धारकाने माहिती दिली, त्यांच्याकडे विदर्भ सिंचन विकास महामंडळाची परवानगी आहे व या पाण्याचा मालकी हक्क या महामंडळाकडेच आहे.

वक्त्याने अध्यक्ष महोदयांना प्रश्न केला, आंजी गावाजवळी धाम नदीवरून प्रकल्पाद्वारे पाणी वापरण्यासाठी ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता आहे किंवा नाही?

अध्यक्षांनी प्रकल्प धारकाला विचारले, विदर्भ सिंचन विकास महामंडळाने परवानगी देतांना ग्रामपंचायतची सुध्दा परवानगी घेणे आवश्यक आहे, अशी अट घातली होती काय? किंवा ग्रामपंचायतीने आपल्याकडे याबाबत आक्षेप घेतला आहे काय?

प्रकल्प धारकाने माहिती दिली की, याबाबत ग्रामपंचायतीने आक्षेप घेतला नाही. तसेच विदर्भ सिंचन विकास महामंडळाने सुध्दा अशी अट नमुद केलेली नाही. यानंतर, अध्यक्षाने सांगितले, प्रकल्प धारकाने विदर्भ सिंचन विकास महामंडळाची परवानगी घेतलेली आहे व अद्यापपर्यंत कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

- औद्योगिक संचालयाने जमिनीची खरेदी करण्यासाठी लॅन्को विदर्भ थर्मल पॉवरला परवानगी दिली होती. मात्र, जमिन खरेदी दलालामार्फत कमी किंमतीमध्ये केलेली आहे. त्यामुळे, ही परवानगी दलालांना दिली होती किंवा लॅन्को कंपनीला दिली होती? असा प्रश्न उपस्थित केला.

प्रकल्प धारकाने सांगितले, प्रत्येकाशी रितसर पध्दतीने विक्री करार केलेला आहे व दोन्ही पक्षाच्या संमतीने जमिनीची खरेदी केलेली आहे.

वक्त्याने आक्षेप घेतला की, जमिनीची खरेदी वेगवेगळ्या भावामध्ये करण्यात आलेली आहे. त्यामुळे, ही रितसर पध्दत नाही व प्रशासनाने याबाबत शेतकऱ्यांना जागृत करणे आवश्यक होते, असे मत व्यक्त केले.

१२१. श्रीमती विभा गुप्ता,

- लोकसुनावणीमध्ये वेळेचे नियोजन योग्यप्रकारे झालेले नाही.
- प्रकल्पासाठी संपादित केलेली जमीन ओसाड आहे, असा उल्लेख केलेला आहे. मात्र, या जमिनीपैकी अंदाजे ६० टक्के जमिन सुपिक जमीन आहे. त्यामुळे, या जमिनीची सुपिकताचे पृथःकरण व जमिनीचे सर्व्हेक्षण योग्यप्रकारे करणे आवश्यक आहे.
- प्रकल्पाने परिसरातील ज्या तीन-चार टेकड्या नष्ट केल्या आहेत, तेथील पर्यावरणीय अभ्यास केलेले नाही. या टेकड्या नष्ट केल्यामुळे, किती झाडे नष्ट झाली आहेत, किती वनस्पती नष्ट झाली आहे? किती वन्यजीव स्थानांतरीत झाले? किती पाणी नष्ट झाले? त्या टेकड्यांमध्ये किती प्रमाणात मुरूम, दगड व माती होती, याबाबत पर्यावरणीय अभ्यास झालेला नाही? त्यामुळे हा अभ्यास करून अहवाल सादर करणे आवश्यक आहे.
- सद्यपरिस्थितीत प्रकल्पासाठी होणाऱ्या वाहतुकीमुळे रस्ते नादुरूस्त होत आहेत.
- प्रकल्प सुरू झाल्यावर कोळसा वाहतुक व साठवणीमुळे होणाऱ्या प्रदूषणाच्या परिणामांची माहिती मुल्यांकन अहवालामध्ये सादर केलेला नाही.
- सदर प्रकल्प जलाशयामधून अंदाजे ४.० लाख लिटर प्रती तास पाणी वापरणार आहे. जलाशयातील पाणी प्रथम पिण्यासाठी व सिंचनासाठी वापरण्यासाठी असते व उर्वरीत पाणी प्रकल्पांना वापरण्यासाठी असते. त्यामुळे, जलाशयामध्ये पाण्याचे उपलब्धतेचे प्रमाण किती आहे? सिंचनाचे क्षेत्र किती आहे? व सिंचनासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी किती प्रमाणात पाणी वापरल्या जाणार आहे? या बाबींचे मुल्यांकन केले नसल्यामुळे, सद्यपरिस्थितीत प्रकल्पाला किती प्रमाणात पाणी मिळू शकते, ही माहिती उपलब्ध नाही. असे दिसून येते की, जलाशयातील पाणी प्रथम प्रकल्पाला मिळेल व उर्वरीत पाणी सिंचनासाठी व पिण्यासाठी मिळेल. ही बाब पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य नाही.
- प्रकल्पाची क्षमता १३२० मेगावॅट आहे. त्यामुळे राखेच्या विल्हेवाटीसुध्दा १३२० एकर जमिनीची आवश्यकता आहे. मात्र, कंपनीकडे सद्यस्थितीत १९९५ एकर जमीन उपलब्ध आहे. त्यामुळे, भविष्यात अधिक जमिन संपादित करावी लागणार आहे. अधिक जमिन संपादित केल्यास, या परिसरातील पाण्याच्या स्त्रोतावर व इतर साधनांवर परिणाम होईल. त्याचप्रमाणे, प्रदूषणाच्या सुध्दा समस्या निर्माण होतील.
- वर्धा क्षेत्र हे जिओफिजीकल (Geophysical) स्वरूपामध्ये (Pattern) मोडते. हे चक्रीवादळ प्रभावित क्षेत्र आहे. मात्र, मुळ चक्रीवादळ प्रभावित क्षेत्र लक्षात घेवून व हवेचा प्रभावांचा विचार करून प्रदूषणाचे मुल्यांकनाचा अभ्यास केलेला नाही. याचे कारण म्हणजे पर्यावरण आघात मुल्यांकनाचा अभ्यास केवळ आक्टोबर ते डिसेंबर या कालावधीसाठीच केलेला आहे. वर्षकालावधीमध्ये पर्यावरणामध्ये बदल होत असल्यामुळे, जसे आद्रता व तापमानामध्ये बदल होतात. त्यामुळे, हा अभ्यास पुर्ण वर्ष कालावधीसाठी करण्यात यावा, ज्यामध्ये उपरोक्त बाबींचा सुध्दा समावेश करता येणे शक्य होईल. ज्यामुळे, संपूर्ण वर्षाच्या कालावधीमध्ये होणाऱ्या पर्यावरणीय प्रदूषणाचे मुल्यांकन करता येईल. त्यामुळे, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये त्रुटी आहेत, असे वक्त्याने नमुद केले.

- वर्धा जिल्हा हा महात्मा गांधीजींचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे, या वर्धा जिल्ह्याच्या विकासासाठी काही नियम ठरविलेले आहेत. मात्र, लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर हा प्रकल्प लाल संवर्गातील प्रदूषणकारी उद्योग असल्यामुळे, या नियमांचे उल्लंघन होते व या जिल्ह्यामध्ये असा प्रकल्प स्थापन करणे चुकीचे आहे. वक्त्याने पुढे सांगितले, कंपनीला औष्णिक विज निर्मितीसाठी ७००० करोड कंपनीचे व निर्मित झालेली विज पारेषण करणेसाठी सरकारला ७००० करोड रूपये खर्च येणार. मात्र, १४ करोड रूपयामध्ये १००० किलोवॅट उर्जा, सौर उर्जा प्रकल्पाद्वारे निर्माण करता येईल. अशा प्रकल्पामध्ये सुध्दा लोकांना रोजगार मिळेल व प्रदूषणाच्या समस्या निर्माण होणार नाहीत. असे आदर्श प्रकल्प देशामध्ये निर्माण करणे आवश्यक आहे. मात्र, या दिशेने प्रगती झालेली नाही, याची खंत व्यक्त केली.
- प्रकल्पाची पध्दत, वाहतुक क्रिया, विजेचे उत्पादन, विजेचे पारेषण इ. मुळे साधारणपणे १०० वर्ष कालावधीपर्यंत होणाऱ्या प्रदूषणाचे परिणामांचे मुल्यांकन करणे आवश्यक आहे. मात्र, प्रकल्पाने फक्त पाच वर्षापर्यंत होणाऱ्या प्रदूषणाचे परिणामांचे मुल्यांकन केलेले आहे
- औद्योगिकरणामुळे सामाजिक प्रदूषणाच्या सुध्दा समस्या निर्माण होतात. याबाबत स्वतंत्र मुल्यांकन करणे आवश्यक आहे.
- हा प्रकल्प ६००० करोड रु. असून सुध्दा फक्त केवळ ६०० लोकांना रोजगार देणार आहे. येथील शेतकऱ्याची उपजिविका शेतीवरच अवलंबून आहे व दुसरा पर्याय उपलब्ध नाही. तसेच या परिसरातील शेतकरी अकुशल आहे, त्यामुळे या परिसरातील केवळ ६० ते ७० लोकांनाच रोजगार मिळेल. त्यामुळे, या प्रकल्पामुळे या परिसरात सामाजिक प्रदूषण / सामाजिक अस्थिरता निर्माण होईल. त्यामुळे, प्रकल्प धारकाने केलेले पर्यावरण आघात मुल्यांकन पुन्हा करणे आवश्यक आहे. अशी मागणी केली.

१२२. श्रीमती मालती देशमुख, सेवाग्राम आश्रम, जिल्हा.वर्धा.

- ही लोकसुनावणी शेतकऱ्यांच्या हंगामाच्या काळात आयोजीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे, या ठिकाणी शेतकरी वर्ग उपस्थित नाही. ही खेदाची बाब आहे.
- हा महात्मा गांधीजींचा जिल्हा असल्यामुळे, सर्व व्यक्तींनी स्वतः कुशलतेने काम करणे गरजेचे आहे. मात्र, या जिल्ह्यामध्ये अशाप्रकारचे मोठे उद्योग स्थापन करून या जिल्ह्याचे महत्व संपवित आहेत.
- प्रकल्पाने तीन महिन्याच्या कालावधीमध्ये (आक्टोबर ते डिसेंबर) पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यास केलेला आहे. मात्र, प्रकल्प पुर्ण वर्षभर सुरू राहील. त्यामुळे, प्रदूषणाचे परिणाम संपूर्ण वर्षभर राहतील. वक्त्याने उदाहरण दिले, त्यांच्या गावांमध्ये पुर्वी आठ वर्ष कार्यरत असलेल्या साखर कारखान्याच्या प्रदूषणामुळे अद्यापही विहिरीचे, नदीचे व नळाचे पिण्यातील पाणी प्रदूषित आहे. त्यामुळे, येथे येणाऱ्या कोणत्याही कारखान्यामुळे गावांमध्ये प्रदूषण होणार आहे, पिण्याच्या पाण्याचे व वातावरणाचे प्रदूषण सुध्दा होणार आहे व या प्रदूषणाचा दुष्परिणाम पुढील पिढीला सुध्दा भोगावे लागणार आहे. त्यामुळे, अशा प्रदूषणकारी कारखान्याला मान्यता मिळत असेल, तर ही फार खेदाची बाब आहे. वक्त्याने प्रकल्प धारकाला प्रश्न केला, पुढील पिढीला या प्रकल्पाच्या प्रदूषणाच्या समस्या निर्माण होणार नाही, अशी हमी मिळेल काय?
- सद्यपरिस्थितीमध्ये प्रकल्पामुळे होत असलेली वाहतुक कमी असून सुध्दा रस्ते नादुरूस्त झालेले आहेत. तेव्हा प्रकल्प सुरू झाल्यानंतर ही वाहतुक वाढून रस्त्यांची दुर्दशा होईल. त्याचप्रमाणे, विजेच्या दिव्याच्या प्रकाशामुळे कापसाच्या पिकांचे उत्पादन होत नाही आहे. झाडांच्या पानांवर कार्बन धुळीकणांचा थर साचत असल्यामुळे, सुर्यप्रकाशा अभावी झाडे स्वतःचे अन्न तयार करू शकत नाही आहे. त्यामुळे मनुष्याला सुध्दा अन्न मिळू शकणार नाही. त्यामुळे, त्यांचा या प्रकल्पास पूर्ण विरोध आहे.

१२३. श्रीमती कल्पना ढगे.

- ही लोक सुनावणी दुपारी १२.०० वाजेपासून सुरू आहे. या सुनावणीमध्ये असे दिसून येत आहे की, या प्रकल्पामुळे पर्यावरणावर फार मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम होणार असून, त्याचा परिणाम सर्व सामान्यांना भोगावा लागणार आहे.
- हा प्रकल्प लोकांसाठी राबविला पाहिजे. मात्र, प्रकल्प हा त्यांच्या स्वार्थासाठी, नफ्यासाठी आहे.
- या प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे जमिन नापिक झाली आहे, त्यामुळे, शेतकऱ्यांच्या उपजिविकेची समस्या निर्माण होईल. त्यावेळेस, प्रकल्प धारक सुध्दा मदतीसाठी प्रतिसाद देणार नाही.
- काही शेतकऱ्यांना असे वाटत आहे की, या प्रकल्पामुळे त्यांना रोजगार मिळेल. मात्र, या प्रकल्पामुळे ५० कि.मी. पर्यंत प्रदूषणाचा प्रभाव होईल व त्यामुळे परिसरातील ६० ते ७० गावांच्या शेतजमिनीवर व पर्यावरणावर विपरीत परिणाम होईल. याबाबत, मे.लॉयड इंडस्ट्रीज लि., बरबडी या उद्योगाचे उदाहरण देवून सांगितले की, या उद्योगासाठी बरबडी येथील शेतजमिन घेण्यात आली होती. मात्र, लोकांनी उपोषणे, आंदोलने करून सुध्दा या उद्योगाने लोकांना रोजगार दिलेला नाही.
- प्रकल्प फक्त १५ वर्षापर्यंत रोजगार देणार आहे. कारण, त्यानंतर कंपनी चालणार नाही. त्यामुळे, १५ वर्षानंतर लोकांना रोजगार राहणार नाही व शेतजमिन अगोदरच विकल्यामुळे उपजिवीकेची गंभीर समस्या निर्माण होईल. सर्वात चांगला रोजगार मिळविणे म्हणजे शेती करणे आहे. त्यामुळे, या प्रकल्पामुळे सर्वसामान्यांना आर्थिक नुकसानच होईल व पर्यावरणाचे नुकसान होतच आहे. ही जाणीव शेतकऱ्यांना असायला पाहिजे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. मात्र, आता कंपनीप्रधान देश झालेला आहे.

१२४. श्रीमती ममता दरडे, महिला बचत गट.

- मे. उत्तम गॅल्वा या वर्धा जिल्ह्यातील प्रकल्पामुळे तेथील जसे, सेलू काटे या परिसरातील शेतजमिन नापिक झालेली आहे. त्यामुळे, पिकांचे उत्पादन होत नसून शेतकऱ्यांना केवळ एक चतुर्थांस पिकाची किंमत मिळत आहे. तसेच, हा प्रकल्प सुध्दा येथे स्थापन झाल्यास प्रदूषणाचे परिणाम होतील व राख ५० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर पसरेल. त्यामुळे, शेतपिकाचे नुकसान होवून आर्थिक दृष्ट्या सक्षम नसलेल्या शेतकऱ्यांवर उपासमारीची पाळी येईल. असे प्रदूषणकारी कोळशावर आधारीत औष्णिक विद्युत प्रकल्प वर्धा जिल्ह्यात स्थापन झाल्यास वर्धेतील लोकांना राखेच्या प्रदूषणाचे परिणाम भोगावे लागतील.

१२५. श्रीमती सुषमा सोनटक्के.

- मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. हा प्रकल्प कोणत्याही पर्यावरणीय नियमाच्या मापदंडानुसार योग्य नाही, हे सिध्द झाले आहे. त्याचप्रमाणे, शेतकऱ्यांच्या जमिनीवर सुध्दा परिणाम झालेला आहे, हे माहित झाले आहे. मनुष्याच्या जिवनाचे मुलभूत घटक जसे, पाणी, जमीन व हवेवर मोठ्या प्रमाणात परिणाम होत असेल तर, या प्रकल्पाचा निषेध नोंदविते.

१२६. श्रीमती सुनंदा वैद्य.

- या प्रकल्पामुळे सामान्य माणसांचे जीवन जर धोक्यात येत असेल तर, हा प्रकल्प त्यांना नको आहे.

१२७. श्रीमती पुर्णिमा उपाध्याय, विज्ञान व पर्यावरण केंद्र, दिल्ली.

- त्या दुपारी १२.०० वाजेपासून उपस्थित आहेत. त्यांनी प्रकल्प धारकास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची प्रत मागितली होती. परंतु, अद्यापपर्यंत ही प्रत मिळालेली नाही. त्यांची मते / आक्षेप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालावर आधारीत असल्यामुळे, या अहवालाची प्रत त्यांनी मागितली.

त्यानुसार, त्यांना अहवालाची प्रत देण्यात आली. याबाबत, सदस्यांनी माहिती दिली की, केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या दि. १४/०९/२००६ च्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. १६/०५/२०१२ रोजी दैनिक टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी), दैनिक देशोन्नती व दैनिक लोकमत (मराठी) या वृत्तपत्रामध्ये सुचना दिली होती व त्यामध्ये उल्लेख केल्यानुसार प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या प्रती शासनाच्या विविध कार्यालयामध्ये लोकांना अभ्यासनासाठी ठेवण्यात आलेली होती.

यावर, वक्त्याने वृत्तपत्रातील लोकसुनावणीची जाहिर सूचना वाचलेली नसल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे, वक्त्याने पुढे सांगितले की, आज ज्या लोकांनी या पर्यावरण लोकसुनावणी दरम्यान प्रकल्पाला समर्थन केल्याची मते मांडली, त्यापैकी बहुतांश लोकांना त्यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन काय असतो, अशी विचारणा केली होती. त्यावर त्या लोकांनी या अहवालाबाबत अनभिज्ञता दर्शविले.

यावर, सदस्याने वक्त्यास सूचना केल्या, त्यांनी या प्रकल्पा संबंधित पर्यावरणाबद्दल त्यांचे स्वतःचे मत मांडावे.

- वक्त्याने अध्यक्षास प्रश्न केला की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची माहिती गावकऱ्यापर्यंत कोणत्या माध्यमाद्वारे पोहोचणे गरजेचे आहे?

सदस्यांनी माहिती दिली, प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व सारांशाच्या प्रती लोकांना अभ्यासनाकरीता जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा, जिल्हा परिषद, वर्धा, जिल्हा उद्योग केंद्र, वर्धा, उपविभागीय कार्यालय, वर्धा, तहसिल कार्यालय, वर्धा, पंचायत समिती, वर्धा, ग्रामपंचायत कार्यालय, मांडवा, पुलई व बेलगांव या ठिकाणी ठेवण्यात आलेल्या होत्या व त्यानुसार केंद्र शासनाच्या अधिसुचनेचे पालन करण्यात आलेले आहे.

त्यावर, वक्त्याने आक्षेप घेतला की, या प्रकल्पामुळे प्रभावित होणाऱ्या संपूर्ण क्षेत्रापैकी फक्त तीन गावांमध्ये कागदपत्रे ठेवण्यात आलेली होती. प्रकल्पाचे कार्यान्वयन (Implementation) क्षेत्रा ऐवजी प्रकल्पामुळे प्रभावित होणारे क्षेत्राचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हाधिकारी कार्यालय व प्रकल्प धारक, यापैकी, ज्या कोणाची जबाबदारी असेल, त्यांनी प्रकल्पाच्या परिणामामुळे प्रभावित होणाऱ्या क्षेत्रामधील संपूर्ण गावांमध्ये सुध्दा संबंधित कागदपत्रे लोकांना माहितीसाठी ठेवून या प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणामाची माहिती पोहोचविणे आवश्यक होते. मात्र, ही माहिती गावांतील लोकांपर्यंत पोहोचलेली नाही. त्यामुळे, लोक येथे पर्यावरण परिणामाच्या विना माहितीने त्यांची मते मांडण्यासाठी आलेले आहेत.

- दुपारी १२.०० वाजेपासून ते ४.०० वाजेपर्यंत ज्या लोकांनी आपली मते मांडली आहेत, त्या लोकांनी त्यांना कंपनीमध्ये रोजगार मिळालेला असल्यामुळे कंपनीच्या समर्थनासाठी येथे आलेले आहे, असे सांगितलेले आहे. या लोकांनी पर्यावरण विषयावर मते मांडली नसल्यामुळे त्यांची मते लोकसुनावणीच्या कार्यवृत्तांमधून वगळण्यात यावी, अशी मागणी केली. प्रकल्प धारकाने या लोकांना प्रवृत्त करून प्रकल्पाचे समर्थन करण्यासाठी लोकसुनावणीमध्ये आणले, याचा वक्त्याने निषेध केला व सांगितले की, असे करण्याऐवजी प्रकल्प धारकाने लोकांना पर्यावरणाच्या परिणामाबद्दल माहिती देणे आवश्यक होते. त्या आधारावर लोक आपली मते, अभिप्राय देवू शकले असते.

- प्रकल्पाच्या अहवालानुसार परिसरामध्ये ११ संरक्षित वनक्षेत्रे, २ राखीव वन क्षेत्र आहेत. प्रकल्प स्थळापासून बोर वन्यजीव अभयारण्याचे विस्तारीत क्षेत्र किती दूर अंतरावर आहे? याची माहिती मागितली.

प्रकल्प धारकाने सांगितले, बोर अभयारण्य प्रकल्पापासून १५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर आहे. ही माहिती प्रकल्प धारकास केंद्र शासनाला जाहिर करावी लागते. मात्र, बोर वन्यजीव अभयारण्याच्या विस्तारीकरणाबाबत अधिसूचना निर्गमित झाली आहे किंवा कसे? याची त्यांना माहिती नाही, असे प्रकल्प धारकांने सांगितले.

- प्रकल्प अहवालामध्ये नमुद केलेले संरक्षित वनक्षेत्रे व राखीव वनक्षेत्रांची सविस्तर माहिती अहवालामध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे, हे वनक्षेत्रे कोणती आहेत? व प्रकल्प स्थळापासून किती अंतरावर आहेत? याची सविस्तर माहिती मागितली.

प्रकल्प धारकाने सांगितले, की याबाबत माहिती अहवालामध्ये उपलब्ध आहे.

- अहवालामध्ये नमुद केलेले संरक्षित वनक्षेत्रे व राखीव वनक्षेत्रामध्ये कोणत्या प्रकारची जैवविविधता आहे? याचा अभ्यास केला आहे काय? कोणत्या प्रकारचे वन्यजीव प्राणी आहेत? भविष्यामध्ये या प्राण्यावर होणाऱ्या परिणामांचे सौम्यकरण (Mitigation) कसे करणार आहे? याबाबत माहिती मागितली.

मे.विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने माहिती दिली, जैवविविधतेचा अभ्यास केलेला असून पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये, वनस्पती व वन्यजीव आधारभूत माहिती मथळ्याखाली, ही माहिती दिलेली आहे.

वक्त्याने सांगितले की, ही माहिती अहवालाच्या पान क्र. सी-३-४९ मध्ये दिलेली आहे. मात्र, निदर्शनास आणून दिले, यामध्ये केवळ संरक्षित वनक्षेत्रे व राखीव वनक्षेत्रांची सद्यस्थितीची आधारभुत माहिती उपलब्ध आहे, परंतु त्यावर होणारे परिणाम व सौम्यकरणा (Mitigation) बद्दल माहिती दिलेली नाही.

मे.विम्टा लॅबच्या प्रतीनिधीने सांगितले, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या तिसऱ्या धड्यामध्ये संरक्षित वनक्षेत्रे व राखीव वनक्षेत्राची आधारभूत माहिती, चवथ्या धड्यामध्ये त्यावर होणारे परिणामाची माहिती व पाचव्या धड्यामध्ये परिणामाचे व्यवस्थापन योजनेची माहिती दिलेली आहे.

वक्त्याने याबाबत आक्षेप घेतला की, प्रकल्प धारकातर्फे दिशाभुल करण्यात येत आहे व विचारले की, संरक्षित वनक्षेत्रे व राखीव वनक्षेत्रामध्ये आढळलेल्या जैवविविधतेवर या प्रकल्पामुळे काय परिणाम होणार आहे? व त्याचे सौम्यकरण (Mitigation) कसे करणार आहे? याची माहिती अहवालामध्ये उपलब्ध नाही. अहवालाच्या धडा क्र. ४ व ५ मधील माहिती सामान्य (Generic) आहे.

- प्रकल्प धारकातर्फे झाडे तोडण्यात आली आहे व प्रकल्प धारकातर्फे वृक्ष लागवड केलेली आहे, असा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे, प्रकल्पापुर्वी वृक्ष लागवडीची / जमिनीची असलेली परिस्थिती व प्रकल्पाचे कार्य सुरू झाल्यापासून केलेली वृक्ष लागवड तपासणेसाठी जीपीएस (GPS) तंत्रज्ञानावर आधारीत दोन्ही कालावधीचे नकाशे तयार करून अहवालामध्ये समावेश करणे आवश्यक आहे, अशा सूचना दिल्या. यामुळे हरितपट्टा किती विकसित केलेला आहे? हे समजेल.

..६८/-

- प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सन २००९ या वर्षामधील आहे. परंतु, ही पुर्नलोकसुनावणी सन २०१२ मध्ये घेण्यात येत असल्यामुळे नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करणे आवश्यक होते, असे मत व्यक्त केले.

मे.विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने माहिती दिली, सन २००९ मध्ये तयार केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या आधारावर पर्यावरण विषयक परवाना प्राप्त झालेला आहे व सन २०१२ पर्यंत प्रकल्पाचे फक्त बांधकामच सुरू झालेले आहे व इतर विकास झालेला नाही.

यावर, वक्त्याने निदर्शनास आणून दिले की, प्रकल्पाच्या विकासामध्ये बदल झालेला नसला तरी, परिसरातील पर्यावरण परिस्थितीमध्ये बदल झालेला आहे.

त्यावर, विम्टा लॅबच्या प्रतिनिधीने सांगितले, इतक्या कालावधीमध्ये परिसरातील पर्यावरणाच्या परिस्थितीमध्ये (धुळीकण, सल्फर डायऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईड) फारसा बदल होत नाही.

- प्रकल्पाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमुद केलेली आकडेवारी व माहिती सन २००१ च्या जनगणनेवर आधारीत आहे. परंतु, सध्या सन २०१२ वर्ष सुरू आहे. त्यामुळे, परिस्थितीमध्ये व जमिनीच्या वापरामध्ये बदल झालेला आहे. उदा. मनरेगा योजने अंतर्गत विहिरी खोदण्यात आलेल्या आहेत, ज्यामुळे, प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतजमिनीमध्ये विहिरी उपलब्ध आहेत. त्यामुळे, सद्यपरिस्थितीमध्ये सन २००९ वर्षाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल अपूर्ण असून सद्यपरिस्थितीचे खरे चित्र दर्शवित नाही. त्यामुळे, हा संपूर्ण अहवाल सद्यपरिस्थितीनुसार सुधारीत करणे आवश्यक आहे किंवा सद्यपरिस्थितीनुसार झालेल्या बदलाची अद्ययावत माहिती गोळा करून मुळ अहवालासोबत अतिरिक्त माहिती म्हणून जोडावी, असा सल्ला दिला.

यावर, विम्टा लॅबच्या प्रतीनिधीने सांगितले की, सन २००१ च्या जनगणनेच्या अहवालानंतर अद्यापपर्यंत सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा नवीन अहवाल प्राप्त झालेला नाही व जनगणनेच्या आधारावर प्रकाशित झालेली माहितीच अभिप्रमाणित (Authenticated) समजण्यात येते.

याबाबत, वक्त्याने निदर्शनास आणून दिले की, जनगणनेच्या अहवाला व्यतिरिक्त संपूर्ण देशामध्ये शासनातर्फे राष्ट्रीय कुटूंब आरोग्य सर्व्हेक्षण (National Family Health Survey) करण्यात येते. यामध्ये सामाजिक-आर्थिक व आरोग्य दर्शकांचे सर्व्हेक्षण करण्यात येते. या सर्व्हेक्षणाची सन २०१० ची माहिती उपलब्ध आहे. ही माहिती सुध्दा शासनाचीच समजण्यात येते. त्यामुळे, या माहितीच्या आधारे सुध्दा अहवाल तयार करण्यात येवू शकतो, असा सल्ला दिला.

- प्रकल्प धारकाने लोकांकडून कोणत्या नियम / कायद्या अंतर्गत जमिन अधिग्रहण केलेली आहे? असा प्रश्न वक्त्याने प्रकल्प धारकास विचारला.

यावर, प्रकल्प धारकाने सांगितले, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग संचालनालयाकडून जमिन खरेदी करण्याची परवानगी घ्यावी लागते. त्यासाठी, प्रकल्पासाठी जी जमिन खरेदी करणार आहे, त्या जमिनीचे संपूर्ण सर्व्हे क्रमांकाची माहिती देवून जमिन खरेदी परवानगीसाठी अर्ज करावा लागतो. याला एमटिएएल (MTAL) परवाना असे म्हणतात, जो त्यांनी प्राप्त केलेला आहे.

यावर, वक्त्याने आक्षेप घेतला की, प्रकल्प धारकाने जमिन अधिग्रहण कायद्या अंतर्गत जमिन अधिग्रहीत केलेली नाही.

यावर, प्रकल्प धारकाने खुलासा केला की, जमिन अधिग्रहीत केलेली नसून खरेदी केलेली आहे.

वक्त्याने याबाबत सांगितले की, लोकसुनावणीमध्ये प्रकल्प धारकाने दिलेल्या माहितीनुसार असे समजते की, प्रकल्प धारकाने प्रत्येक शेतकऱ्यांशी स्वतंत्रपणे वाटाघाटी करून जमिन खरेदी केलेली आहे. मात्र, यासाठी क्षेत्रातील जमिनीच्या मुल्यानुसार किंवा निंबधक कार्यालयाकडे नोंद असलेल्या किमान मुल्यानुसार एकसारखी किंमत ठरविलेली नाही.

प्रकल्प धारकाने सांगितले, जमिन खरेदी शेतकऱ्यांशी स्वतंत्रपणे वाटाघाटी करून केलेली आहे.

यावर, वक्त्याने पुन्हा विचारले की, जमिन खरेदी करण्याच्या वाटाघाटी राज्य शासनाच्या संबंधित अधिसूचनेनुसार केलेली आहे काय?

यावर, प्रकल्प धारकाने, नाही असे उत्तर दिले.

त्यावर, वक्त्याने निदर्शनास आणून दिले की, प्रकल्प धारकाने शेतकरी जितका सौदा करू शकतो त्या भावाने जमिन खरेदी केलेली आहे.

त्यावर, प्रकल्प धारकाने पुन्हा सांगितले, शेतकऱ्यांच्या संमतीने बाजार भावानुसार सौदा करून जमिन खरेदीसाठी विक्रीपत्रे तयार केलेली आहेत.

वक्त्याने सांगितले, प्रकल्प धारकाच्या उत्तरावरून असे समजते की, मांडवा, पुलई व बेलगांव या गावातील सध्याचा जमिनीचा बाजारभाव १ लाख ६० हजार रुपये प्रती एकर आहे.

मात्र, प्रकल्प धारकाने या बाबीचे खंडन केले व हे वक्त्याचे मत आहे, असे सांगितले. बाजार भावाप्रमाणे जमिन कमी-जास्त भावाने खरेदी केलेली आहे व बाजारभाव हा बदलत असतो आणि व कोणीही व्यक्ती ठरवित नाही, असे प्रकल्प धारकाने सांगितले.

- या प्रकल्पामुळे प्रभावित क्षेत्रातील लोकांचे पुनर्वसन/पुनर्वसाहतीकरण कोणत्या कायद्यानुसार करणार आहे? असा प्रश्न वक्त्याने केला.

यावर, प्रकल्प धारकाने अध्यक्षांना विनंती केली की, पुनर्वसनाचा हा मुद्दा नोंद करून घ्यावा. कारण, या प्रकल्पामुळे कोणाचेही पुनर्वसन/पुनर्वसाहतीकरण होणार नाही.

१२८. श्री मोहन खैरकार, वर्धा, जि.वर्धा.

- लॅन्को औष्णिक विद्युत प्रकल्प हा प्रदूषणकारी प्रकल्प असून प्रदूषण वाढविणार आहे. मोठ्या प्रमाणात प्रदूषण होणार असून सुध्दा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कंपनीस नाहरकत प्रमाणपत्र दिले. सदर कंपनीस परवानगी देण्यात आली तर प्रदूषण नियंत्रण मंडळ सुध्दा जबाबदार राहील.

१२९. श्री राजेंद्र देवतळे, वर्धा, जि.वर्धा.

- प्रकल्पाने पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये दिलेली माहिती पुर्णपणे खरी नाही. ही प्रकल्प धारकाची चुक आहे. त्यामुळे, सर्वप्रथम प्रकल्प धारकाने ही माहिती व्यवस्थितपणे तयार करावी.
- प्रकल्पाचा खर्च ६००० कोटी रूपये असून सुध्दा फक्त ६०० लोकांना रोजगार मिळत असेल, तर ही अभिमानाची बाब नाही.
- प्रकल्पामुळे प्रदूषणाच्या समस्या (धुळीकणाचे प्रदूषण, पिकांचे नुकसान इ.) निर्माण झाल्यानंतरच त्यावर उपाययोजना करू, अशी भुमिका निदर्शनास आली.
- सद्यस्थितीचा विचार केला असता, भूगांव येथील उद्योगाच्या प्रदूषणामुळे तेथील जमिनीची व भूगांव गावाची काय स्थिती झाली आहे? हा प्रश्न तेथे प्रत्यक्ष जाऊन सोडविला पाहिजे. प्रकल्प तयार होत असतांना करोडो रूपये खर्च करण्यात येतात, परंतु पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी २ वर्षे लागतात. असे जर दृष्य दिसत असेल तर, अशाप्रकारचे औष्णिक विद्युत प्रकल्प या महात्मा गांधीजीच्या जिल्ह्यामध्ये, ज्यांना वर्धा जिल्ह्यामध्ये प्रदूषण नको होते, स्थापन होत असल्यास ते उल्लंघन आहे.
- सन २००५ मध्ये गावांमध्ये स्वयंपाकासाठी चुलीमध्ये १ किलो लाकूड ज्वलनासाठी वापरला असता, त्यामधून निर्माण होणाऱ्या धुरामुळे, डोळयाचे, फुफ्फुसाचे व इतर आजार होत होते. त्यासाठी हा त्रास होवू नये म्हणून, एक चांगल्याप्रकारची चुल निर्माण केली व धुराचे शास्त्रोक्त पध्दतीने उत्सर्जन करण्याकरीता १० फुट उंचीचे धुरांडे बसविले. जर १ किलो लाकडू जाळल्यानंतर निर्माण होणाऱ्या धुराचे प्रदूषण कमी करण्याकरीता १० फुट उंचीचे धुरांडे उभारावे लागतात, तेव्हा या प्रचंड औष्णिक विद्युत प्रकल्पातील प्रदूषण कमी करण्याकरीता किती मोठ्या उंचीचे धुरांडे उभारावे लागेल? त्यामुळे, प्रकल्पामुळे निर्माण होणारा रोजगार महत्वाचा नसून, निर्माण होणाऱ्या प्रदूषणाच्या समस्या दूर करून, तेथे चांगली परिस्थिती निर्माण करणे, ज्यामुळे कोणालाही त्रास होणार नाही, ही बाब महत्वाची आहे.
- झाडांमुळे पर्यावरणाचे संरक्षण करता येते. या प्रकल्पाने बऱ्याच प्रमाणात झाडे तोडून नवीन झाडे लावलेली आहेत. परंतु प्रकल्प सुरू झाल्यानंतर या नवीन झाडांची उंची किती राहील? त्यांची प्रदुषण नियंत्रणाची क्षमता किती पटीने वाढेल? असे प्रश्न उपस्थित केले व पुढे सांगितले की, त्यांच्या मते एक चांगले झाड तयार होण्यासाठी साधारणपणे ५० वर्षाचा कालावधी लागतो.
- सध्या जरी या प्रकल्पामुळे, १० कि.मी. पर्यंतच प्रदुषणाचा परिणाम होईल, असे असले तरी प्रकल्प सुरू झाल्यानंतर, परिणाम किती अंतरापर्यंत होईल? याची त्यांना कल्पना नाही. त्यामुळे, या सर्व त्रुटी दुर करून अहवालामध्ये समाविष्ट करायला पाहिजे, असे मत व्यक्त केले व त्यांना मत मांडण्यासाठी वेळ दिला, त्याबद्दल धन्यवाद दिले.

१३०. श्री अटलबिहारी राधाकृष्ण पांडे, वर्धा, जिल्हा वर्धा.

- ते स्वत: प्रकल्प स्थळापासून १० कि.मी. च्या प्रभावित क्षेत्रामध्ये राहतात. या लोकसुनावणीमध्ये प्रदूषणाच्या मुद्यांवर चर्चा होणे आवश्यक होते. मात्र, हा मुद्दा बाजूला राहिला.
- प्रकल्प धारकाने सामाजिक सर्व्हेक्षण गावांतील मुलांच्यामार्फत केलेला आहे. मात्र, असा सर्व्हेक्षण करणेसाठी गावांतील मुले सक्षम आहेत काय? असा मुद्दा उपस्थित केला.
- प्रकल्प धारकास प्रश्न केला की, कंपनीने या प्रकल्पासाठी शेती खरेदी करण्यास कधीपासून सुरवात केली होती? व प्रकल्पाचे विज उत्पादन कधी सुरु होणार आहे?

प्रकल्प धारकाने सांगितले, जमिनीची खरेदी साधारणपणे सन १९९८ पासून ते सन २०१० पर्यंत करण्यात आली व औष्णिक विजेचे उत्पादन सन २०१४ पासून सुरू होणार आहे.

यावर, वक्त्याने म्हटले, या प्रकल्पाचे विज उत्पादन सन २०१४ मध्ये सुरू होणार आहे, हे ठरलेलेच आहे. त्यामुळे, ही लोकसुनावणी केवळ औपचारीकता आहे.

- प्रकल्प धारकास प्रश्न केला, मांडवा, पुलई, बेलगांव या गावांतील किती शेतकऱ्यांची जमिन खरेदी केलेली आहे?

  प्रकल्प धारकाने यावेळेस माहिती उपलब्ध नसल्याचे सांगितले.

- प्रकल्प धारकाने केलेल्या सामाजिक सर्व्हेक्षणामध्ये मांडवा, पुलई व बेलगांव या तीन गावांमध्ये किती शेतमजूर परिवार व शेतमजूर राहतात यांचा समावेश केला होता काय?

  प्रकल्प धारकाने माहिती दिली, प्रकल्पातर्फे केलेल्या सामाजिक सर्व्हेक्षणामध्ये या गावांमध्ये किती सुशिक्षित लोक आहेत, त्यांना ताबडतोब काय मदत करता येईल, त्यांच्या शिक्षणासाठी, शिष्यवृत्तीसाठी, उच्च शिक्षणासाठी, त्यांना कामासाठी काय मदत करता येईल, या बाबींचा समावेश आहे व ही माहिती उपलब्ध आहे.

- प्रकल्प धारकाने किती एकर जमिन औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी खरेदी केली आहे? याची माहिती मागितली.

  प्रकल्प धारकाने माहिती दिली की, साधारणपणे ६५० ते ६६० एकर जमिन अद्यापपर्यंत खरेदी केली आहे.

  वक्त्याने सांगितले, प्रकल्प धारकाने ही जमिन अकृषक वापरासाठी खरेदी केली आहे. मात्र, अकृषक वापरासाठी जमिन खरेदी केल्यास, त्यावर कर भरावा लागतो. त्यामुळे, लॅन्को प्रकल्पाने कर भरलेला आहे काय? अशी विचारणा केली. वक्त्याने पुढे सांगितले, प्रकल्प धारकाने अकृषक वापरासाठी खरेदी केलेल्या जमिनीचा शासनाकडे कर भरलेला नाही.

- या औष्णिक विद्युत प्रकल्पामुळे, लोकांचा काहीही फायदा होणार नाही. विदर्भामध्ये १३० औष्णिक विद्युत प्रकल्प येणार असून सुध्दा येथील लोकांना भार नियमन होणार नाही, असे आश्वासन सुध्दा, त्यांच्या अधिकारामध्ये ही बाब नसल्यामुळे दयायला तयार नाहीत.
- त्यांचा या औष्णिक विद्युत प्रकल्पास विरोध आहे व शेवटपर्यंत राहील.

१३१. श्री पांडुरंग रामकृष्ण वाघ, बेलगांव, ता. व जिल्हा वर्धा.

- प्रकल्पाचे बाष्पके व धुराड्यांपासून त्यांचे शेत अंदाजे ५०० मीटर अंतरावर आहे. त्यांचे शेत लॅन्को प्रकल्पापेक्षा उंच भागावर आहे. त्यामुळे, प्रकल्पाच्या २७५ उंचीच्या धुराड्यांतुन उत्सर्जित होणारी धुळ त्यांच्या शेतामध्ये नक्कीच पडेल. याचा परिणाम अगोदर जवळ असलेल्या त्यांच्या शेत पिकांवर होईल व नंतर धामनगांव, झाडगांव, दिग्रस, उमरी, आंजी, बोरगाव या गावांतील शेतपिकावर क्रमवारीनुसार परिणाम होईल. त्यामुळे, परिसरातील शेती नष्ट होईल व आरोग्याबर विपरीत परिणाम होवून आयुष्य सुध्दा कमी होईल, याची दखल ही तक्रार समजून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने घ्यावी. असे म्हटले.

१३२. श्री प्रविण वासुदेवराव कराडे, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- प्रकल्पाने लावलेल्या झाडांपैकी फक्त २५०० झाडेच सध्या जिवंत आहेत, असा दावा केला. त्यामूळे, कंपनीने सांगितल्याप्रमाणे पुष्कळ झाडे लावलेली आहेत, ही माहिती खोटी आहे.
- ते प्रकल्पाकडे बऱ्याचवेळा रोजगार मिळावा म्हणून गेले होते. परंतु एक वर्षपर्यंत रोजगार न दिल्यामुळे, त्यांनी आंदोलन केले होते. त्यांच्या मागणीनुसार प्रकल्पधारकाने त्यांना कॅन्टीन चालविण्यासाठी कार्य दिले होते. मात्र, त्यांचे भावाच्या ट्रॅक्टरचे भाड्याचे तीन महिन्याची पैशाची थकबाकी मागण्यासाठी ते कंपनीमध्ये गेले असता, कंपनीतील एका कर्मचाऱ्याने त्यांना सध्या पैसे मिळणार नाही, असे सांगुन, काही महिन्यानंतर येण्यास सांगितले. त्यामुळे, त्यांना संताप आला. परंतु, त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

  प्रकल्पाच्या परिसरात प्रवेश करण्यास त्यांना मज्जाव करण्यात आला असून, त्यांचे कॅन्टीन चालविण्याचे कार्य बंद झाले आहे. त्यामुळे, त्यांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे.

  यावर, प्रकल्प धारकाचे प्रतीनिधी श्री.एस.एम.महाजन यांनी सांगितले, याबाबत त्यांना कल्पना नाही.

- वक्त्याने प्रकल्प धारकाकडे रु १.५ लाख नुकसान भरपाई मागितली. अन्यथा, ते आत्महत्या करतील, असा गंभीर इशारा दिला.

१३३. श्री मनोज राठी, ता.जिल्हा वर्धा.

त्यांचे बंधू श्री राजेंद्र राठी यांच्या वतीने मत मांडले.

- त्यांचे शेत मौजा.पुलई येथे आहे. त्यांचे शेता समोरील पुलई-मांडवा ते बेलगांव असलेली पांदण कंपनीने दोन्ही टोकाला फाटक उभारून बंद केली आहे. शासनाने याबाबत प्रकल्पाला परवानगी दिली आहे काय? असा प्रश्न उपस्थित केला.

अध्यक्षांनी, त्यांचेकडे याबाबत तक्रार प्राप्त झाली आहे व चौकशी झाल्यावर माहिती कळविण्यात येईल. असे सांगितले.

१३४. श्री किशोर किनकर, सचिव, नवनीत बहूउद्देशिय संस्था, मांडवा, ता. व जिल्हा वर्धा.

- मांडवा येथील शेत सर्व्हे क्र. २४१ मध्ये त्यांच्या शिक्षण संस्थेची इमारत आहे. लॅन्को प्रकल्पाचे बांधकाम सुरू झाल्यापासून त्यांची सर्व्हे क्र. २४० मध्ये असलेल्या विहिरीच्या पाण्याची पातळी, नाहीसी झालेली आहे. तसेच, याच सर्व्हे क्र. २४० मध्ये असलेल्या दुसऱ्या विहिरीतील पाण्याचे प्रकल्पामुळे व प्रकल्पासाठी होणाऱ्या वाहतुकीमुळे प्रदूषण झाले आहे.
- प्रकल्पाच्या बांधकामा दरम्यान करण्यात येणाऱ्या ब्लास्टींगमुळे, त्यांच्या शिक्षण संस्थेच्या इमारतीच्या भिंतीला नुकसान झालेले आहे व इमारतीची पॅरापेट भिंत पडलेली आहे. याबाबत, प्रकल्प धारकाकडे एकदा संपर्क केला असता, त्यांनी या विषयाकडे दुर्लक्ष केले.
- ही निवासी शाळा असल्यामुळे भविष्यामध्ये विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊन, दमा, कॅन्सर या सारखे रोग होऊ शकतात. याबाबत कंपनी शिक्षण संस्थेला नुकसान भरपाई देणार आहे काय? किंवा शाळेचे स्थानांतर करण्याबाबत काय उपाययोजना करणार आहे? याबाबत प्रकल्पधारकास माहिती विचारली.

प्रकल्प धारकाने सांगितले की, प्रकल्पातील कामगारांना व इतरांना अपाय होवू नये, यासाठी ब्लास्टींगच्या तिव्रतेचा परिणाम १५० फुटा पेक्षा जास्त अंतरावर होणार नाही, इतक्याच तीव्रतेचे ब्लास्टींग करण्यात येते. प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने प्रशासनाला विनंती केली, वक्त्यांच्या शिक्षण संस्थेला झालेल्या नुकसानीची पाहणी करावी.

वक्त्याने, याबाबत निदर्शनास आणून दिले, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दि.१६/०६/२०१२ रोजी त्यांचे शिक्षण संस्थेच्या स्थळास भेट देवून चौकशी केलेली आहे.त्यानुसार, त्यांचे विहिरीतील पाणी नाहिसे झालेले आहे, पिण्यायोग्य पाणी राहिलेले नाही व पाणी प्रदूषित झालेले असून आरोग्याचे प्रश्न निर्माण होणार आहेत. त्यामुळे, प्रकल्पातर्फे त्यांच्या शैक्षणिक संस्थेची काय पुर्नव्यवस्था करणार आहे? असा प्रश्न उपस्थित केला.

प्रकल्प धारकाने सांगितले की, प्रशासनाने याबाबत निर्णय घेवून प्रकल्पधारकास योग्य निर्देश द्यावे.

वक्त्याने निदर्शनास आणून दिले की, त्यांची शैक्षणिक संस्था प्रकल्पाच्या प्रभावित क्षेत्रामध्ये असल्यामुळे प्रकल्प धारकाचा या बाबींशी थेट संबंध आहे व सध्या शाळा बंद जरी असली, तरी सुध्दा त्या शाळेच्या इमारतीची पडझड होवू दयायची काय? शाळा सुरू झाल्यावर काय उपाययोजना करणार आहे? याशिवाय संस्था, त्या ठिकाणी दुसरी निवासी शाळा सुरू करू शकते. त्यामुळे, विद्यार्थ्यांवर परिणाम होवू नये, यासाठी प्रकल्प धारक काय उपाययोजना करणार आहे? असे प्रश्न उपस्थित केले.

मा.अध्यक्षांनी वक्त्याला सुचना केल्या, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या तपासणी अहवालाची प्रत प्रकल्प धारकास पुढील कार्यवाहीसाठी देण्यात यावी.

- प्रकल्पाचे बांधकाम सुरू झालेल्या परिसरातील तापमानाची मे महिन्यामध्ये त्यांनी त्यांच्या राहत्या घराच्या इमारतीमध्ये नोंद घेतली असता, ४७°C तापमान आढळले. या उच्च तापमानामुळे पशुपक्षी मृत्युमुखी पडत आहेत. तेथील मोठ्या वृक्षांची कत्तल करण्यात आलेली आहे. त्यामुळे, सुर्यकिरणांचा थेट परिणाम होत आहे. त्यामुळे, भविष्याचा विचार केला तर मनुष्याचे या कंपनीमुळे परिसरामध्ये वास्तव्य करणे कठीण होईल.
- त्यामुळे, लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. मांडवा द्वारा होत असलेल्या पर्यावरण प्रदूषणाचा भविष्यातील परिणामांचा विचार करता व शाळेचे तसेच गोरगरीब जनतेचे आणि शेतकऱ्यांच्या भविष्याचे होणारे नुकसान लक्षात घेता अधिकाऱ्यांनी हा प्रकल्प बंद करण्याचे आदेश निर्गमित करावे. अशी मागणी केली.

१३५. श्री मिलींद मानवटकर, पुलई, ता. व जिल्हा वर्धा.

- त्यांनी श्री शंकर कासार यांच्या वतीने मत मांडले.
- या लोकसुनावणीसाठी २ लाख रूपये शुल्क म्हणून जमा केले होते. त्यापैकी एक लाख रूपयाची टाईम्स ऑफ इंडियामध्ये जाहिरात दिली. येथे या ठिकाणी इतके मोठे मंडप उभे केले व मोठमोठ्या स्क्रीन लावल्या, परंतु येथे आलेल्या लोकांसाठी साध्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करता आली नाही.
- येथे कार्यवृत्ताची नोंद घेण्यासाठी जितके कॅमेरे लागले आहेत, त्यातील सर्व बाबींची नोंद त्यांना देण्यात यावी. असे सांगितले.

- अद्याप कंपनी सुरूही झालेली नसतांना सुध्दा प्रकल्पाच्या विजेच्या दिव्यांच्या प्रकाशामुळे, धुळीमुळे तसेच सांडपाण्याच्या प्रदूषणामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान होत आहेत. यासाठी, त्यांना धनाकर्षाच्या स्वरूपात मदत मिळत आहे. कंपनी सुरू झाल्यानंतर फार मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान होईल, तेव्हा त्याचा मोबदला देण्याची काय तरतुद कंपनीने केलेली आहे? याबद्दल माहिती विचारली.

यावर, प्रकल्प धारकाने असे सांगितले की, वक्त्याने नुकसान भरपाई दिली, असे जे सांगितले, ती नुकसान भरपाई नसून मदत होती. याबाबत, प्रकल्प धारकाने पुढे सांगितले, काही शेतकऱ्यांनी विजेच्या दिव्यांच्या प्रकाशामुळे पिके येत नाहीत, अशी तक्रार कंपनीकडे केली होती. ही बाब, त्यांचेसाठी नवीन होती. त्यामुळे, डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ व राहुरी कृषी विद्यापीठ यांचेशी पत्रव्यवहार करून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. कृषी विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार त्यांना असे समजले की, विजेच्या दिव्यांच्या प्रकाशामुळे शेतपिकांवर नुकसान होते किंवा कसे, याबाबत अद्यापही संशोधन करण्यात आलेले नाही. तरी सुध्दा या विषयावर तोडगा काढणेसाठी व शेजार धर्माचे पालन करण्यासाठी शेतकऱ्यांना मदत केली.

- वक्त्याने असे विचारले की, कंपनी सुरू झाल्यानंतर फार मोठ्या प्रमाणात राख पसरून लोकांचे शेतपिकाचे नुकसान होईल. त्याचा मोबदला देण्याची काय तरतुद कंपनीने केलेली आहे?

यावर, प्रकल्प धारकाकडून, असे स्पष्ट करण्यात आले की, त्यांनी प्रकल्पाच्या सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे, राखेचा प्रभाव हा फक्त १.४ कि.मी. पर्यंत कंपनीच्या स्वत:च्या क्षेत्रातच राहणार आहे. याशिवाय केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाने कोणत्याही गावांमध्ये प्रदूषण होवू नये, म्हणुन प्रकल्प धारकास २७५ मीटर उंचीचे धुरांडे उभारण्यास सुचविले आहे.

- प्रकल्पासाठी लागणारे पाणी हे धाम नदीमधून वापरण्यात येत आहे. त्यासाठी परवानगी आहे काय? त्याची स्वामीत्वधन (Royalti) पावती येथे दाखवावी.

यावर, प्रकल्प धारकाने सांगितले, ते या ठिकाणी सर्व कागदपत्रे घेवून न आल्यामुळे स्वामीत्वधन (Royalti) पावती येथे दाखवू शकत नाही. परंतु, विदर्भ सिंचन विकास महामंडळ परवानगी देतांना जिल्हा प्रशासनाची परवानगी घेते. यासाठी लागणारा रकमेचा भरणा त्यांनी केलेला आहे. वक्ता याबाबीची शहानिशा कंपनी धारकाकडे किंवा जिल्हा प्रशासनाकडे चौकशी करून करू शकते.

- केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या तज्ञ समिती (Appraisal Committee) कडे पर्यावरण परवान्यासाठी लोकसुनावणीचा अहवाल विचाराधीन असतांना, कंपनीवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल नाही, अशी खोटी माहिती दिली व पर्यावरण विषयक परवाना प्राप्त केला. मात्र, त्यावेळचे कंपनी संचालक श्री. रवि केशव राव यांच्यावर गुन्हा दाखल होता. याबाबत स्पष्टीकरण मागितले.

प्रकल्प धारकाकडून असे स्पष्टीकरण देण्यात आले की, केंद्र शासनास द्यावयाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये कंपनीवर गुन्हा दाखल झाला आहे काय? याबाबत, माहिती घोषीत करावयाची असते. कंपनीच्या संचालकावर गुन्हा दाखल होता, असे सांगुन, कंपनीवर मात्र गुन्हा दाखल झालेला नसल्यामुळे प्रकल्प धारकाने केंद्र शासनास दिलेले प्रतिज्ञापत्र चुकीचे नाही.

..७५/-

१३६. श्री भास्कर दादाराव इथापे, वर्धा, जिल्हा वर्धा.

त्यांनी श्री गजानन वाचोळे यांच्या वतीने मत मांडले.

- प्रकल्पासाठी बाजारभावाप्रमाणे जमिनी घेतल्या पण त्यांच्या जमिनीच्या विक्रीपत्रावर नोंद असलेल्या रकमेपेक्षा प्रत्यक्षात जवळ-जवळ करोडो रूपयांची बेहीशेबी रक्कम शेतकऱ्यांना देण्यात आली, त्यामुळे, या व्यवहारात भ्रष्टाचार झाला आहे. हे स्पष्ट होते. त्यामुळे, भ्रष्टाचारासारखे मानसिक प्रदूषण कंपनीच्या दलालांनी (Broker) किंवा अधिकृत अधिकाऱ्यांनी केले आहे, हे स्पष्ट होते. उदा. विक्रीपत्रामध्ये ३ लाख रू. जमिन खरेदीची किंमत दाखविली व त्यावर स्टॅम्प ड्युटीचा भरणा शासनाकडे केला. परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्याला ३० लाख रूपये देण्यात आले. हे जास्तीचे पैसे कोठून आले? याविषयी कंपनीकडे माहिती आहे काय? किंवा त्यांच्या बँक खात्याच्या लेखा परिक्षणात (Audit) नोंद आहे काय?
- सन २०१४ मध्ये कंपनीचे उत्पादन सुरु होणार आहे. पण वास्तविकता कंपनीने सध्या जे झाडे लावलेली आहेत, ती छोटी असून त्यापैकी काही जिवंत आहेत व काही मृत झालेली आहेत. या कंपनीमुळे जे काही प्रदूषण होणार आहे, त्याचे प्रमाण प्रकल्प धारकास माहिती आहे. या प्रदूषणास नियंत्रित करणेसाठी झाड प्रगल्भ (Mature) असावे. ते साधारणपणे किती वर्ष वयाचे असावे, त्याची प्रजाती कोणती असावी, झाडाच्या खोडाची जाडी किती असावी व झाडाची क्षमता काय असावी, याविषयी शास्त्र आहे. मात्र, कंपनी ज्या झाडांची लागवड करीत आहे, ही सर्व झाडे सन २०१४ मध्ये कंपनी एक महिना सुरू झाल्याच्या कालावधीच्या उत्पादनातच नष्ट होतील. कंपनी सन २०१४ मध्ये उत्पादन सुरू करून प्रदूषण रोखण्याचा भार या छोट्या झाडांवर टाकणार आहेत. तीन वर्षाचे वय असलेल्या झाडांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण रोखण्याची क्षमता नसते त्यामुळे, कंपनीचा वृक्षारोपन कार्यक्रम खोटा (Bogus) आहे. असा आक्षेप घेतला. कंपनीने प्रकल्प उभारण्याच्या १५ वर्ष अगोदर वृक्षारोपन करायला हवे होते. त्यामुळे, प्रकल्प सुरू करतांना झाडाचे किमान वय १५ वर्ष होवून प्रदूषण नियंत्रण शक्य झाले असते. कंपनीने लावलेल्या सर्व झाडांची सन २०१४ मध्ये वाढ खुटूंन जाईल, पाने छोटी-छोटी राहतील व प्रदूषण रोखणार नाहीत. त्यामुळे, कंपनीने केलेली वृक्ष लागवड, हे सर्व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दाखविण्याचा दिखावा आहे.
- कंपनीने सादरीकरणाच्या वेळी १० कि.मी. पर्यंतचे जे प्रभावित क्षेत्र दाखविले आहे. त्या परिसरातील झाडांचा आढावा व जातीचा अभ्यास कंपनीने केला आहे काय? कोणत्या प्रजातीचे झाडे आहेत व किती आहेत? किती झाडे सागवानांची कडुलिंबाची, वडांची, पिंपळाची, पळसाची, हिवराची व बाभळीची आहेत? कोणत्या जातीचे आहेत? याची जनगणना केली आहे काय? असे प्रश्न वक्त्याने उपस्थित केले.

अध्यक्षांनी प्रकल्प धारकास वृक्षनिहाय माहिती उपलब्ध असल्यास त्याचा खुलासा करण्यास सांगितले.

वक्त्याने पुढे असे सांगितले की, त्यांच्या मते या परिसरात ३० टक्के झाडे पळसाचे, ६० टक्के झाडे हीवराचे व १० टक्के इतर जातीची झाडे प्रकल्प परिसरात आहेत. पळसाची व हिवराची झाडे प्रदूषण रोखण्यास सक्षम नाहीत. कारण हिवराच्या झाडाची पाने छोटी असतात व पळसाच्या झाडाची पाने हालत नाही, म्हणून कंपनी, वृक्षारोपनाचे जे दावे करीत आहे, ते सर्व खोटे आहे. कंपनीपासून प्रदूषण होणारच नाही, असे ठामपणे कां सांगितले नाही? कंपनीमुळे प्रदूषण होणार आहे, वातावरणाचा नाश होणार आहे, हे कंपनीस मान्य असल्यामुळेच कंपनी २ लाख - १० लाख झाडे लावणार आहे, असे सांगण्यात येत आहे. त्यामुळे, या कंपनीमुळे प्रदूषण होणारच आहे व या प्रदूषणाला रोखण्यासाठी कंपनीजवळ वृक्षारोपन हा एकच पर्याय असून इतर दुसरे पर्याय नाहीत, असे वक्त्याने सांगितले व पुढे ठामपणे सांगितले की, अडीच ते तीन वर्षाचे झाडे प्रदूषण नियंत्रित करू शकत नाही, असे त्यांचे शास्त्रोक्त मत आहे.

प्रकल्प धारकाने माहिती दिली की, प्रदूषणाची व प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजनांची माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये दिलेली आहे. तसेच सादरीकरणामध्ये सुध्दा याबाबत सांगण्यात आले. याशिवाय शासनाने दिलेल्या निर्देशानुसार पर्यावरण संरक्षणासाठी झाडे सुध्दा लावण्यात येतील. मात्र, प्रदूषण होणार आहे म्हणूनच फक्त झाडे लावणार आहे, हे पुर्ण सत्य नाही.

यावर, वक्त्याने खुलासा मागितला, तेव्हा झाडे फक्त सामाजिक कार्य म्हणुनच लावणार काय?

यावर, प्रकल्प धारकाने स्पष्टीकरण दिले, की झाडांमुळे सुध्दा पर्यावरण संरक्षणास मदत होईल व त्याचप्रमाणे सामाजिक कार्य सुध्दा होईल.

वक्त्याने प्रश्न केला की, वृक्ष लागवडीच्या माध्यमातुन प्रदूषण नियंत्रण करणेसाठी किती निधीची तरतुद केलेली आहे?

प्रकल्प धारकाने सांगितले की, वृक्ष लागवडीसाठी आवश्यक असलेला खर्च करण्यात येईल व प्रचलित मार्गदर्शिकेनुसार १ लाख ७५ हजार झाडे लावण्यात येतील.

यावर, वक्त्याने मागणी केली, प्रकल्पाद्वारे १ लाख ७५ हजार झाडे लावून जोपर्यंत ते प्रगल्भ (Mature) होत नाही, तोपर्यंत विजेचे उत्पादन करू नये.

यानंतर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी लोकसुनावणीपुर्वी मप्रनि मंडळाकडे निवेदने / आक्षेप सादर केलेल्या लोकांची नावे, लोकसुनावणी दरम्यान निवेदने / आक्षेप सादर केलेले लोकांची नांवे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धाकडे निवेदने / आक्षेप सादर केलेल्या लोकांची नांवे उच्चारून त्यांना त्यांची मते / आक्षेप नोंदविण्यासाठी आवाहन केले.

त्याचप्रमाणे, अध्यक्षांनी सुध्दा बाहेरील कक्षामध्ये उपस्थित असलेल्या नागरिकांना आवाहन केले की, ज्या लोकांनी मते / आक्षेप नोंदविण्यासाठी नाव नोंदविलेले नाही, ते सुध्दा त्यांची मते / आक्षेप नोंदवू शकतात. त्याचप्रमाणे, लोकसुनावणी कक्षामधील ज्या लोकांनी मते / आक्षेप नोंदविलेले नाही, ते सुध्दा त्यांचे मते / आक्षेप नोंदवू शकतात, असे आवाहन केले. अध्यक्षांनी पुन्हा शेवटची घोषणा केली की, ज्यांनी मते / आक्षेप नोंदविलेले नाहीत, ते अजुनही त्यांचे मते / आक्षेप नोंदवू शकतात.

श्रीमती पुर्णिमा उपाध्याय, विज्ञान व पर्यावरण केंद्र, दिल्ली ज्यांनी, पुर्वी त्यांचे आक्षेप नोंदविले होते, त्यांनी पुन्हा म्हटले की, लोकांच्या नावाची जी यादी वाचण्यात आली, त्या यादीमधील मोठ्या प्रमाणात महिला त्यांचे मते नोंदविण्यापासून वंचित झाल्या आहेत. सध्या रात्रीचे १.०० वाजत आहे व त्यामुळे उशिर झाल्यामुळे, या महिला निघुन गेल्या. याचे कारण त्यांनी सांगितले की, ज्याप्रकारे सुरवातीला ही लोकसुनावणी चालविण्यात आली, ज्या लोकांनी पर्यावरणावर मते मांडले नाही. परंतु, केवळ कंपनीला समर्थन करणेसाठी आले होते. अशा लोकांच्या मतांची सुध्दा नोंद घेण्यात आली व त्यामुळे, प्रकल्पाच्या प्रभावित क्षेत्रातील महिलांना, बचत गटातील महिलांना त्यांचे मते / आक्षेप मांडण्यासाठी संधी मिळाली नाही. याचा त्यांनी निषेध केला. त्यांनी पुढे मंचावरील उपस्थित असलेल्यांना रात्रीचे १.०० वाजत असून सुध्दा सहनशिलता ठेवून उपस्थित आहेत, याबद्दल धन्यवाद दिले.

यावर , अध्यक्षांनी खुलासा केला की, मते व आक्षेप नोंदविण्यासाठी प्राप्त झालेले लोकांचे निवेदने / आक्षेपाच्या अर्ज प्राप्तीच्या दिनांकानुसार लोकांना मते / आक्षेप नोंदविण्यासाठी संधी देण्यात आली व या लोकसुनावणीमध्ये आलेली प्रत्येक व्यक्ती काय बोलणार आहे? कोणत्या विषयावर बोलणार होती? यांची त्यांना माहिती नाही. यावर सदस्यांनी सुध्दा खुलासा केला की, लोकसुनावणी सतत सुरू होती व कुठेही खंडीत केलेली नाही.

यानंतर, कोणतीही व्यक्ती त्यांचे मते / आक्षेप मांडण्यासाठी पुढे आलेली नाही. त्यानंतर, सदस्यांनी लोकसुनावणीच्या कार्यवृत्ताच्या सारांशाची खालीलप्रमाणे माहिती दिली.

मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. ची पुर्नलोकसुनावणी येथे घेण्यात आली. या लोकसुनावणीमध्ये मोठ्या प्रमाणात लोकांनी सहभाग नोंदविला. या सर्व लोकांनी या प्रकल्पाबद्दल आपले मते / आक्षेप नोंदविलेले आहेत. यामध्ये हवा प्रदूषण, राखेचे प्रदूषण, जल प्रदूषण, विद्युत पारेषिण वाहिनीमुळे होणारे प्रदूषण, प्रकल्पाच्या दिव्यांच्या प्रकाशामुळे होणारे प्रदूषण, त्यामुळे पिकांचे होणारे नुकसान, पिकांवर होणारे परिणाम, त्याचप्रमाणे नदीच्या पाण्याचे प्रदूषण इ. बाबींचा प्रामुख्याने उल्लेख केला.

त्याचप्रमाणे, लोकांनी असेही मत मांडले की, लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. मध्ये पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर होईल व त्यामुळे परिसरातील विहिरी व भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होईल. त्यामुळे परिसरातील इतर लोक पाण्यापासून वंचित राहतील.

त्याचबरोबर, मे.लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. यांनी सन २००९ मध्ये तयार केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये असलेल्या त्रुटी येथे आक्षेप नोंदविलेल्या व्यक्तींनी निदर्शनास आणून दिल्या. प्रकल्प धारकाने त्यांच्या सादरीकरणात प्रदूषण नियंत्रणासाठी ज्या उपाययोजना करणार आहे, त्यावर माहिती दिली. याशिवाय ज्या-ज्या वेळी लोकांनी माहिती विचारली त्या-त्या वेळी त्यांना प्रकल्प धारकाकडून काही माहिती देण्यात आली. मात्र, काही माहिती प्रकल्प धारकांना देता आली नाही.

सदस्यांनी पुढे असे नमुद केले की, या पुर्नलोकसुनावणीचे इतिवृत्त तयार करून त्यावर लोकसुनावणीच्या अध्यक्षांची मंजुरी घेवून तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ नागपूरच्या आदेशाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करून इतिवृत्त महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुंबई येथील मुख्यालयात पाठविले जाईल व तेथून पूढे केंद्र शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल.

अध्यक्षांनी लोकसुनावणीचा समारोप खालीलप्रमाणे केला.

आज येथे मे. लॅन्को विदर्भ थर्मल पॉवर लि. कंपनीबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकसुनावणीमध्ये एकूण ११२७ लोकहजर होते.

म.प्र.नि. मंडळाकडे प्राप्त झालेल्या निवेदन / आक्षेपांच्या अर्ज प्राप्तीच्या दिनांकानुसार मते / आक्षेप मांडण्यासाठी लोकांना आमंत्रित केले गेले. या लोकसुनावणीमध्ये अर्जदार त्यांची मते / आक्षेपाविषयी कोणते मुद्दे मांडणार याविषयी माहिती नव्हती. पण सर्वांना संधी देणे गरजेचे होते. शिवाय येथे बरेच लोकांनी त्यांची मते १ ते २ मिनीटातच मांडली. त्यामुळे, त्यांना पर्यावरण विषयावर बोलण्याच्या सूचना करण्यात येवू शकल्या नाहीत. तरीही वारंवार सारखे मुद्दे मांडण्यात येवू नये व पर्यावरण विषयावर मुद्दे मांडावेत यासाठी लोकांना सूचना केली होती.

..७८/-

या लोकसुनावणीमध्ये लोकांनी वेगवेगळ्या विषयावर मते मांडली, जसे प्रदूषणामध्ये जल प्रदूषण, वायु प्रदूषण, तसेच नवीन वेगवेगळे मुद्दे उपस्थित केले. जसे, विजेच्या दिव्यांच्या प्रकाशामुळे होणारे शेतीचे नुकसान, रस्ते नादुरूस्त होणे, बोर धरण, धाम नदी मधून प्रकल्पासाठी होणाऱ्या पाण्याचा वापर, तसेच पशुपालन, रोजगार, शिक्षण याबाबत काही कंपनीच्या समर्थनार्थ व काही कंपनीच्या विरुध्द मुद्दे मांडण्यात आले. काही प्रश्नांची उत्तरे प्रकल्प धारकाने दिली. परंतु, काही प्रश्नांची उत्तरे प्रकल्प धारक देवू शकले नाही. तसेच, येथे सर्व लोकांना मते / आक्षेप मांडण्याची संधी देण्यात आली होती, असे सांगुन ही पुर्नलोकसुनावणीची कार्यवाही संपलेली आहे, असे त्यांनी घोषीत केले व या लोकसुनावणीचे कार्यवृत्त उपलब्ध करून देण्यात येईल, असे सांगितले.

(अजय तु. फुलमाळी)
सदस्य / आयोजक लोकसुनावणी तथा
प्रादेशिक अधिकारी, मप्रनि, मंडळ, नागपूर.

(हरिश धार्मिक)
अध्यक्ष लोकसुनावणी तथा
उपविभागीय दंडाधिकारी, वर्धा

(जे.बी. संगितराव)
निवासी उपजिल्हाधिकारी, वर्धा
जिल्हाधिकारी, वर्धा यांचे प्रतिनिधी

(टि.एस. गेडाम)
अतिरिक्त पोलिस अधिक्षक, वर्धा
पोलिस अधिक्षक, वर्धा यांचे प्रतिनिधी